शब्द रुची

४४

जुलै २०२०
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४०

लीलाताई पाटील



आपल्या जगण्याचा अवकाश
भारून टाकणारी
कर्तृत्ववान माणसं...



दिनू रणदिवे




जीवनी संपन्न होण्या, मी ऐकतो मराठी!
सर्वोत्तम मराठी साहित्यकृती ऐका फक्त स्टोरीटेल ॲप वर

storytel

फक्त दरमहा रू.99/- मध्ये सर्वोत्तम
मराठी ऑडिओबुक्स उपलब्ध ! अमर्यादित ऐका !

आजच डाऊनलोड करा!

Download on the App Store
GET IT ON Google Play

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळ

# शब्द रुची


जुलै २०२०, वर्ष सातवे
अंक तिसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
**अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट : योगिता मोरे, सहकारी : सुमेधा कुवळेकर**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

---

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**


---


अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.


## अनुक्रम


### स्मरणस्वर

**दिनकर गांगल**
व्रतस्थ पत्रकारिता / ५
वृद्धत्वी आनंद / ९

**सुचिता पडळकर**
एक मोहरलेला वृक्ष / १२

**दीपक घारे**
गटेनबर्ग आणि संगणकयुग यांच्यामधला दुवा / १५

**दीपक राजाध्यक्ष**
कोरोनापश्चात कलाजगत / १७

**अपर्णा पाटील**
चित्रांमध्ये जीव फुंकणारा जादूगार / २०

**डॉ. स्मिता निखिल दातार**
लॉकडाऊन : डॉक्टरस्य कथा रम्या / २३

**डॉ. मोहन द्रविड**
नवे अंतरिक्षयुग / २६

**कविता जोशी**
**दीपाली नातू-केळकर**
**दीप्ती मायदेव-कान्हेरे**
क्वारंटाइन कट्ट्याच्या निमित्ताने /३०

### काव्यरंग

**अपर्णा महाजन** / ३३
**आनंद म्हसवेकर, उषा परब** / ३४

**ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे** / ३५

# संपादकीय

**या** वर्षीचा पाऊस अगदी वेळेवर आलाय. झिम्मड सुरू आहे नुसती! दरवर्षी पावसाची गाणी, कविता, पावसाळी भाज्या, भजी महोत्सव, गाड्यांचे गोंधळ असे अनेक पावसाशी संबंधित विषय चवीचवीने चघळले जातात. आता मात्र रात्रंदिवस करोनाखेरीज विषय नाही.

त्यादिवशी खूप दिवसांनी कॉलेजमध्ये जाण्याकरता बाहेर पडले. अनेक ठिकाणी रस्त्यांवर महिला पोलीस आपल्या जबाबदाऱ्या सांभाळत होत्या. तोंडावर लावलेल्या मास्कच्या आरपार जाणवत होता, तो त्यांचा प्रखर आत्मविश्वास!

मी जाते, त्याच टॅक्सीतून बँकेत काम करणाऱ्या महिला अधिकारी सबंध लॉकडाऊनचा काळ सातत्याने जात होत्या. कोणतीही जबाबदारी न टाळता, भीती वगैरे भेदून! वैद्यकक्षेत्रात पीपीई किट सांभाळून तासन् तास कार्यरत राहणाऱ्या महिला मासिक पाळी, टॉयलेट विधी हे सारे सांभाळताना महिला डॉक्टर आणि नर्स यांना काय कसरत करावी लागत असेल?

लॉकडाऊन दरम्यान आमच्या सोसायटीजवळ डोक्यावर मोठी टोपली घेऊन एक भाजीवाली यायची. तिची लहानगी लेक भाजीची पिशवी आणि वजनकाटा सांभाळत रोज तिच्यासोबत असायची. आईचं बोट न सोडता तिच्यासोबत हिंडणारी ही कष्टकरी लेक!

वेगवेगळ्या वाहिन्यांवर दिसत राहणाऱ्या, धैर्यानं कॅमेरा सांभाळत किंवा रस्त्यांवरील लोकांमध्ये जाऊन थेट त्यांच्याशी संवाद साधणाऱ्या माध्यमकर्मी तरुणी!

'वर्क फ्रॉम होम', 'वर्क ॲट होम', 'वर्क आऊट साइड होम', अशा वेगवेगळ्या आघाड्यांवर आज स्त्रिया लढताहेत.

'केवळ वर्क फॉर होम' असा हेतू नाही तर इतरांसाठी–समाजासाठी काम असा व्यापक विचार त्यांच्या धडपडीमागे आहे. स्त्रिया घराबाहेर पडल्या तर काय होईल, असा गहजब एकेकाळी झाला होता. आज 'घरातलं जग ते जगातलं घर' असा पूल स्त्रियांनी मोठ्या हिमतीनं जोडलाय.


तर आपण सुरुवात केली होती यंदाच्या पावसापासून! एका विद्यार्थिनीचा परवाच मला फोन आला. ती म्हणत होती, ''मॅडम, आमच्या चाळीत पाणीच नाही हो येत जास्त वेळ नि टीव्हीवर आपले सारखे हात स्वच्छ धुवा, हात स्वच्छ धुवा. पण कसे धुवायचे?''

किती खरा प्रश्न...

आभाळातून पाऊस बरसतोय नि दुसरीकडे चाळीतले कोरडे नळ... काय म्हणायचं या विसंगतीला? याला जीवन ऐसे नाव!

जीवनातल्या असंख्य अंतर्विरोधांच्या नि विसंगतींच्या पलीकडे जाऊन काही माणसं समाजात बदल घडवतात. सकारात्मक विचार आणि ठाम कृती यांचा पाठपुरावा करणारी ही माणसं क्रांतीचे नवे वारे आणतात. पत्रकारितेच्या क्षेत्रातील दिनू रणदिवे, शिक्षणक्षेत्रातील लीलाताई पाटील, तसेच अक्षर कलावंत कमल शेडगे आणि अर्थतज्ज्ञ जयंत खेर ही अशीच अविस्मरणीय माणसं! त्यांच्या कृतार्थ जगण्याला सलाम!

**– डॉ. वीणा सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com



# व्रतस्थ पत्रकारिता

दिनकर गांगल

रणदिवे जनसामान्यांतून आले, जनसामान्यांसारखे जगले, त्यांनी बातमीदारीदेखील तशीच केली. रणदिवे निवृत्त झाल्यानंतरच्या गेल्या तीन दशकांत पत्रकारितेत 'सिटिझन रिपोर्टर' नावाचा नवा प्रकार आला आहे. रणदिवे यांनी वर्तमानपत्रात नोकरी करून सिटिझन रिपोर्टरच्या जागलेपणाने समाजहिताचे काम केले. त्यांचा तो निखळ चांगुलपणा पत्रकारितेच्या व्यवसायात अपवादात्मक आहे. तीच त्यांची महत्ता होय.

दिनू रणदिवे यांची व आमची ओळख जगन व शैला फडणीस यांनी करून दिली. आमची म्हणजे कुर्ल्याच्या नेहरूनगरात, एकाच ठिकाणी, १९६७ च्या आसपास राहण्यास आलेले गुजराती–उर्दू–मराठी पत्रकार. आम्हीमध्ये मी, अरुण साधू, अशोक जैन व आणखी पाच–सात मराठी होतो. त्यांपैकी आम्ही तिघे पुण्याहून आलेलो, त्यामुळे भोट (शहरी जीवनास अडाणी) समजले जाणारे. मुंबईतील प्रत्येक गोष्टीकडे अचंब्याने पाहणारे. दिनूची ओळख म्हणजे प्रत्यक्ष त्या व्यक्तीची ती ओळख नव्हतीच; तर ती होती त्यांच्या तत्त्वप्रतिमेची, त्यांच्या समाजवादी निष्ठेची, वाह्यात (म्हणजे साहित्य, चित्रपट, गाणी वगैरे गप्पा) न बोलण्याची. जगन आम्हाला दिनू काटकसरीने कसे वागतात – नेमके कसे बोलतात – विचार किती सखोल करतात, अशा गोष्टी सांगायचा. आम्ही कुतूहलाने त्या ऐकत बसायचो. त्याने दिनूची प्रतिमा आमच्या मनी अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे हे जसे महाराष्ट्र पातळीवर तसे दिनू स्थानिक पातळीवर अशी तयार केली होती. जगन आमच्या बऱ्याच आधी कोल्हापुरातून मुंबईला राहण्यास आलेला होता. तोही २६ जानेवारीला, म्हणजे प्रजासत्ताकदिनी रजिस्टर्ड लग्न केलेला असा समाजवादी तत्त्वाग्रही होता. शिवाय तो दादरला राहिलेला होता. तोपर्यंत मुंबईचे मराठी केंद्र गिरगावातून दादरला सरकले होते. त्यामुळे दिनूबद्दल त्यावेळी आदरयुक्त दबदबा वाटे. दरम्यान, अशोक महाराष्ट्र टाइम्समध्ये, तेही रिपोर्टिंग डेस्कवरच नोकरी करू लागला. त्याने मुंबईच्या संमिश्रतेचा 'मूड' अचूक पकडला आणि पत्रकार म्हणून प्रथम मुंबई व मग दिल्ली जिंकून घेतली. मीही एक–दोन वर्षांतच 'मटा'त नोकरीला आलो, तरी माझा विभाग साप्ताहिक रविवार पुरवणीचा– ती मटाची खासीयत समजली जाई आणि दिनू रिपोर्टिंग डेस्कवर – मुंबई महापालिका 'बीट'वर होते. म्हणजे ते मुंबईच्या स्थानिक बाबींबाबत लिहीत असत. कामगार पुढारी ही जमात व त्यामार्फत राजकारण त्या काळी मुंबईतच होत असे – पिंपरी–चिंचवडला नुकते उद्योगधंदे जमू लागले होते. दिनूच्या रिपोर्टिंग डेस्कवर प्रमुख

होते चंद्रकांत ताम्हणे. ते सारे शरीरावयव नेटकेपणाने जपून असलेले, लोकल रेल्वेतही कपडे–त्यांची इस्त्री नीट जपलेले, वेळा सांभाळणारे असे गृहस्थ होते. त्यांच्या विरूद्ध दिनू. दिनू राहत असत नीटनेटके. मात्र ते ऑफिसमध्ये उगवत संध्याकाळी केव्हातरी, रात्री नऊनऊ–दहादहापर्यंत बातम्यांच्या 'कॉप्या' लिहीत बसत. मी तर संध्याकाळी साडेपाच–सहालाच निघून जाई, पण ताम्हणे यांची वेळेची शिस्त बिघडत असे. दिनू रणदिवे यांचा अनियमितपणा व दिरंगाई हा वरिष्ठांमध्ये दुसऱ्या दिवशी चर्चिल्या जाणाऱ्या विषयांपैकी एक असे व म्हणून मला तो कळत असे. पण, बातमीदारी हा इतका परावलंबी (बांडगुळासारखा) व्यवसाय आहे, की दिनूच्या बेशिस्तीला ना ताम्हणे यांना, ना तळवलकर यांना हरकत घेता येत असे. वृत्तसंपादक दि.वि. गोखले हे उमदे गृहस्थ. ते दिनूला व त्याचा तितकाच बेशिस्त मित्र वि.वि. करमरकर याला नीट समजून घेत व त्यांना हसतखेळत टोले लगावत.



दिनू रणदिवे

रणदिवे–करमरकर यांची मैत्री हा कुतूहल व गॉसिप, दोन्हींचा विषय असे. दोघेही समाजवादी निष्ठेचे, दादरला राहणारे, हट्टी व हेकेखोर. दोघेही तळवलकर यांच्याबद्दल सतत नाराजी व्यक्त करणारे. करमरकर खूप बोलायचा, वाद घालायचा, मात्र त्याचा आवाज कधी चढत नसे. रणदिवे फार बोलत नसत, बोलत तेही अस्फूटपणे; तरीही पत्रकारांच्या पातळीवरील चर्चांमध्ये त्यांची हुकुमत जाणवे. ते मोठ्या लोकांत कसे वावरत हे मी ना कधी पाहिले, ना त्याबाबत ऐकले. दरम्यान, रणदिवे यांनी गुजराती शिक्षिका सविता यांच्याशी विवाह केला, करमरकर आयुष्यभर अविवाहित राहिला आहे व आता पुण्याला असतो. आयुष्याच्या अखेरीस त्या दोघांमध्ये काय वितुष्ट आले, कोण जाणे; पण अबोला निर्माण झाला! रणदिवे यांच्या मृत्यूनंतर करमरकर यांनी त्यांच्यावर लेख लिहिला. पण त्यांनी त्या अबोल्याचा खुलासा रणदिवे यांची पदोन्नतीची इच्छा तळवलकर यांनी उपेक्षिली असे सुचवून केला आहे.

रणदिवे यांच्या पत्रकारितेबाबतचे माझे अनुभव व त्याहून अधिक त्याबाबतची निरीक्षणे यांकडे वळण्याआधी (कै.) अनिल वाकणकर या त्यांच्या (व आमच्या) घट्ट मित्राच्या कुटुंबाचा परिचय करून दिला पाहिजे. अनिलची दादरला रानडे–गोखले रोडच्या नाक्यावर पॅथॅलॉजी लॅब होती, पण तेवढाच तो अड्डा उपद्व्यापी पत्रकार–प्राध्यापक–खेळाडू मंडळींचा होता. ते सगळे लोक दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी तेथे येत आणि अनिलला निरीक्षक ठेवून गप्पा मारत, राजकारण करत. कौतुक असे, की अनिल त्या दरम्यान त्याचा व्यवसाय चोख करत असे. त्याची पत्नी ललिता हिची त्याला उत्तम साथ होती. दुर्दैवाने, अनिल आजारी होऊन काहीसा आकस्मिक निधन पावला. आम्ही सारे त्याचे मित्र त्याच्या मृत्यूबद्दल हळहळत पुढेही प्रदीर्घ काळ जगत राहिलो आहोत. ललिता व अनिलचा फिजिशियन झालेला मुलगा राहुल यांनी दिनू व त्यांची पत्नी सविता यांची अपार काळजी घेतली, त्यांचे हट्टी स्वभाव शेवटपर्यंत जपले. सविता व दिनू यांचे निधन एकामागोमाग एका महिन्याच्या अंतराने झाले.

मी दिनू रणदिवे यांना पत्रकार म्हणून मटातच पाहिले, त्याआधी ते एस.एम. जोशी यांनी काही काळ चालवलेल्या 'लोकमित्र' या दैनिकात होते. त्यांची व करमरकरची ओळख तेथलीच. ते कष्टाने चालवलेले वर्तमानपत्र, त्यासाठी अनेक लोकांनी सोसलेली झीज यांच्या कहाण्या ऐकण्यास मिळत. त्यात काम केलेले रणदिवे यांच्यासारखे, ध्येयनिष्ठेच्या झळा सोसलेले पत्रकारही पाहण्यास मिळत. त्यांनी सर्वांनी पत्रकारितेतील व्रतस्थता जाऊन व्यावसायिकता आलेली पाहिली– स्वीकारलीदेखील. तरीही शक्य तितकी स्वत:ची तत्त्वे जपली. दिनू रणदिवे हे तसे आदर्श उदाहरण होय. त्यांनी मटासारख्या भांडवलशाही वृत्तपत्रात कामगार–कष्टकऱ्यांच्या, दलित–वंचितांच्या कहाण्या आपुलकीने लिहिल्या, त्याकरता क्वचित वरिष्ठांची नाराजी ओढवली तरी तिकडे दुर्लक्ष केले; आणि स्वत:चे काम निष्ठेने व तळमळीने करत राहिले.

रणदिवे यांचा कस तयार झाला, त्यांनी चळवळीचा भाग म्हणून चालवलेल्या संयुक्त महाराष्ट्र पत्रिकेत. रणदिवे, अशोक पडबिद्री व प्रभाकर कुंटे हे तिघे ते साप्ताहिक प्रसिद्ध करत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे मुखपत्र असेच त्याचे स्वरूप होते. तो अंक म्हणजे आख्यायिका आहे. मी त्याचे अंक कधी पाहू शकलो नाही, ना त्याबाबतचे उल्लेख वाचले. मात्र त्या अंकाबाबत वारंवार व खूपच बोलले जाते. एकूण, तो लढाच आता इतका मागे पडला आहे आणि जग साठ–पासष्ट वर्षांत इतके बदलले आहे, की महाराष्ट्र– मराठी भाषा– एकूणच प्रादेशिकता यांना ऐतिहासिक महत्त्व तरी उरले आहे की नाही असे कधी कधी वाटते.

दिनू रणदिवे मटाच्या कचेरीत सायंकाळी साडेपाच–सहानंतर उगवत, त्यानंतर टेबलावर कोपर व गालाला हात लावलेला, अशा ध्यानस्थ अवस्थेत काही काळ बसत, मग न्यूज प्रिंटचे कागद ओढून घेऊन 'कॉपी' लिहिण्यास सुरुवात करत. रणदिवे अबोल होते, तसे निर्विकारही भासत. त्यांना घटनांनी उचंबळून येत नसे, बहुधा. घटनांचे तरंग त्यांच्या मनात खोलवर उमटत असावेत. करमरकर त्यांच्याविरुद्ध. त्याची खूप बडबड चाले, फोन कॉल होत, त्या काळातच त्याच्या डोक्यात त्याच्या लेखनविषयाचे मंथन चालत असावे, बहुधा. पण करमरकरच्या लेखनाने मराठी वाचकांवर छाप पाडली. विविक व दि.वि. गोखले (युद्धनेतृत्व) यांची लेखनशैली व विचारपद्धत हे मटाचे १९६७ ते १९७४ या काळातील मोठे आकर्षण होते. नंतर युद्धाचे वातावरण नाहीसे झाल्यावर गोखले यांचे लेखन झाकोळले; ते ग्रंथलेखनाकडे वळले. करमरकर मात्र त्याच्या लेखनशैलीची तो निवृत्त होईपर्यंत लोकप्रियता टिकवून होता. त्याचा विषय स्पोर्ट्स हाच वाचकांचा लाडका असतो ना!

रणदिवे यांना त्यांच्या पद्धतीच्या बातमीदारीला १९७०–

७२ नंतर अनुकूल काळ लाभला. आधी बांगलादेशाची लढाई व नंतर १९७२ चा दुष्काळ... देशात व म्हणून मुंबई-महाराष्ट्रातही आंदोलनांचे वातावरण वाढत चालले. इंदिरा गांधी या व्यक्तीबद्दल एकाच वेळी विलक्षण राग व तितकेच आणि तसेच प्रेम असे वातावरण देशभर तयार झाले. मुंबईत तर जॉर्ज फर्नांडिस यांनी आकांत आरंभला. त्यांच्या सभांनी नरे पार्क, चिंचपोकळी, नायगाव येथील मैदाने दुमदुमून जाऊ लागली. बाबासाहेब पुरंदरे- शालिनी पाटील शिवाजी पार्कवर शिवसृष्टी उभारत होते, तर फर्नांडिस जाहीर सभांतून रोजच्या ज्वलंत विषयांवर आग ओकत होते. रणदिवे यांनी त्या व त्यानंतरच्या जनता पार्टी प्रयोगाच्या काळात केलेले लेखन अभ्यासण्यासारखे आहे. त्यांचा संचार सर्वत्र असे. ते आणीबाणीचा सूक्ष्मदेखील प्रतिकार टिपत व बातमीमध्ये नोंदत. इंदिरा गांधी सरकारची बंधने वाढत गेली, त्याचे चटके पत्रकारांना बसू लागले. रणदिवे त्यामधून निसटून सफाईने व चतुराईने लिहीत होते.

जे देशाच्या राजकारणात जाणवत होते ते मटासारख्या जागृत पत्रातही दिसत होते. इंदिरा गांधींविरुद्ध समाजवादी व जनसंघी एकत्र येत होते. तसे दोन तट मटातही होते. दि.वि. गोखले यांनी तर नोकरी सोडून आणीबाणीविरुद्ध सत्याग्रह केला. तळवलकर यांची भूमिका सरकारानुकूल होती (त्यांनी पुढे, आणीबाणी संपल्यावर जाहीर माफी मागितली). दिनू रणदिवे, करमरकर, प्रकाश बाळ हे आग्रही समाजवादी. ताम्हणे हेदेखील तिकडे झुकलेले. संघाच्या गटात गोखले यांच्या पाठोपाठ वि.ना. देवधर, अशोक आचार्य, नंतर नीला उपाध्ये असे वार्ताहर होते. ऑफिसात खुल्या चर्चा/राजकीय वाद होत नसत, परंतु शह-काटशहाचे संकेत मिळत व ज्याचे त्याचे धुमसणे चालू राही. खरे तर, प्रत्येक वर्तमानपत्रात तसे दृश्य असते, ते मटात कमी राहिले, कारण गोखले यांची खेळकर वृत्ती.

तोच काळ मुंबईत भडकलेल्या भाववाढविरोधी आंदोलनाचा होता. मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर या रणरागिणीस्वरूपात मैदानात उतरल्या होत्या. त्यांनी थाळ्या पिटण्याचे आंदोलन, काऊन्सिल हॉलला घेराव अशा मोठमोठ्या मोहिमा हाती घेतल्या. दिनू रणदिवे यांना ते बातमीदार म्हणून आव्हानच होते. ते मनाने आंदोलकांबरोबरच होते. त्यामुळे त्यांच्या रोजच्या बातम्यांना धार चढत असे. आम्ही रविवार पुरवणीतदेखील त्या संबंधात दोन-तीन 'फीचर्स' केली, रणदिवे यांचे मोठे सहकार्य लाभले. ते भाववाढीच्या मुद्यावरील चर्चेत प्रक्षुब्ध होत, पण मनाने मऊमृदू असत. मानवी जिव्हाळा हा त्यांचा स्वभाव होता. आम्हाला पत्रकारितेत कायम शिकवले जाते ते असे, की वाचकांना माणसांबद्दलच्या घडामोडी जाणून घेण्यात रस असतो. तेव्हा तर अख्खा जनसमुदाय भडकून उठला होता आणि दिनू रणदिवे पत्रकार म्हणून त्यामागील धागेदोरे उलगडून सांगत होते. रणदिवे यांनी मानवी जिव्हाळ्याच्या कित्येक बातम्या (पत्रकारितेतील शब्द - ह्युमन इंटरेस्ट स्टोरीज) त्या काळात दिल्या. अशा आंदोलनाच्या सर्व नेत्यांशी रणदिवे यांचा निकट व विश्वासाचा संबंध असे. त्यांची बांगलादेश युद्धावेळची बातमीपत्रे तशीच, माणूस समजून घेणारी व समजावून सांगणारी होती. त्यांनी अंतुले सिमेंट घोटाळा प्रकरणात शोधक बुद्धीने व सखोल लिहिले. इंडियन एक्स्प्रेसमध्ये अरुण शौरी आणि मटामध्ये रणदिवे अशी बातम्यांची चुरस वाचकांना जाणवून जाई. वास्तवात दोघेही पत्रकार समाजहिताचेच काम करत होते. 'इनव्हेस्टिगेटिव्ह जर्नालिझम' ही संज्ञा त्या काळात प्रचलित होती, त्याचाच तो नमुना होय. रणदिवे आयुष्यभर तशीच पत्रकारिता करत आले होते व त्यांनी ती पुढेही तशीच चालवली. त्यांनी मुंबई विद्यापीठातील गैरव्यवहारांचे प्रकरण तर कित्येक काळ लावून धरले होते.

त्या काळात मटात एक जोक प्रचलित होता. रणदिवे यांचे 'बॉस' चंद्रकांत ताम्हणे आत्मकथनपर काही लिहू पाहत होते. त्याच्या आधी पु.भा. भावे यांचे 'प्रथमपुरुषी एकवचनी' नावाचे, त्याच स्वरूपाचे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. तर ताम्हणे यांच्या कोणी चहाटळ सहकाऱ्याने म्हटले, की ताम्हणे यांच्या पुस्तकास 'द्वितीय पुरुषी द्विवचनी' असे नाव ठेवुया. कारण आंदोलन संयुक्त महाराष्ट्राचे असो, धरणग्रस्तांचे असो वा कोयनाभूकंपाची आपत्ती असो, घटना दिनू रणदिवे यांनी अनुभवलेली, वर्णन करणार ताम्हणे, ते असे की जणू ताम्हणेच त्या घटनांचे साक्षी होते. ताम्हणे हे 'फील्ड रिपोर्टिंग'मध्ये फार कधी उतरले नव्हते. त्यामुळे ती टिप्पणी त्यांच्यावर जेवढी होती त्यापेक्षा अधिक रणदिवे यांच्या स्वभाववैशिष्ट्यावर व धाडसावर होती. कारण अशी कोणतीही घटना घडली, की रणदिवे तेथे प्रथम हजर असत आणि तिचा शेवटच्या दुव्यापर्यंत शोध घेत.

रणदिवे हाडाचे बातमीदार होते व त्यामुळे एकांडे शिलेदार होते. एरवी पत्रकारांची एक साखळी असते, प्रत्येक वर्तमानपत्रातील एकेकाने एकेका बातमीचा तलास वा पाठपुरावा करायचा आणि ती अन्य बातमीदारांमध्ये प्रसृत करायची. त्यामुळे सर्व वर्तमानपत्रांतील बातम्या सारख्याच चेहऱ्यामोहऱ्यांच्या वाटतात. रणदिवे यांची त्यांची स्वत:ची खास बातमी असायची. राजा केळकर, कृ.पां. सामक, यशवंत मोने हे रणदिवे यांच्यासारखेच पण वेगवेगळे प्रभावशाली संपर्क असलेले पत्रकार त्या काळी वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत होते. केळकर हे कोटीभास्कर म्हणून ओळखले जात, तर मोने लवकरच विखे पाटील यांच्या गोटात गेले. सामक यांनी, त्यांचा कल काँग्रेसी नसूनदेखील यशवंतराव चव्हाण यांच्याशी जवळचे संबंध प्रस्थापित केले होते. मी ही वेगवेगळी नावे व त्यांची वैशिष्ट्ये पत्रकारांत होणाऱ्या गप्पांमधून नोंदली, ती अशासाठी की रणदिवे त्या सर्वांमध्ये जनसामान्यांचे प्रतिनिधी वाटत. त्यांनी राजकीय पुढाऱ्यांच्या संपर्काची/संबंधांची हौस कधी बाळगली नाही; मिरवली तर नाहीच नाही. तेवढेच नव्हे तर त्यांनी विधिमंडळ/मंत्रालय यांच्या जवळपास जाणेदेखील आपद्धर्म म्हणून केले असेल तर! एरवी, पत्रकारांना मंत्री - आमदारांबरोबरचे संबंध म्हणजे बिरूद वाटत असते. रणदिवे यांची बांधिलकी सर्वसामान्य माणसाशी - हातगाडीवाल्याशी - मजुराशी होती. ते कित्येकदा रात्री बोरीबंदरच्या ऑफिसातून निघत व रमतगमत, लोकांशी बोलत - त्यांच्या व्यथावेदना जाणून घेत रात्री उशिरा घरी पोचत. त्यांचे गोल, मोडीकम गुजराती वळणाचे न्यूजप्रिंटवरील हस्ताक्षर माझ्या नजरेसमोरून आतासुद्धा फिरत आहे.

रणदिवे यांच्या बातमीदारीला जिवंतपणा लाभला होता, तो

त्यांच्या स्वत:च्या चळवळीतील असण्याने. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात नुसती पत्रिका प्रसिद्ध केली नाही, सभा घेतल्या- प्रदर्शने भरवली. त्यांनी दादा पुरव (संयुक्त महाराष्ट्र समितीचे चिटणीस) यांच्या सहकार्याने बाळ ठाकरे यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन (बहुधा पहिले असावे) भरवले होते. ते कार्यकर्ते म्हणून वावरले. शिवसेनेचा जन्म अनेक जाणकार मराठी जनांना आशादायक व म्हणून सुखाचा वाटला होता, त्यात रणदिवेदेखील होते. पण, रणदिवे तयार झाले होते समाजवादी पक्षाच्या मुशीत. तो पक्ष सतत फुटत गेला. त्यामुळे प्रत्येक पुढाऱ्याचा गट तयार होई. रणदिवे यांची निष्ठा प्रजासमाजवादी पक्षाशी. परंतु त्यांना आपुलकी जॉर्ज फर्नांडिस यांच्याबद्दल. ते लोहिया गटाचे अध्वर्यू. त्या पक्षाने, त्याच्या विविध फळ्यांसह राजकारणात प्रभाव फार पाडला नाही, परंतु त्यांनी राजकारणात विवेक जागा ठेवण्याचा प्रयत्न केला. समाजवादी पक्ष जवळजवळ अस्तंगत झाला असल्याने सध्याचे राजकारण कसे दिशाहीन व नेतृत्वहीन झाले आहे ते दिसतच आहे. समाजवादी पक्षास ती ताकद, नैतिक धैर्य प्राप्त होई सच्चेपणातून, प्रामाणिकपणातून, तळमळीतून. ते गुण बऱ्याच कार्यकर्त्यांत उतरलेले दिसतात – त्यांतील रणदिवे हे एक होते. त्यांनी ते पत्रकारितेतदेखील जपले ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट होय, कारण माध्यमांची संपूर्ण समाज भ्रष्ट, नीतिमत्ताशून्य करण्याची शक्ती सध्या सारे जग अनुभवून राहिले आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर सार्वजनिक महत्त्वाचे जे मृत्यू झाले त्यांच्याबद्दल लोकांना त्यांचा शोक नीट व्यक्त करता आला नाही. रणदिवे यांच्या बाबतीतही तसेच झाले. परंतु मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू भालचंद्र मुणगेकर यांनी पुढाकार घेऊन पत्रकारांची ऑनलाइन मीटिंग घेतली. तेथे मटातील प्रकाश बाळ, प्रकाश अकोलकर, टाइम्सचे गुरूवीरसिंग यांच्यासह अनेक पत्रकारांना त्यांच्या भावना व्यक्त करता आल्या. स्वतंत्रपणे, वैशाली रोडे हिने फेसबुकवर भावस्पर्शी पोस्ट लिहिली आहे. रणदिवे यांचे ज्युनियर लोकांशी जिव्हाळ्याचे व उमदे नाते असे. रणदिवे त्यांच्यामधील गुणांना हसतखेळत प्रोत्साहित करत. त्यावेळी त्यांच्या स्वभावाची मिस्किल छटा प्रदर्शित होई व वाटे, की दीनदुबळ्यांबद्दल कळवळा असलेली ही व्यक्ती सतत करुणरसच आळवत नाही, तर जरा हलकेफुलके होऊन त्यात चैतन्याचे रंगही भरू शकते की!

भालचंद्र मुणगेकर यांनी शोकसभेच्या अखेरीस, रणदिवे यांच्या नावे पत्रकाराला दरवर्षी पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. त्या योजनेचे तपशील ठरत आहेत, परंतु मुणगेकर म्हणाले, की मी दहा वर्षांची पुरस्काराची रक्कम उभी करण्याचे ठरवले आहे; पत्रकारमित्र बरोबर आहेतच.

अशा लहानथोर सर्वांच्या मनी रणदिवे म्हणजे एक अत्यंत सज्जन, प्रामाणिक माणूस अशीच प्रतिमा होती. त्यामुळे त्यांच्या दादरच्या घरी नित्य ये-जा असे. वाकणकर ललिता आणि राहुल हे दोघे त्यांची दरदिवशी विचारपूस करतच. तीन वर्षांपूर्वी मुलुंडच्या महाराष्ट्र सेवा संघाने दिनू रणदिवे यांना पुरस्कार दिला व त्यांचा सत्कार केला. त्यावेळी ललिताने त्यांच्यासाठी टॅक्सी बघून त्यांना मुलुंडला नेले आणि घरी आणून पोचवले. घामट टेरेसमधील जुन्या चाळीतील ते घर. दोन जिने चढायचे आणि दोन जिने उतरायचे. त्र्याण्णव वर्षांचे दिनू रणदिवे यांनी ललिताच्या मदतीने ते दिव्य पार पाडले. तरुण पत्रकार कधी त्यांच्या घरी येऊन जात. रणदिवे त्यांची आस्थेने विचारपूस करत. त्यांना उत्तम सल्ला देत. सर्वांच्या मनी एकच कोडे असे ते म्हणजे रणदिवे यांनी त्यांच्या दोन खोल्यांच्या घरात एवढी 'रद्दी' कशासाठी जमा केली आहे? गेल्या कित्येक वर्षांची टनावारी वर्तमानपत्रे तेथे गठ्ठ्यांनी होती. तेथे खोल्यांमध्ये वावरताही येत नसे. रणदिवे पतिपत्नींनी तसाच संसार शेवटपर्यंत केला. दादर स्टेशनच्या बाहेरची ती छोटी जागा सोडून जाण्यास सतत नकार दिला. रणदिवे यांना त्या वर्तमानपत्रांमध्ये कसला शोध घ्यायचा होता ते कधीच कोणाला कळले नाही!

रणदिवे जनसामान्यांतून आले, जनसामान्यांसारखे जगले, त्यांनी बातमीदारीदेखील तशीच केली. रणदिवे निवृत्त झाल्यानंतरच्या गेल्या तीन दशकांत पत्रकारितेत 'सिटिझन रिपोर्टर' नावाचा नवा प्रकार आला आहे. रणदिवे यांनी वर्तमानपत्रात नोकरी करून सिटिझन रिपोर्टरच्या जागलेपणाने समाजहिताचे काम केले. त्यांचा तो निखळ चांगुलपणा पत्रकारितेच्या व्यवसायात अपवादात्मक आहे. तीच त्यांची महत्ता होय.


ग्रंथाली

लाखो इथले गुरू

फ्रान्सिस डिमेलो

मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.



मन मुक्त... माझे!

नीलिमा गुणे-गोळे

मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रुपये

# वृद्धत्वी आनंद



जयंत खेर

**मी** जयंत खेरला भेटलो तेव्हा तो स्टेट बँकेत उच्चाधिकारी होता, चेअरमनच्या खास वर्तुळातील. ब्रँडेड पँट आणि खोचलेला शर्ट, झकास पट्टा, कॉलरवर टाय आणि कमावलेला इस्त्रीतील स्मार्टनेस. मी साधा निम्नवर्गीय पत्रकार, 'ग्रंथाली' या नावाने वाचक चळवळ करू पाहणाऱ्या एका मोठ्या गटातील एक. जयंतची पत्नी संजीवनी हौसेने लिहायची व म्हणून ती माझ्याकडे 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये यायची. तिने एकदा मला घरी बोलावले. ती त्यावेळी सचिवालयासमोर (मंत्रालय) बँकेच्या क्वार्टरमध्ये राहत होती. मी व जयंत त्यावेळी खूप काही बोलल्याचे आठवत नाही; किंबहुना आमचा स्नेह जुळेल अशी एवढीही खूण त्या भेटीत मला जाणवली नाही.

'ग्रंथाली'ची जुळवाजुळव पुढे, १९७४-७५ च्या दरम्यान होत गेली. तीन पुस्तके प्रसिद्ध करण्याचा, त्यासाठी प्रत्येकी पंचवीस रुपये जमा करण्याचा संकल्प सुटला. खांद्यांना शबनम पिशव्या लावलेले आम्ही चहू दिशांना सुसाट निघालो, ज्या-त्या सुशिक्षित माणसाला ती संकल्पना समजावून सांगू लागलो. तशी ती संजीवनी खेर यांनाही सांगितली असणार. एके दिवशी, जयंत खेर यांचा 'मटा'त फोन आला. आमची भेट आमच्या अड्ड्यावर, व्हीटीसमोरील एंपायर या इराण्याच्या हॉटेलात ठरली. जयंत तेथे आला. त्याने पंधरा-सतरा नावे पत्त्यांसह टाइप केलेला एक कागद आणि 'ग्रंथाली' या नावे पंचवीस रुपयांचे तेवढे चेक माझ्या हाती दिले. त्याच्या वागण्याबोलण्यातील नेटकेपणा, कागद-चेकवरील स्वच्छता व टापटीप, चहा पितानाची शिस्त, माझ्या हातातील सिगारेटची उपेक्षा... सारे सारे माझी स्वभावप्रकृती व गबाळेपणा याविरुद्ध होते.

मला गंमत जयंतची वाटते, की त्याचे पंच्याऐंशी वर्षांचे आयुष्य असे विविध छंदांत व व्यवसायात गेल्यावर त्याने वृद्धपणी पेंटिंग्ज चितारण्याचा वेगळाच ध्यास घेतला आणि तो पूर्ततेस नेला. त्याने आलेल्या त्या अपूर्णत्वावर मात करून पूर्णत्वाची कांक्षा धरली. त्यातून ती चित्रनिर्मिती झाली. जयंतला वृद्धत्वी लाभलेल्या त्या आनंदाची थोरवी प्रत्येक साठीपार माणसाने जाणून घेतली पाहिजे. तेव्हा नवे आनंदी आयुष्य सुरू होऊ शकते हे जयंतने दाखवून दिले आहे!



जयंत खेर यांनी काढलेले चित्र



जयंत खेर पेटिंग्ज करताना

पुढे, तो व त्याचे स्टेट बँकेतील अधिकारी मित्र, विशेषत: एकनाथ ठाकूर 'ग्रंथाली'च्या वर्तुळातील झाले. तसे ते एक वर्तुळ नव्हतेच. 'ग्रंथाली' हा साहित्य-संस्कृतीसंबंधातील विविध तऱ्हांच्या इच्छाआकांक्षा व तसेच विचार असलेल्या अनेक वर्तुळांचा समुदाय होता. त्यात वेगवेगळी राजकीय मते असलेले व नसलेलेही लोक होते. मात्र सर्वजण 'ग्रंथाली'च्या व्यासपीठावर तटस्थ होऊन जात. जयंत 'ग्रंथाली'जवळ आला तो त्याच्या तशाच एका प्रकल्पामुळे. जयंत व संजीवनी यांनी इंदिरा गांधी यांच्या भाषणांच्या कॅसेट संकलित करून, त्यांची एक मालिका वितरीत करण्याचा प्रकल्प हाती घेतला होता. खेरदांपत्याला त्यांच्या त्या प्रकल्पात कुमार (केतकर), शेखर (साठे), संजीव (खांडेकर) सहकार्य करू लागले. कुमार-संजू विलक्षण लाघवी - जवळ आलेल्या माणसाला सर्वांगांनी जोडणारे. जयंतचे तसेच झाले. दरम्यान, एकनाथ ठाकूर, जयंत खेर स्टेट बँकेतून बाहेर पडले होते. जयंतच्या त्या प्रकल्पाचे यशापयश माहीत नाही, परंतु त्यानंतर 'ग्रंथाली'ची १९९१ च्या सुमारास जी फेररचना झाली त्यात जयंत 'ग्रंथाली'च्या विश्वस्त मंडळात आला.

जयंतचे चोखंदळ वाचन, रसिक वृत्ती, कल्पकता आणि जिव्हाळा हे गुण ओढ लावणारेच होते. त्यामुळे तो आमच्या समुदायात सहज सामील झाला. त्यानंतर माझे आणि जयंतचे स्वभाव फारच जुळून गेले. मोठ्या कंपन्यांच्या संचालक मंडळांच्या बैठकांतून 'ग्रंथाली'च्या कोणत्या तरी कोपऱ्यात होणाऱ्या मीटिंगांत येणारे अशोक दातार, अरुण मुजुमदार, जयंत खेर असे 'एक्झिक्युटिव्ह' लोक आणि आमच्या छोट्या मीटिंगांतून मोठ्या कंपन्यांच्या मीटिंगांमध्ये गेलेले शेखर साठे, संजीव खांडेकर हे सर्वसामान्य तरुण... मी येथे पाच नावे घेतली, परंतु असे पाचशे-पाच हजार लोक त्याकाळी 'ग्रंथाली' या सुसंस्कृततेच्या मंत्राने भारले गेले होते. जयंत हा त्यांचा एक प्रतिनिधी होता.

'ग्रंथाली'मधून निर्माण झालेल्या या विशाल स्नेही मंडळात जयंत खेर हा वेगळा होता. त्याचे वागणे-बोलणे शिस्तशीर, नेमस्त, तरी आग्रही असे. तो बैठकांमध्येदेखील मुद्याला धरून बोले. आमच्या वर्तुळात अर्थविषय तज्ज्ञतेने जाणणारे काही लोक होते, पण जयंत खेरने आम्हाला व्यावहारिक दृष्टी दिली. त्याचा आग्रह प्रत्येक 'ॲक्टिव्हिटी' ही 'प्रॉफिट सेंटर' असली पाहिजे असा असे. आम्हाला तो पटे पण अमलात आणता कधीच आला नाही. जयंत खेरने 'ग्रंथाली'चा व्यवस्थापनशास्त्रदृष्ट्या यशापयशाचा अहवाल तयार करून घेतला. गंमत म्हणजे आम्ही सगळे बेहिशोबी असूनदेखील त्या कसोटीत उतरलो! त्याचवेळी एक लक्षात आले होते, की त्याच्या व्यवहारचातुर्यात त्याची रसिक वृत्ती छपून जाते की काय!

त्याचे हे व्यवहारचातुर्य ठिकठिकाणी व्यक्त होई. त्याने एकदा 'इकॉनॉमिक टाइम्स'मध्ये एक लेख लिहिला. पंजाबी अतिरेकाचे दिवस होते ते. शीख तरुण बँकशाखा लुटत. स्वाभाविकच सरकारने बँकशाखांसमोर बंदुकधारी पहारेकरी नेमणे सुरू केले. जयंतने तो उपाय अव्यवहार्य व म्हणून अकारण खर्चीक आहे हे पुऱ्या आकडेवारीनिशी लिहिले. त्याने म्हटले, की जेवढ्या बँकशाखा, त्या प्रत्येक शाखेसमोर तीन शिफ्टमध्ये दोन पहारेकरी - त्यांचे पगार, त्यांची बंदुका हाताळण्याची क्षमता या सर्व गोष्टींवर जेवढा खर्च होतो त्यापेक्षा अतिरेक्यांनी दोन-पाच बँकशाखा लुटल्या तरी परवडले! त्यांनी त्या 'अतिरेकी' वाटेल अशा कल्पनेची सैद्धांतिक चर्चाही केली होती.

मला जयंतची तरुणपणी सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे त्याने कर्जतला घेतलेले फार्म हाऊस. तो बऱ्याच वेळा शनिवार-रविवार मित्रमंडळींना घेऊन तिकडे जाई. ते नुसते फार्म हाऊस नव्हते तर तेथे त्याने सहा एकरांत नियोजनबद्ध जंगल विकसित केले होते. तेथे फिरताना मोठी मौज येई. पुढे, वये वाढू लागली तेव्हा त्या जंगला'चे काय करायचे अशी चर्चा सुरू झाली. मी त्याला सुचवले, की तेथे पर्यावरणशाळा सुरू करूया. मला जगातील सगळ्या गोष्टी म्हणजे सार्वजनिक क्षेत्र वाटते (सरकारी नव्हे). माझ्या डोक्यात प्रायव्हेट प्रॉपर्टीचा 'कन्सेप्ट' कधी शिरला नाही. तेवढीच गोष्ट मजजवळ वडिलोपार्जित आहे. तरीही जयंत व त्याच्यासारखे अर्थविषयातील

काही जाणकार माझे जवळचे मित्र राहिले आहेत. तर पर्यावरणशाळेचा मुद्दा तसाच राहून गेला. बघता बघता, आम्ही वृद्ध झालो आणि जयंत खेरला पार्किन्सनने पकडले. त्याची जाणीव त्याला ड्रायव्हिंग करताना झाली. त्याचे वेगवेगळ्या अवयवांतील स्नायू काम नीट करत नाहीत हे ध्यानी आले. त्याने डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यातच त्याला हृदयविकाराची बाधा झाली व स्टेण्ट टाकावा लागला. डॉक्टरांनी त्याला अशा दुर्बलता सांभाळत त्यापुढे जगावे लागेल असे सांगितले. त्याचे हात हलू लागले, चाल मंदावली. तो बोलायचा आधीपासूनच मृदू, आता उच्चारण अस्फुट होऊ लागले. पण त्याची बुद्धी आणि त्याची शिस्त मात्र कायम राहिली. बराच काळ त्याने सांस्कृतिक कार्यक्रमांना-बैठकांना येणे चालू ठेवले. पुढे तेही हळुहळू कमी झाले - समारंभही आटले. तो हिंदू कॉलनीत राहायचा - तेथून मदतनीसाच्या अथवा संजीवनीच्या साहाय्याने आंबेडकर रोडवर फिरण्यास यायचा. तेथे कधी भेट व्हायची. त्याचे बोलणे खूपच कमी झाले होते, त्यामुळे संभाषण वाढत नसे.

मी जरी ही वाक्ये सखेद लिहीत असलो तरी जयंतला त्या कोणत्याच उणिवेची बाधा वाटत नसावी असे त्याचे जीवन विधायक रीतीने व कार्यमग्न चालले होते. कारण त्याने त्या काळात जॉन मार्शलचे चरित्र लिहिले व ते प्रसिद्धही झाले. त्याचा अर्थशास्त्राचा अभ्यास चालू होताच. तो तत्संबंधी वर्तमानपत्रांमध्ये लिहीत असे. त्याखेरीज मेकॉले हा त्याच्या विशेष चिंतनाचा विषय होता. त्याने मेकॉलेच्या चरित्राची चार प्रकरणे लिहिलीदेखील आहेत. अर्थात त्याच्या दीर्घ लेखनास त्याने 'ग्रंथाली'त केलेल्या लेखनप्रकल्पाची पार्श्वभूमी होती. त्याने 'मोटारींची मजा' हे 'ग्रंथाली-ज्ञानयज्ञा'त पुस्तक लिहिले. भारतात मोटारींचे एकेकाळी फक्त प्रीमियर व ॲम्बॅसॅडर हे दोनच ब्रँड होते. अर्थव्यवस्था खुली झाल्यावर खेळण्यांत दिसणारे गाड्यांचे सारे जागतिक ब्रँड भारतातील रस्त्यांवर आले. भारतीय मुलांचा सर्व गाड्या खेळण्यांमध्ये जमवण्याचा आणि पालकांचा ते ब्रँड हस्तगत करण्याचा छंद तयार झाला. जयंत खेर याचे पुस्तक त्या मुबलकतेतील अर्थकारण, गाड्यांचे तंत्र व सौंदर्य अशा सर्वांगांची चर्चा करते. जयंतची ड्रायव्हिंग ही पॅशन होती.

त्याने मास्टर स्ट्रोक मारला, तो म्हणजे त्याची पार्किन्सनच्या काळातील चित्रकला. त्याला चित्रकलेची आवड पूर्वापार होती. पण जयंतने हाताला कंप असलेल्या अवस्थेत चार-पाच वर्षांत साठ कॅनव्हास चितारले. सर्व चित्रे वेगवेगळ्या आकारांत, वेगवेगळ्या रंगांत आणि अमूर्ताकार! म्हणजे ॲब्सट्रॅक्ट! परंतु विलक्षण अर्थपूर्ण -प्रेक्षकांशी सरळ संवाद साधणारी चित्रे! मी त्याच्या घरी जाऊन चित्रे पाहिली तेव्हा मला अचंबाच वाटला — पार्किन्सनने अधू अवस्थेत वृद्धावस्था व्यतीत करणाऱ्या आमच्या मित्राला कसलीच बाधा नव्हती, अडचण नव्हती. खरे तर, मला संजीवनीकडून जयंतच्या अडचणी, त्याला होणाऱ्या दुःख-वेदना कळत असत, पण त्याच्या बोलण्या-वागण्यात आलेले कमालीचे मंदत्व सोडले तर आजाराची वा वृद्धत्वाची कोणतीही खूण तेथे नसे. जयंत जीवन रसिकतेने जगत आला. त्याने संगीत-नाटक-चित्रपट-चित्रकला आणि त्या संबंधीच्या गप्पा यांवर भरपूर प्रेम केले. त्याने जीवनोपभोग उत्तम घेतला. तो व संजीवनी, दोघे खूप भटकली. संजीवनीलाही अनेक विषय-व्यक्ती-स्थळे जाणण्याची, त्याबाबत लिहिण्याची हौस आहे. तिचा हात लिहिता आहे. तिने डॉक्युमेंटरीदेखील केल्या.


मला गंमत जयंतची वाटते, की त्याचे पंच्याऐंशी वर्षांचे आयुष्य असे विविध छंदांत व व्यवसायात गेल्यावर त्याने वृद्धपणी पेंटिंग चितारण्याचा वेगळाच ध्यास घेतला आणि तो पूर्ततेस नेला. त्याला कॅनव्हास उचलून स्टँडवर ठेवताना होणारा शारीरिक अपंगत्वाचा त्रास मी पाहिला आहे. त्याने आलेल्या त्या अपूर्णत्वावर मात करून पूर्णत्वाची कांक्षा धरली. त्यातून ती चित्रनिर्मिती झाली. जयंतला वृद्धत्वी लाभलेल्या त्या आनंदाची थोरवी प्रत्येक साठीपार माणसाने जाणून घेतली पाहिजे. तेव्हा नवे आनंदी आयुष्य सुरू होऊ शकते हे जयंतने दाखवून दिले आहे!

**– दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com


॥ग्रंथाली॥

**सर्वसाक्षी**

**संजीवनी खेर**




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**




**मंदिर शिल्पे**

**डॉ. माया पाटील**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रुपये**



**सुचिता पडळकर**

# एक मोहरलेला वृक्ष

शासकीय सेवेच्या निवृत्तीनंतरचं लीलाताईंचं लेकरू म्हणजे सृजन आनंद विद्यालय. ते सांभाळत त्यांनी सृजन आनंद शिक्षण केंद्रामार्फत महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी शिक्षणवर्ग, शिक्षक-प्रशिक्षणं घेतली. ही जणू काही सृजन आनंदची फिरती प्रयोगशाळा होती. याबरोबरच महिला दक्षता समिती, संयुक्त महिलादिन व्यासपीठ यातून स्त्रियांच्या सबलीकरणासाठी त्यांनी पाठपुरावा केला. 'अभिआस' हा वाचणाऱ्या स्त्री-पुरुषांचा गट उभा केला. वाचा, मत मांडा, चर्चा करा, विचार चकमकीतून समाजभान जागवणारा हा गट गेली पंचवीस-तीस वर्षं समरसून वाचन करत आहे. बौद्धिक मैत्री ही देणगी त्यांना मिळाली आहे. लीलाताई समाजाच्या 'जागल्या' होत्या.

**माझा** आणि लीलाताईंचा परिचय झाला १९८७ मध्ये. माझ्या मुलीला मी त्यांच्या सृजन आनंद विद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा. त्यांच्याविषयी मला थोडी माहिती होती. मी महिला दक्षता समिती या सेवाभावी संस्थेत कार्यशील होते. निमित्ताने त्या तिथे यायच्या. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर असायचा. थोडा धाकच म्हणाना! त्यांच्या वागण्यात आपुलकी असायची, पण नजरेत भेदकताही. तेव्हा त्या सेवानिवृत्तीच्या वाटेवर होत्या.

१९८५ मध्ये त्यांनी सृजन आनंद विद्यालय सुरू केलं. लवकरच या विद्यालयाच्या शिक्षण पद्धतीची समाजात चर्चा सुरू झाली. आमच्या घरापासून ही शाळा बरीच दूर होती. तरीही मुलीसाठी आम्ही ती निवडली आणि या शाळेत पालक म्हणून माझा प्रवेश झाला. तेव्हा विद्यालय एका साध्याशा कौलारू इमारतीत भरायचं. जणू काही बऱ्याच मुलांचं घरच. मुलं मोकळेपणी आतबाहेर करायची. आपापला वर्ग झाडायची. तिथे घंटा नव्हती. सगळ्या भिंती मुलांच्या कामांनी मुलांइतक्याच आनंदानं बहरलेल्या होत्या. हे दृश्य माझ्यासाठी अलिबाबाची गुहाच होती. असं नैसर्गिक शिक्षण माझ्यासाठी अनोखं होतं. लीलाताई पहिली ते चौथीपर्यंत सगळ्यांना मराठी शिकवायच्या. प्रत्येक मुलाकडे त्यांचं बारीक लक्ष असे आणि पालकांकडेही असतं असं माझ्या लक्षात आलं होतं. माझ्या मुलीला शाळेत पोचवायला मी रोज जात असे. तेव्हा त्या काही ना काही माझ्याशी बोलायच्या. कदाचित माझ्या अंगावरचे खादीचे कपडे आणि मुलीला सायकलीनं पोचवते यामुळेही असेल. मी मात्र त्यांच्यापासून लांब लांबच असे.

विद्यालयात वरचेवर पालकसभा होत असत. त्या रसरशीत पालकसभा मी अनुभवू लागले. लीलाताई आमच्या मुलांबद्दलच बोलायच्या आणि आमच्या मुलांकडे आम्हाला बघायला शिकवायच्या. मुलांबरोबर घरात करता येण्यासारखे वेगवेगळे उपक्रम सुचवायच्या. आम्हा पालकांबरोबर भाषिक खेळ खेळायच्या. विचार करा आणि प्रतिसाद द्या असे छोटे छोटे

बौद्धिक खेळ घ्यायच्या. डोक्यात खळबळ उडवून टाकायच्या. पालकांना विद्यालयाच्या उपक्रमात सहभागी होण्याचं सुचवायच्या. त्यासाठी नावं देणाऱ्यांच्या सभा कोणाच्या ना कोणाच्या घरी व्हाव्यात असंही सांगायच्या. तशा त्या सभा आमच्याही घरी होऊन लागल्या. मी लीलाताईंमध्ये गुंतत गेले. लीलाताईंभोवती पालकांचं मोहोळ उभं राहिलं. पालकांमधील ऊर्जा शोधत, त्यांच्यातील विविध कौशल्यांचा मागोवा त्या घेत. लीलाताईंचं तरुणाईसोबत नेहमीच जास्त जुळत असे. आम्ही काही पालक त्यांच्या प्रयोगात सहभागी झालो. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारेही आपला वेळ विद्यालयाला देऊ लागले. लीलाताईंच्या लेखांची प्रेसकॉपी तयार करणं, शिबिरांमध्ये मदतीसाठी सहभागी होणं अशा अनेक कामांत आपापल्या क्षमतेप्रमाणे सामील झालो. ही एक नवीनच सृजनयात्रा सुरू झाली. १९८५ ते २००० हा विद्यालयाचा त्यांनी मुद्रांकित केलेला काळ आहे.

माझ्याकडे शिक्षकप्रशिक्षणाचं प्रमाणपत्र नसताना १९८८पासून मी सृजन आनंद विद्यालयात शिक्षक झाले. आमच्यापैकी बरेच शिक्षक वेगवेगळ्या शाखांचे पदवीधर, द्विपदवीधर होते. काही जणांकडे हस्त-चित्रकला, क्रीडा, संगीत असे विशेष गुणही होते. कोणी पर्यावरणाचे अभ्यासक होते तर कोणी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य. वयाच्या अठरा वर्षांपासून ऐंशी वर्षापर्यंतचा आमचा हा शिक्षकवृंद सेवाभावी होता. सृजन आनंद विद्यालयाचं हे एक वैशिष्ट्य होतं आणि आहे, इथे समाजातील शिक्षणप्रेमी स्त्री-पुरुष स्वतःचं ज्ञान, कौशल्य, वेळ आणि संपर्क सारं काही विनामोबदला देतात. आमच्यात शिक्षकपण रुजवण्यासाठी लीलाताईंनी प्रशिक्षणाची अभिनव रीत शोधून काढली होती. वर्गात मागे बसून आम्ही लीलाताईंच्या तासाचं निरीक्षण करायचो. वयानं ऐंशीच्या घरात असतानाही लीलाताईंना कधी बसून शिकवलेलं मी पाहिलेलं नाही. वर्गात त्या मुलांमध्ये फिरत असायच्या. त्यांचा वर्ग कसा टवटवीत असायचा. मुलं पुढे येऊन त्यांना लिहिलेलं दाखवायची. फळ्यावर लिहायला सांगितलं की पटकन लिहायची. एखादा शब्द उलगडण्यासाठी वर्गात मुलं आणि ताई नाटक घडवायचे. तासात भाषिक खेळांची रेलचेल असायची. प्रत्येक मूल त्यात सहभागी असायचं. मुलांमध्ये आंनदी हलचल असायची. मुलांचं लेखन त्या आवर्जून तपासायच्या. मुलंच काय, मागे तास पाहायला बसलेल्यांनाही लीलाताई कधीही प्रश्न विचारून तल्लख ठेवायच्या. त्यांच्या अखेरच्या तासापर्यंत त्यांच्या हातात तासाचं टिपण असायचं. आपल्या तासाच्या नोंदी स्वतःच्या हस्ताक्षरात त्या नोंदवहीत करायच्या. पाहिलेल्या तासातून काय शिकलात हे निरीक्षक शिक्षकांना आवर्जून विचारायच्या.

विद्यालयाच्या साप्ताहिक शिक्षकसभा आणि वार्षिक शिक्षकसभा अभ्यासपूर्ण असत. विद्यालयाची नीतिमूल्य प्रत्येकानं अंगीकारावीत असं वातावरण विद्यालयात होतं. लीलाताई उत्तम शिक्षक होत्या त्याहून त्या उत्तम शिक्षकप्रशिक्षक होत्या. त्यांनी योजलेले सगळेच उपक्रम अनोखे होते. इथला कोणताही उपक्रम हा सहशालेय उपक्रम नसे. तो तर शिकण्याचा भाग असायचा. सहलीकडे पाहण्याची



वेगळी दृष्टी त्यांनी दिली. प्रकल्प, सुशोभन यांना त्यांनी खास अर्थ दिला. आपल्या विचारांचं सुशोभन करायची ताकद पहिलीतल्या सहा वर्षांच्या मुलातही असते, ती त्यांनी पाहिली. या सर्वांबद्दल त्यांनी विपुल लेखन केलं आहे.

१९८७ सालापासून लीलाताईंची सृजन आनंदाच्या प्रयोगातून निर्माण झालेली पुस्तकं प्रकाशित होऊ लागली. 'ऐलमापैलमा शिक्षणदेवा', 'शिक्षणातील ओअसिस', 'गाज बालिका वर्षाची', 'शिक्षण देता घेता' ही पुस्तकं अनुक्रमे १९८७-८८-८९ आणि ९१ साली सलग प्रकाशित झाली. यात मुलांच्या शिकण्याचे दाखले आहेत. त्यांना शिकतं करणाऱ्या अनुभवांची मांडणी आहे. पाठ्यपुस्तक एक साधन आहे त्यासाठी अनुभव देणं, समाजदर्शन घडवणं हे शिक्षक कसं करू शकतात हे वाचकांशी संवाद करत त्या लिहितात. ही सगळी पुस्तकं समीक्षकांनी नावाजली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या शिक्षकांना ती भिडली. त्यांची पत्रं येऊ लागली. अनेक संस्था लीलाताईंना आपल्या संस्थेत मार्गदर्शनासाठी बोलावू लागल्या. पुढच्या कृती व लेखनप्रवासात लीलाताई

अर्थपूर्ण शिक्षणाच्या शोधाला लागल्या होत्या. १९९९ साली त्यांचं 'अर्थपूर्ण आनंददायी शिक्षणासाठी' हे पुस्तक प्रसिद्ध झालं. विद्यालयातील कामाचे नमुने देत शिकण्याचा खरा अर्थ उलगडणारी आणखी काही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध झाली. २०११ मध्ये प्रकाशित झालेलं 'प्रवास ध्यासाचा...आनंद सृजनाचा' हे चौदावं पुस्तक म्हणजे त्यांचं कार्यचरित्र आहे. शिक्षकांना कार्यप्रवण करण्यासाठी त्यांनी त्यांची लेखणी झिजवली.

सृजन आनंद विद्यालयात आपल्या दररोजच्या अध्यापनाच्या नोंदी शिक्षक करतात. कोणताही उपक्रम झाला की प्रत्येकानं त्याचा अहवाल लिहिलाच पाहिजे अशी तिथे शिस्त आहे. शिक्षकांनी लिहिलं पाहिजे यासाठी लीलाताईंचे प्रयत्न असत. लेखनाचा वसा शिक्षकांनी उचलावा म्हणून १९९१ मध्ये विद्यालयातून सृजन आनंद शिक्षण पत्रिका निघू लागली. त्यातून शिक्षक लिहू लागले. हा अंक तिमाही असला तरी लीलाताई त्यासाठी किती झटत होत्या हे आठवलं की 'स्वतः करणं सोपं पण करवून घेणे अवघड' असं त्यांना तेव्हा वाटत असेल याची आता जाणीव होते. एका प्रजासत्ताकदिनी पालक, शिक्षक, मुलं आणि विद्यालयाचे मित्र यांनी एकत्र बसून पण स्वतंत्ररीत्या 'प्रजासत्ताकाची मशागत' या विषयावर लेखन केलं होतं. पुढे त्याचं पुस्तकही झालं. 'प्रत्येकाच्या विकास गतीला अखंड फिरता फेरा दे' एवढा एकच ध्यास घेऊन लीलाताई काम करत राहिल्या.

लीलाताई उत्तम प्रशासक होत्या. सुस्पष्ट आखणी, अचूक कार्यवाही, परखड मूल्यमापन, योग्य ती पोचपावती याचे असंख्य नमुने विद्यालयात ठायी ठायी दिसतात. लीलाताईंनी वेळोवेळी लिहिलेली पत्रं हाही एक अभ्यासाचा विषय आहे. त्यांनी मुलांना लिहिलेल्या पत्रात मुलाने विचारलेल्या प्रश्नाचं समाधान होईल असा आशय व वाक्यरचना असे. प्रसंगानुरूप त्या शिक्षकांनाही पत्र लिहीत. त्यातून शिक्षकाची आवश्यक तेवढीच प्रशंसा करीत. मान्यवरांना लिहिलेल्या पत्रांत सविस्तर विवेचन असे, त्यात आब राखलेली विनम्रता दिसे. त्यांची अनावृत्त पत्रं विचारप्रवर्तक, भूमिका घेणारी असत. पत्रलेखनातली त्यांची तत्परता वाखाणण्यासारखी होती. लीलाताई निर्भय होत्या. त्या कल्पक, योजक होत्या.

ना.सी. फडके यांच्या सुसंकृत संपन्न कुटुंबात त्यांचं बालपण गेलं होतं. विद्यार्थिदशेत असताना देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचं वारं त्यांनी चाखलं होतं. वयाच्या अठराव्या वर्षी लीलाताईंनी दलितमित्र बापूसाहेब पाटील यांच्याबरोबर आंतरजातीय प्रेमविवाह केला. कर्मवीर भाऊराव पाटील त्यांचे मामेसासरे. त्यांचा आणि जे.पी. नाईकसाहेबांचा त्यांना सहवास लाभला. या दोघांचा लीलाताईंवर प्रभाव होता. दोघांच्या त्या वैचारिक-कृतिशील वारसदार आहेत.



**लीलाताई पाटील**

लग्नानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं. प्रथम माध्यमिक शाळेत शिक्षकपदी रुजू झाल्या. मग प्राध्यापक आणि पुढे २८ वर्षं प्राचार्यपद सांभाळलं. त्यांच्यातील बौद्धिक चमक, सचोटी, नैतिक अधिष्ठान आणि सर्जनधुंदीमुळे त्यांनी तो महाविद्यालयीन प्रचार्यपदाचा काळ देदीप्यमान केला.


शासकीय सेवेच्या निवृत्तीनंतरचं लीलाताईंचं लेकरू म्हणजे सृजन आनंद विद्यालय. ते सांभाळत त्यांनी सृजन आनंद शिक्षण केंद्रामार्फत महाराष्ट्रभर अनेक ठिकाणी शिक्षणवर्ग, शिक्षक-प्रशिक्षणं घेतली. ही जणू काही सृजन आनंदची फिरती प्रयोगशाळा होती. याबरोबरच महिला दक्षता समिती, संयुक्त महिलादिन व्यासपीठ यातून स्त्रियांच्या सबलीकरणासाठी त्यांनी पाठपुरावा केला. 'अभिआस' हा वाचणाऱ्या स्त्री-पुरुषांचा गट उभा केला. वाचा, मत मांडा, चर्चा करा, विचार चकमकीतून समाजभान जागवणारा हा गट गेली पंचवीस-तीस वर्षं समरसून वाचन करत आहे. बौद्धिक मैत्री ही देणगी त्यांना मिळाली आहे. लीलाताई समाजाच्या 'जागल्या' होत्या.

लीलाताई रसिक होत्या. कविमनाच्या होत्या. समांतर रंगभूमीचं त्यांना आकर्षण होतं. अभिजात चित्रपट, संगीताच्या त्या आस्वादक होत्या. कपडे, दागिने याबद्दल चोखंदळ होत्या. दाद देत खाणाऱ्या त्या खवय्याही होत्या.

महाविद्यालयातील त्यांच्या करारी रूपाचा मला अनुभव नाही. विद्यालय सुरू झाल्यावर तो कडक स्वभाव लोप पावत गेला. त्या चिकित्सक होत्या, पण उग्र नव्हत्या. अनेकांसाठी त्या आधारच होत्या. त्यांच्या वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षानंतर तर त्यांचे सगळेच पीळ सुटत गेले. त्या लहान बाळासारख्या निर्मळ, लोभस होत गेल्या. याच काळात माझी त्यांच्याशी जवळीक आणखीच वाढत गेली. माझ्या अंतःकरणात त्याच बाळ 'लीलाताई' मुक्तामाला आहेत. त्यांचा स्मरणसहवास हा आता आमच्यासाठी कायमचा मोहरलेला वृक्ष आहे..

**– सुचिता पडळकर**

भ्रमणध्वनी : ९४२०३२४७१३



# गटेनबर्ग आणि संगणकयुग यांच्यामधला दुवा

दीपक घारे

कमल शेडगे ह्यांची कारकीर्द मुद्रण तंत्रज्ञानाच्या आणि उपयोजित कलेच्या संक्रमणकाळात घडली. ते स्वयंशिक्षित चित्रकार होते, पण काळाची गरज ओळखून ते अक्षररचनेत आणि मांडणीत स्वप्रतिभेनं प्रयोग करत राहिले. ते करत असताना रामदासांनी घालून दिलेल्या बाळबोध अक्षरांची सौंदर्यतत्त्वे पाळून त्यांनी अक्षररचनेत आधुनिकता आणि विविधता आणली.

**कमल** शेडगे यांच्या जाण्यामुळे सुलेखन आणि अक्षररचनेच्या क्षेत्रातील एक प्रभावी कालखंड संपुष्टात आला. त्यांनी केलेल्या नाटकांच्या असंख्य जाहिरातींमुळे, वृत्तपत्रे, मासिके यांच्या लोगोज्‌मुळे आणि पुस्तकांच्या आकर्षक रंगसंगती असलेल्या मुखपृष्ठांमुळे ते सर्वसामान्य मराठी अभिरुचीचा एक भाग बनले. त्यांच्या कामाचं तोंडभरून कौतुक झालं, पण पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल अशा प्रकारचं त्यांच्या शैलीचं विश्लेषण आणि मूल्यमापन मात्र झालं नाही.

माझा आणि कमल शेडगे यांच्यातला समान दुवा अर्थातच सुलेखनकला आणि मुद्राक्षररचना हाच होता. त्यांच्याशी प्रत्यक्ष भेट आणि चर्चा होण्याचे प्रसंग मोजकेच आले. मी पुस्तक परीक्षणं लिहीत होतो त्या काळात कमल शेडगे महाराष्ट्र टाइम्सच्या कार्यालयात काम करत असत. तेव्हा ओझरती भेट होत असे. १९८८च्या सुमारास 'ललित' मासिकाच्या रौप्यमहोत्सवी अंकात मराठी पुस्तकांच्या निर्मितिवैशिष्ट्यांवर मी एक लेख लिहिला होता. त्यात अक्षररचनेच्या अराजकावर मी टीका केली होती. त्यात मी लिहिलं होतं,

'एकीकडे टाइपांच्या वळणांची अनुपलब्धता व दुसरीकडे बोजड, किरटी, चित्रांमध्ये मिसळून जाणारी अक्षररचना अशी मुखपृष्ठांची स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर कमल शेडगे यांची कामगिरी नजरेत भरते. इंग्रजी अक्षरांच्या धर्तीवर देवनागरी अक्षरांना विविध प्रकारची वळणं देऊन कमल शेडगे ह्यांनी मुखपृष्ठरचनेत आवश्यक असलेली शिस्त आणली.'

त्यानंतर 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कार्यालयात गेलो असताना शेडगे त्यांच्या जागेवरून उठून माझ्याकडे आले व म्हणाले, ''तुमच्या लेखातला अक्षरांचं अराजक हा शब्दप्रयोग खूप आवडला!''


मराठी पुस्तकांची मुखपृष्ठं करताना अक्षररचनेकडे होणारं दुर्लक्ष त्यांनाही कुठेतरी डाचत असावं.

कमल शेडगे यांच्याशी सविस्तर चर्चा करण्याचा योग आला तो त्यांच्या 'चित्राक्षरं' या पुस्तकाच्या निमित्तानं. या पुस्तकाला कमलाकर नाडकर्णी आणि माझी, अशा दोन प्रस्तावना असाव्यात अशी सुनील कर्णिक ह्यांची इच्छा

होती. शेडगे ह्यांची कामाची पद्धत, त्यामागची त्यांची विचारांची प्रोसेस मला जाणून घ्यायची होती. म्हणून मुलुंडला त्यांच्या घरी मी भेटायला गेलो आणि अनेक नाटकांच्या जाहिरातींमागच्या निर्मितीच्या कथा, निर्माते-प्रकाशकांचे बरेवाईट अनुभव त्यांनी सांगितले. त्यातून एक चांगली प्रस्तावना मला लिहिता आली. हे पुस्तक होतं २००२ मधलं.

सुलेखनकार अथवा कॅलिग्राफर म्हणून कमल शेडगे ओळखले जात असले तरी त्यांचा उल्लेख ग्राफिक डिझायनर म्हणून केला पाहिजे. कारण त्यांनी सुलेखन, अक्षरवळणं, जाहिरातींचं संकल्पन, लोगो डिझाइन, पुस्तकांची मुखपृष्ठं आणि पुस्तकांची मुद्राक्षर मांडणी अशी अनेक प्रकारची कामं केली जी डिझाइन या सदरात मोडतात. महत्त्वाचं म्हणजे कमल शेडगे ह्यांची कारकीर्द मुद्रण तंत्रज्ञानाच्या आणि उपयोजित कलेच्या संक्रमणकाळात घडली. ते स्वयंशिक्षित चित्रकार होते, पण काळाची गरज ओळखून ते अक्षररचनेत आणि मांडणीत स्वप्रतिभेनं प्रयोग करत राहिले. ते करत असताना रामदासांनी घालून दिलेल्या बाळबोध अक्षरांची सौंदर्यतत्त्वे पाळून त्यांनी अक्षररचनेत आधुनिकता आणि विविधता आणली.

अक्षरमुद्रण म्हणजेच लेटरप्रेस, मग ऑफसेट आणि डिजिटलपर्यंतचे मुद्रणपद्धतींमधील बदल आणि त्या अनुषंगानं खिळे जुळवण्यापासून फोटोटाइपसेटिंग आणि डिजिटल फॉँट्सपर्यंत झालेलं मुद्राक्षरनिर्मितीमधील संक्रमण अशा जवळपास अर्धशतकाचे ते साक्षीदार आणि सक्रिय घटकही होते.



**कमल शेडगे**




**कमल शेडगे यांच्या सुलेखनाचा आविष्कार**

अक्षरांच्या संकल्पनांतले सूक्ष्म फरक बऱ्याचदा लक्षात घेतले जात नाहीत. कॅलिग्राफी अथवा सुलेखन हे अधिक उत्स्फूर्त आणि मुक्त असतं. मुद्राक्षरसंच तयार करणारा फॉँट डिझायनर अक्षरवळणं तयार करतो आणि त्याचं रूपांतर खिळ्यांमध्ये अथवा डिजिटल टाइपमध्ये केलं जातं. कमल शेडगे ह्यांनी सुलेखनशैलीत आपला ठसा उमटवलाच, पण त्यांनी जी अक्षरवळणं तयार केली ते खरं तर फॉँट्सच होते. मात्र त्याचं रूपांतर खिळ्यांमध्ये वा डिजिटल फॉँट्समध्ये झालं नाही. कारण ज्या काळात त्यांनी अक्षरवळणं तयार केली तेव्हा हे शक्य नव्हतं. देवनागरीमध्ये ठरावीक वळणाची मुद्राक्षरं होती. इंग्रजीसाठी वापरली जाणारी रोमन अक्षरवळणं त्यांच्या सेरिफ-सान्स सेरिफ वैशिष्ट्यांसह देवनागरीत आणण्याचं महत्त्वाचं काम शेडगे ह्यांनी केलं. मराठी अक्षरमांडणीमध्ये अर्थवाहक विविधता आणली. त्यामुळे इंग्रजी मुद्राक्षरकलेमध्ये जी संवेदनशीलता होती ती शेडगे ह्यांनी मराठीत आणली.


नाटकांच्या जाहिराती, पुस्तकांची मुखपृष्ठं यात त्यांनी नवे प्रवाह आणलेच, शिवाय अक्षरवळणांचं त्यांनी केलेलं काम अधिक मूलभूत स्वरूपाचं आहे. देवनागरी अक्षररचनेच्या संदर्भातला गटेनबर्ग आणि संगणकयुग यांच्यामधला एक महत्त्वाचा दुवा म्हणूनच कमल शेडगे कायम लक्षात राहतील.

**– दीपक घारे**
भ्रमणध्वनी : ९१६७७६४३२८
gharedeepak@rediffmail.com

॥ग्रंथाली॥※॥

**भगवान इंगळे यांची आगामी तीन पुस्तके!**

**ढोर**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**भिडू**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**उभारणी**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



# कोरोनापश्चात कलाजगत

दीपक राजाध्यक्ष

कोविड-१९च्या पश्चात प्रेक्षकांची अपेक्षा जाणून घेऊन त्या पद्धतीनं कार्यक्रमांची आखणी करण्याची जबाबदारी या माध्यमावर आहेच, आणि त्यासाठी माणसांच्या मनाचा तळ गाठावा लागेल. माणसांचं दु:ख हलकं करत, येणारा दिवस अधिक चांगला आहे हा आशावाद नव्यानं रोज निर्माण करत राहावं लागतंच, आता त्यात ही आशा तीव्र करण्याची गरज असेल.

**आधुनिक** आणि उत्तर आधुनिक काळात तंत्रज्ञानात होत जाणाऱ्या बदलांच्या झपाट्याचा वेग इतका तीव्र आहे की तो पकडू जाईस्तो माणूस शिळा होऊन जातोय. विचार करायलाही उसंत देत नाहीत हे बदल, इतके अतितीव्र!

रोजच्या जगण्यात नसलेली उसंत, विचाराशिवाय केवळ आहे तसं सामोरं येईल तसं जगत राहण्याची ही काळाची सक्ती मनुष्यप्राण्यासमोरचं एक जबरदस्त आव्हान आहे. चेंज इज कॉन्सटंट ही वस्तुस्थिती मान्य करूनही माणसाला या वेगाची झिंग चढली आहे आणि ही झिंग माणसाला पुन:पुन्हा आपल्या बुद्धीला चालना देत का होईना हतबल करते आहे.

यापूर्वीही जगभरात किंवा जगाच्या एखाद्या भूभागात नैसर्गिक प्रकोप, साथीचे आजार, युद्ध-महायुद्ध, आर्थिक/सामाजिक अशांतता इत्यादी निर्माण करणारे प्रश्न निर्माण झाले आहेतच, परंतु एकाच वेळी सगळं जग ठप्प पडल्याची ही सर्वार्थानं अद्‌भुत आणि अपवादात्मक घटना मोजक्याच वेळी घडली असेल. सध्या आपण सर्वच या परिस्थितीचा अनुभव घेत आहोत. जागतिक लॉकडाऊन, विकसित- विकसनशील- अविकसित देश, श्रीमंत-गरीब, जाती, धर्म, वंश, पंथ, आस्तिक-नास्तिक याविरहित माणसाला त्याच्या मर्यादा दाखवणारी ही स्थिती आणि त्यावरील नेमका उपाय अद्याप न सापडल्यानं येणारी अगतिकता सार्वत्रिक दिसून येते.

या विषाणूची निर्मिती आणि त्याचा प्रादुर्भाव हे संकट नैसर्गिक की मानवनिर्मित याचा ऊहापोह सुरू झालाय, होत राहील... असंख्य conspiracy theories मांडल्या जात आहेत आणि जात राहतील... यावर नेमकं औषधही सापडेल. ही तिसऱ्या महायुद्धाची नांदी होती अथवा अन्य काही हे काळ ठरवेल, पण एका विषाणूनं अखिल मानव जातीला; पर्यायानं जगाला आपल्या दहशतीनं वेठीस धरलं हे मात्र इतिहासात नक्की नोंदवलं जाईल.

अशा मानवी संकटाच्या वेळी जीवनाकडे सम्यक दृष्टीनं पाहण्याची, काळाचा अन्वयार्थ समजून घेण्याची आणि हे पचवून नव्यानं जीवनाला सामोरं

जाण्याची प्रगल्भ दिशा साहित्य, संगीत, नृत्य, चित्रपट, नाटक, चित्रकला अशा विविध माध्यमांनी आजवर दिली आहे. सदर काळात उद्भवलेल्या परिस्थितीचा परिणाम त्या त्या कलेतील सादरीकरणावर (expression) झालाच आहे, याबद्दल आपल्याला माहीत आहे.

'गरज ही शोधाची जननी असते.' जगणं सुसह्य व्हावं या कारणानं, जीवन जगत असताना सृष्टीची रचना आणि रहस्यं समजून घ्यावी, जगण्याचं तत्त्व शोधावं अशा नैमित्तिक अथवा तार्किक प्रश्नांची उकल करण्याच्या गरजेतून भाषा, वैज्ञानिक, तंत्रज्ञानात्मक शोध लागले. कलाही माणसाला त्यातूनच सापडली. किंबहुना तिला कलेचा दर्जा फार काळानं प्राप्त झाला. त्या वेळी मात्र जगण्याच्या निकडीतून सापडलेला उपाय होता. उदाहरणार्थ, चित्रकलेचा उगम हा मानवाला जंगली श्वापदाच्या शिकारीसाठी आखायच्या नियोजनातून झाला असं इतिहास सांगतो. साधारणत: याच पार्श्वभूमीवर सादरीकरणाच्या कलेचाही उगम झाला असं दिसून येतं.

समस्येवर उत्तर देणं हे कलेचं कार्य नसून, कलावंत सदर परिस्थितीचा विचार करता प्रश्न उपस्थित करत जीवनाचं सत्य शोधायचा प्रयत्न करत वाचक/रसिकाला विचार करायला भाग पाडत असतो. या प्रक्रियेत त्या कलावंताची निरीक्षणशक्ती, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सर्जनशीलता, एकाहून अधिक बिंदूंमधील साम्यभेदांचा अन्वयार्थ लावण्याची तार्किक तशीच भावनिक क्षमता अशा विविध घटकांनी एखादी कलाकृती घडते आणि जितका तादात्म्यभाव कमी-अधिक सखोल तितकी अधिक ती कलाकृती काळाच्या कसोटीवर टिकते/शिळी होते.

काळाच्या बदलत्या परिणामांमुळे सदर कलाकृतीचे संदर्भ काळानुररूप बदलतात हे जरी खरं, तरी तिच्यातील तत्त्व/सत्त्व कालातीत असलेलं जाणवत राहतं.

दोन्ही महायुद्धांनंतर, हिरोशिमा/नागासाकीचे पडसाद जगभरातील सर्व बाबींवर सर्वार्थानं तीव्रतेनं उमटले. त्याचबरोबर भारतात स्वातंत्र्यलढा, गांधीहत्या, चीनशी युद्ध, पाकिस्तानबरोबरची युद्धं व त्यातील विजय, आणीबाणी, स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसचा पराभव होऊन स्थापन झालेलं जनता सरकार व त्याचं पतन, इंदिरा गांधींचं पुनरागमन, त्यांची हत्या, राजीव गांधीच्या काळातील माध्यमक्रांती, शहाबानो प्रकरण, राममंदिर रथयात्रा, मंडल आयोग आणि आरक्षण धोरण; तसंच महाराष्ट्रात राज्यस्थापना, त्यासाठी झालेलं १०६ हुतात्म्यांचं बलिदान आणि मुंबईचा समावेश, दलित/जागतिक स्त्री-पुरुष समानतेचे वारे, तत्कालीन मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर आंदोलन अशा अनेक घटनांचे पडसाद जगण्याच्या आणि म्हणून कलेच्या विविध प्रांतांत कमी-अधिक तीव्रतेनं उमटले आहेत. तंत्रज्ञानातील नावीन्याच्या वेगानं तर संपूर्ण जगाला बदलवून घ्यायला भाग पाडलं आहे. सोय म्हणून येणारी वस्तू आपल्या इंद्रियाइतकी गरजेची होऊन राहते ही मानवाच्या बुद्धीचं तेज आणि मर्यादा एकाच वेळी अधोरेखित करते.

अर्थातच तंत्रज्ञानामुळे सतत कनेक्टेड राहणं, कुठच्याही विषयावर एका क्लिकवर माहितीचा स्रोत चोवीस तास उपलब्ध असणं, एकूणात कल्पनेपलिकडचं. अनंत एक्स्पोजरना माणूस तयार झाला आहे. माहिती प्रचंड आणि हवी तेव्हा हवी ती मिळत असूनही जगण्याच्या मूलभूत प्रश्नांच्या कटकटीतून सुटका नाही, त्यातून वाढत जाणारा हव्यास, त्यातून येणारी अपेक्षाभंगाची दु:खं, त्यातून सोडवणुकीसाठी मन रमवण्याची अन्य साधनं अशा अस्वस्थ चक्रात माणूस गुंतला आहे.

या सगळ्या अवस्थेला भेदून जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ, संशोधक, कलावंत सातत्यानं करत आहेत. सार्वकालिक आणि अंतिम सत्य आजवर सापडलं नाही.. सत्य हे सापेक्षतेचा शाप घेऊन जन्माला येतं, परंतु तत्कालीन परिस्थितीचं अर्थनिर्णयन अमुक एका पद्धतीनं झाल्याचा संदर्भ पुढील पिढीला/पिढ्यांना निश्चित दिशादर्शक ठरत असतो. इतिहासाचे अन्वयार्थ बदलले जाण्याच्या, खोटं बोला पण रेटून बोला म्हणजे कालांतरानं तेच खरं म्हणून स्वीकारलं जातं असं मानण्याच्या आजच्या काळात हे दिशादिग्दर्शनही आव्हान आहेच!

आजचा हा लॉकडाऊनचा काळ कधीतरी संपेल आणि कोरोनाच्या हातात हात घालून जनजीवन सुरळीत होईल, माणसानं या विषाणूवर विजय मिळवल्याच्या कथा साभिमान इतिहास सांगेल. प्रश्न असा, की या काळाचा जीवनावर झालेल्या परिणामामुळे, भीती/असुरक्षित वातावरणानं ढवळून निघालेल्या माणसाला आनंद आणि शांतता आपल्या आतच शोधून टिकवायला हवं हे समजेल काय? की पुन्हा जगण्याच्या रहाटगाडग्यात तो वाहत जाईल? पूर्वीप्रमाणे तो नाटक, चित्रपट, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, सोशल नेटवर्क आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरून सादर होणाऱ्या मनोरंजनात मश्गुल होईल की त्याच्या अपेक्षा आता बदललेल्या असतील?

गेली २० वर्षं मी नाटक आणि दूरचित्रवाणी माध्यमात काम करत असल्यामुळे त्याविषयी काही अंदाज व्यक्त करतो.

भारतीय आधुनिक नाटकात- विशेषत: विजय तेंडुलकर, मोहन राकेश, डॉ. धर्मवीर भारती, गिरीश कर्नाड, मधु राय, बादल सरकार या नाटककारांनी - बदलत्या सामाजिक, राजकीय, कौटुंबिक प्रवाहांमुळे मानवी नातेसंबंधांवर होणाऱ्या तत्कालीन आणि दूरगामी परिणामाचं वेधक चित्रण आपल्या कलाकृतींमधून केलं आहे. नाटकांचे पोत, रचना, घाट, कथावस्तू, मांडणी अशा अनेक अंगांनी त्यांच्या प्रगल्भ कलाकृतींनी पूर्वसुरींविरोधात प्रसंगी बंडाचा झेंडा हाती घेत नवा विचार मांडला आहे. हा वारसा पुढील पिढ्यांसाठी आश्वासक ठरला आणि तेव्हाची बिकट वाट ही पुढे काही प्रमाणात का होईना वहिवाट झाली.

चित्रपटातही सातत्यानं स्थित्यंतराचे पडसाद उमटत राहिले आहेत.

दूरचित्रवाणी हे माध्यम दुर्दैवानं मनोरंजनाच्या क्षेत्रात सकस माध्यम म्हणून ओळखलं जात नाही. म्हटलं तर हे माध्यम सगळ्यात सोपं, पण त्याच वेळी सर्वात अवघड. सहज उपलब्ध असल्यामुळे टीका करून बडवायला तर अत्यंत सोपं! या माध्यमात सर्वार्थानं झालेले झालेले बदल- प्रेक्षक, व्यावसायिक गणितं, मोजमापनाची पद्धत, लक्षात न घेता स्वैर टीका करण्यात या क्षेत्रातील काही

तथाकथित विचारवंतही अग्रस्थानी असतात तिथे इतरांबद्दल न बोललेलंच बरं!

काळानुरूप या माध्यमातही वेगवान बदल झाले. निरक्षरांनाही हे माध्यम आपलं वाटतं याचं कारण त्यांचा आणि समाजातील सर्व वयांच्या, सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक घटकांचा भावनिक परिपोष हे माध्यम पुरेपूर करतं. उद्याचा दिवस आजच्यापेक्षा अधिक चांगला असेल असा आशावाद निर्माण करतं. नाटक, चित्रपट पाहण्यासाठी माणसांना घरातून बाहेर पडावं लागतं; पण दूरचित्रवाणी रोज आपल्या घरात प्रवेश करते. आपल्या नित्यनेमानं सुरू असलेल्या दिनचर्येत आपलं लक्ष वेधून घेते.

भारतात कितीही आव्हानं आली तरी संयुक्त कुटुंबपद्धतीमुळे आणि जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व प्रसंग एकत्रित साजरे करण्याच्या मानसिकतेमुळे दूरचित्रवाणी हे माध्यम अमर आहे. घरटी एक दूरचित्रवाणीसंच असणारी घरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन या माध्यमाचा आस्वाद घेतं. सुरुवातीला केवळ नेमक्या प्रतिष्ठित घरांमध्ये असणारे दूरचित्रवाणीसंच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरांतून सर्रास दिसू लागले आणि या व्यवसायाची गणितं झपाट्यानं बदलली. अभिजनवर्गाकडून प्रेक्षकांची सत्ता बहुजनवर्गाकडे आली आणि या माध्यमाची, व्यवसायाची समीकरणं बदलली. विषयांची निवड, स्टोरी टेलिंग पद्धत या समीकरणानं तपासून-बदलून घेत ताजीतवानी करत राहण्याची निकड निर्माण झाली. या प्रक्रियेतही काही ना काही प्रयोग होत राहिले आणि राहतील. हे माध्यम प्रत्यक्ष प्रेक्षकशरण माध्यम आहे, ज्यात प्रेक्षकांची गरज आणि सर्जनशील निर्मिती यातील दुवा म्हणजे दूरचित्रवाणीत काम करणारी टीम.

कोविड-१९च्या पश्चात प्रेक्षकांची अपेक्षा जाणून घेऊन त्या पद्धतीनं कार्यक्रमांची आखणी करण्याची जबाबदारी या माध्यमावर आहेच आणि त्यासाठी माणसांच्या मनाचा तळ गाठावा लागेल. माणसांचं दु:ख हलकं करत, येणारा दिवस अधिक चांगला आहे हा आशावाद नव्यानं रोज निर्माण करत राहावं लागतंच, आता त्यात ही आशा तीव्र करण्याची गरज असेल.

दूरचित्रवाणी हे माध्यम सर्जनप्रक्रियेच्या दृष्टीनं कथावस्तूपेक्षाही व्यक्तिचित्रप्रधान माध्यम आहे. त्या व्यक्तिरेखा आपल्या घरातील माणसं आहेत असं वाटू लागणं हे त्यांचं यश असतं. त्यांच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींमध्ये, रोजच्या जगण्यात प्रेक्षक गुंतून जातात, त्यांना कळत-नकळत फॉलो करू लागतात, ही रोज घडणारी गोष्ट आहे. या माध्यमाचा प्रेक्षकांवर होणारा सखोल प्रभाव माध्यमकर्त्यांची जबाबदारी जोखमीची आहे ही जाणीव तीव्र करतो.

येणाऱ्या काळात या आव्हानाचा सामना करण्याची तयारी आम्ही सर्व माध्यमकर्ते करत आहोत. सध्याच्या सार्वत्रिक अनिश्चिततेच्या काळात माध्यमं समाजाला सकारात्मकतेकडे नेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतील यात शंका नाही.

बदल काय आणि कसे होतील यावर आताच काही भाष्य करणं अवघड आहे. लॉकडाऊननंतर माणसं रोजचं जगणं सावरण्याला सर्वोच्च प्राधान्य देतील या स्वाभाविक वास्तवाला धरून त्या तालात आम्हा सगळ्या वाहिन्यांना अलवार सहभागी व्हावं लागेल.

आताचं सगळं जाऊन सगळं नवीन आल्यानंच हे साध्य होईल असं म्हणणं हा भाबडेपणा ठरेल.

घरात कुणाचं निधन झाल्यानंतरसुद्धा एका विशिष्ट काळानं, काळाच्या रेट्यात बाकीचे सगळे हळूहळू आपलं जगणं पूर्वपदावर आणतात हे निसर्गाचं चक्र आहे.. तद्वत कोरोनाकाळापश्चातदेखील जग पूर्ववत होताना दूरचित्रवाणी माध्यम आपला सकारात्मकतेचा, धीर देण्याचा, आशेचा किरण आणण्याचा वसा उचलेल.

अस्लम परवेझ हे माझे नाटककार मित्र म्हणतात, मोठे प्रश्न मोठी माणसं, छोटे प्रश्न खुजी माणसं जन्माला घालतात.

या विषाणूनं निर्माण केलेली परिस्थिती माणूस कुठल्या अर्थानं घेतो यावरच त्याचं आणि कलेचं भवितव्य ठरेल!

(मुंबई विद्यापीठाच्या ‘संभाषण’ या अंकातून पुनर्मुद्रित)

**– दीपक राजाध्यक्ष**
directordeep789gmail.com


॥ग्रंथाली॥


वंश अनुवंश

**डॉ. हेमा पुरंदरे**

शब्दांकन
**उज्ज्वला गोखले**




हार्ड बाउंड मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रुपये
पेपरबॅक मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रुपये




घातसूत्र

**दीपक करंजीकर**

मूल्य ८०० रु.
सवलतीत ५०० रुपये



# चित्रांमध्ये जीव फुंकणारा जादूगार

अपर्णा पाटील

पस्तीस वर्षं ॲनिमेशनच्या जगाचा अनभिषिक्त राजा म्हणून वावरलेले लेखक-दिग्दर्शक केली ॲजबेरी यांचं २८ जून रोजी कर्करोगानं निधन झालं. मुलांचा सिनेमा म्हणून या चित्रपटांकडे पाहू नका, असं सांगत त्यांनी मोठ्यांनाही ॲनिमेशनपटांकडे खेचून आणण्याचं काम केलं. मुलांच्या जगात आनंद निर्माण करताना मोठ्यांनाही त्यात आपलं प्रतिबिंब पाहायला शिकवलं.

**अमेरिकेतल्या** टेक्सासमधल्या ब्युमाँट शहराचा चेहरामोहरा साठ वर्षांपूर्वी निराळाच होता. नोकरदारांचं वास्तव्य असलेल्या गावाच्या ज्या काही खाणाखुणा असतात, त्या या गावातही दिसायच्या. इथे कोणी हॉलिवूडमध्ये जाऊन नाव कमावण्याचा विचार गंमत म्हणून जरी सांगितला असता, तरी त्याला वेड्यात काढलं गेलं असतं. कारण इथे राहत असलेल्या प्रत्येकाचं स्वप्न एखादी नोकरी करावी, आपल्या मालकीची एखादी कार असावी, यापलीकडचं नव्हतंच. केली ॲजबेरी तिथेच जन्मले होते, पण त्यांची स्वप्नं वेगळी होती. वेगळीच नाही तर अद्भुत होती. त्यांची स्वप्नं अख्ख्या जगानं उघड्या डोळ्यांनी नुसती पाहिली नाही तर अनुभवली.

केली यांना लहानपणापासून चित्रं काढायला आवडायचं. त्यांचे वडील नौदलात होते. दुसऱ्या महायुद्धात ते सहभागी झाले होते. खरं तर लष्करी शिस्तीत राहण्याची सवय असलेली माणसं घरातही शिस्तीचा बागलबुवा करतात, असं साधारणपणे चित्र असतं. केली यांचे वडील मात्र त्याला अपवाद होते. गोष्टी सांगणं त्यांना खूप आवडायचं. ते नुसत्या गोष्टी सांगायचे नाहीत तर चित्रंही काढायचे. केलीला गोष्टीचा मुखडा ऐकवायचे, मग केली ती गोष्ट चित्रातून पुढे न्यायचा. मग ते चित्र काढायचे. असा सिलसिला गोष्टीच्या मजेशीर शेवटापर्यंत सुरू राहायचा. केली यांच्या पुढच्या आयुष्याचा श्रीगणेशा असा त्यांच्या घरातच झाला होता.

केलीच्या घरातलं हे वातावरण त्यांना कधीतरी हॉलिवूडच्या सगळ्यात मोठ्या आणि सगळ्याच स्टुडिओपर्यंत नेईल, असं त्यांनाही कधी वाटलं नसेल. ते तसं घडलं, ते गावातल्या ॲंडरसन थिएटरमुळे. या थिएटरमध्ये एक-दोन वर्षांच्या अवधीनंतर एखादा ॲनिमेशनपट लागायचा. त्यामुळे तो चुकवण्याचा प्रश्नच नसायचा. ते सात वर्षांचे असताना, त्या थिएटरमध्ये 'स्नो व्हाइट ॲंड सेव्हन ड्वार्फ' लागलेला होता. ते आणि त्यांचा भाऊ सिनेमा पाहायला गेले. सिनेमा पाहताना ते इतके रंगून गेले, की 'मला ना माझीही चित्रं अशीच हलती-बोलती व्हायला हवीत असं वाटतंय', असं त्यांनी भावाला सांगून टाकलं.

केली यांनी वयाच्या सातव्या वर्षी व्यक्त केलेली इच्छा त्यांना थेट हॉलिवूडच्या सगळ्यात मोठ्या अशा डिस्नी स्टुडिओपर्यंत घेऊन गेली.

केली यांनी आपण ॲनिमेटर व्हायचं, हे वयाच्या सातव्या वर्षीच ठरवलं असलं तरी त्यासाठी काय करायचं, याचा त्यांच्या बालमनाला काही अंदाजच नव्हता. शाळा सुरू होती. चित्रं काढणंही. पण त्यानं काही आपण ॲनिमेटर होणार नाही, हे मात्र कळून चुकलं होतं. ते बारा वर्षांचे झाले, त्याच वर्षी त्यांच्या वडिलांचं कर्करोगानं निधन झालं. आपल्या वडिलांचं असं अचानक आपल्यातून निघून जाणं, त्यांच्या मनावर कायमचं ओरखडा उमटवणारं ठरलं. एका रात्रीत मोठं होणं काय असतं, ते त्यांनी अनुभवलं. घरची परिस्थिती तर ओढगस्तीची झालेली अशावेळी, कॉमिक्स घेण्यासाठीही पैसे नसायचे. मग ते आपणच काढलेल्या चित्रांमध्ये रंगून जात.



केली अॅजबेरी

आपण ॲनिमेटर व्हायचं, या एकाच इच्छेनं झपाटलेल्या केली यांनी, डिस्नी स्टुडिओला पत्र पाठवलं. 'मला तुमच्याबरोबर काम करायचंय', असं त्यातून कळवलं, तेव्हा ते अवघे पंधरा वर्षांचे होते. त्यांचं वय पाहता त्यांच्या या इच्छेचा विचार करण्यासारखी परिस्थिती नव्हती. मात्र पत्राची दखल घेतली गेली. डिस्नीमध्ये त्यावेळी काम करत असलेले आर्ट डायरेक्टर केन अँडरसन यांनी केलीचं पत्र डोनाल्ड डकवॉल यांच्याकडे दिलं. आपल्या सगळ्यांना डिस्नीचं कार्टून डोनाल्ड डक माहीत आहे. पण तशा नावाशी साम्य असलेली व्यक्ती होती, याचं त्यांनाच आश्चर्य वाटलं. तर ही व्यक्ती डिस्नी स्टुडिओमधील प्रोडक्शन मॅनेजर म्हणून परिचित होती. त्यांनीच केलीना कॅलिफोर्नियाला असलेल्या आर्ट कॉलेजला जाऊन ॲनिमेशन शिकून तर घे, मग पाहू, असा सल्ला दिला. तोवर असं काही शिकवणारं कॉलेज असतं, हेही केली यांना ठाऊक नव्हतं.

आपलं ध्येय निश्चित असलं की माणसाला रोखणं कठीणच असतं. तसंच काहीसं केली यांच्या बाबतीत घडलं. त्यांनी कॅलआर्टला (कॅलिफोर्निया आर्ट्सचं लघुरूप) प्रवेश घेतला. ते शिकत असतानाच 'लाइफ' मासिकात डिस्नीच्या आगामी सिनेमांविषयी वृत्त त्यांच्या वाचनात आलं. त्या मासिकात डिस्नी एक महत्त्वाकांक्षी ॲनिमेशनपट करण्याच्या तयारीत आहेत, त्याचं नाव 'द ब्लॅक कॉल्ड्रन' असून तो पुढील वर्षांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे, तसंच तो १९८४ साली प्रदर्शित होईल, असं त्यात म्हटलं होतं. ती बातमी वाचत असताना ते शेजारी बसलेल्या आपल्या मैत्रिणीला म्हणाले, हा सिनेमा मी करणार! इतका आत्मविश्वास केली यांना होता, तो त्यांचा आपल्या स्वप्नांवर असलेल्या विश्वासामुळेच. तसं घडलंही.

शिक्षण सुरू असतानाच त्यांच्या मित्राचा त्यांना फोन आला. डिस्नीमध्ये तो नुकताच कामाला लागला होता. त्यानं केली यांना सांगितलं, की इथे नवोदितांची गरज आहे. मी तुझं नाव सुचवलंय, तू ये. केली यांनी डिस्नीच्या स्टुडिओत कर्मचारी म्हणून प्रवेश केला. त्यानंतर जवळपास पस्तीस वर्षं हॉलिवूडमधल्या प्रत्येक मोठ्या नामांकित स्टुडिओसाठी त्यांनी काम केलं. खरं तर त्यांनी काम सुरू केलं त्यावेळी दोन-तीन स्टुडिओ सोडले तर बाकी बाल्यावस्थेत होते. तरीही केवळ नवं आव्हान स्वीकारण्याच्या वृत्तीमुळे ते नव्या-नव्या संधीला होकार देत गेले. जसे स्टुडिओ मोठे होत गेले, तसं केली यांच्याकडे येणारं कामही वाढत गेलं.

आपल्या मैत्रिणीला सांगितल्याप्रमाणे 'द ब्लॅक कॉल्ड्रन' त्यांनी केला. त्याची आठवण सांगताना ते मुलाखतीत नेहमीच हळवे व्हायचे. पडद्यावरच्या नामावलीत आपलं नाव पाहून ते भावूक झाले होते. ऐंशीच्या दशकात डिस्नीनं अनेक महत्त्वाकांक्षी ॲनिमेशनपटांचं नियोजन केलं. त्यातल्या 'द लिटल मरमेड'साठी केली यांना बोलावण्यात आलं. डिस्नीसाठी ही फिल्म वेगळ्या अर्थानंही महत्त्वाची मानली जाते. हातानं चित्रं काढून तयार केलेला डिस्नीचा हा शेवटचा ॲनिमेशनपट होता. केली यांना त्या सिनेमाचा अनुभव पुढच्या संधी मिळवून देणारा ठरला.

डिस्नीबरोबर काम करताना त्यांनी 'द नाइटमेअर बिफोर ख्रिसमस' आणि यांसारखे ॲनिमेशनपट केले. डिस्नीच्या १९९१मध्ये आलेल्या आणि क्लासिक म्हणून नोंद झालेल्या 'ब्युटी अँड द बीस्ट'च्या पटकथालेखनासाठी त्यांनी साहाय्यक म्हणूनही काम केलं. त्यानंतर नव्यानं सुरू झालेल्या पिक्सर या स्टुडिओशी संलग्न झाले.

स्टोरी आर्टिस्ट म्हणून पिक्सरच्या १९९५च्या 'टॉय स्टोरी' या प्रचंड लोकप्रिय ॲनिमेशनपटाचा ते हिस्सा बनले. खरं तर त्या सिनेमाच्या वेळी त्यांचा प्रवेश अगदी शेवटच्या क्षणी झाला होता. 'टॉय स्टोरी'ला प्रचंड यश मिळालं, पण आपलं त्यातलं योगदान फार मोठं नाही, असं ते जाहीरपणे सांगायचे. खरं तर हातानं काढलेल्या चित्रांवरून कार्टून करणं त्यांना आवडत होतं. पण 'टॉय स्टोरी'च्या निमित्तानं ते डिजिटलही झाले. 'टॉय स्टोरी'च्या यशाने त्यांना 'श्रेक-२', 'श्रेक-३', 'कुंग फू पांडा', 'मादागास्कर- एस्केप टू अफ्रिका', 'व्रेक इट राल्फ' अशा सगळ्याच प्रचंड गाजलेल्या ॲनिमेशनपटांचा कर्ताकरविता बनवलं.

२००२मध्ये स्पिरीट : 'स्टॅलियन ऑफ द सिमरान'च्या निमित्ताने ते दिग्दर्शनाकडे वळले. तेव्हा द ड्रिमवर्क्स या नव्या कंपनीत रूजू झाले होते. खरं तर ॲनिमेशनपटांसाठी आडव्या स्क्रीनमध्ये काम करणं, हे मोठं आव्हान होतं. त्यासाठी येणारा खर्चही जास्त असतो. मात्र त्यांनी केलेल्या कामाचं कौतुकच झालं. त्या सिनेमानं त्यांना ऑस्कर नामांकन मिळवून दिलं. 'श्रेक-२'लाही ऑस्कर नामांकन मिळालं. तो कान्स महोत्सवात अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांचा







मानकरीही ठरला. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'नोमिओ अँड ज्युलिएट'चा विशेष उल्लेख करावा लागेल. ब्रिटिश-अमेरिकन कंपन्यांनी संयुक्तपणे या थ्रीडी ॲनिमेशनपटाची निर्मिती केली होती. २०११मध्ये प्रदर्शित झालेल्या या ॲनिमेशनपटाला व्यावसायिक फायदा झालाच शिवाय अनेक पुरस्कारही मिळाले. या यशामुळे नवनव्या स्टुडिओंची आमंत्रणं आणि नव्या विषयांची आव्हानं त्यांच्याकडे स्वतःहून येत राहिली. अर्थात यात त्यांचं आपल्या कलेवर असलेलं प्रेम सगळ्यात जास्त महत्त्वाचं ठरलं होतं. त्यामुळे स्टुडिओ नवा की जुना यापेक्षा आपल्या पात्रांमध्ये रंगून जाणं, त्यांना जास्त आवडत होतं.

केली यांना नुसता विषय महत्त्वाचा वाटत नसे. ते म्हणायचे ॲनिमेशनचा जीव त्याच्या रंगात, त्याच्या आवाजात आणि त्याच्या संगीतात आहे. आवाजाचं महत्त्व ॲनिमेशनमध्ये काय असतं, ते त्यांनी प्रकर्षानं दाखवून दिलं. मुळातच हलत्याबोलत्या चित्रांचं जग हे आभासी आहे. त्यामुळे कोणत्या व्यक्तिरेखेसाठी कोणता रंग निवडलाय, हे समजून घ्यायला हवं. त्यामुळे 'टॉय स्टोरी'मधले पेस्टल शेडसारखे रंग, 'स्मर्फ्ज'मधला निळा, 'श्रेक'मधला पिवळा रंग आपल्या कायम लक्षात राहतो.

केली यांनी दिग्दर्शित केलेल्या फिल्म पाहिल्या तर अगदी काही ठळक गोष्टी लक्षात येतात. त्यापैकी एक म्हणजे सिनेमात अगदी बारीकसारीक तपशिलात आवाजांचा वापर. एखाद्या जंगलातल्या किंवा बागेतल्या प्रसंगात कीटकांचे आवाज, पानांची सळसळ, वाहत्या पाण्याचा खळाळ, अशा आवाजांना ते इतक्या अप्रतिम रीतीनं कथेच्या पार्श्वभूमीला जोडत, की त्यामुळे दृश्य पाहताना ते अधिक लोभस होई.

कार्टून व्यक्तिरेखांना दिलेले आवाज हे खूप महत्त्वाचे असतात, हे त्यांचं म्हणणं होतं. एखाद्या व्यक्तिरेखेसाठी आवाजाची निवड करताना ते आपल्या सहकाऱ्यांना सांगायचे की मला फक्त आवाज ऐकवा. मला तो कोणाचा आवाज असेल ते आधीच सांगू नका. हजारो कलाकारांचे आवाज ऐकून ते आपल्या सिनेमातल्या पात्रांसाठी आवाज देण्यासाठी निवड करत असत.

एका मुलाखतीत त्यांनी हे एका पूर्ण लांबीच्या सिनेमाइतकेच कलात्मक दर्जाचे असल्याचं म्हटलंय. नुसत्या चित्रं आणि आवाजावर एक कथानक पुढे नेताना केलेली मेहनत ही एका चित्रपटाइतकीच असते. पण अनेकदा ॲनिमेशनपटांना मुलांचे सिनेमे म्हटलं जातं. त्याला आपला टीव्ही जबाबदार असल्याची खंत त्यांनी जाहीरपणे व्यक्त केली होती. पूर्वी ॲनिमेशनपटाला चित्रपटांचा दर्जा होता, पण टीव्हीवर नियमित ॲनिमेशन दाखवलं जायला लागलं. तेव्हापासून टेलिव्हिजन हा ॲनिमेशनचा 'बेबीसीटर' म्हणून काम करायला लागला, असं ते म्हणाले होते. त्यांच्या या म्हणण्यात तथ्य आहेच. सुदैवानं 'ब्युटी अँड द बीस्ट' आणि 'द लायन किंग' यांसारख्या सिनेमांनी पुन्हा एकदा ॲनिमेशनपटांना प्रौढ प्रेक्षकवर्ग मिळवून दिला. त्यांना मोठ्यांनीही गंभीरपणे घ्यायला हवं, हे पटवून देण्याचं खूप महत्त्वाचं काम केली यांनी केलं.

केली यांनी केलेल्या कामाचा नुसता धावता आढावा घेतला तरी असं लक्षात येतं, की ज्या ॲनिमेशननं जगभरातल्या मुलांचं विश्व व्यापून टाकलं आहे, त्याचा जवळपास नव्वद टक्के हिस्सा हा केली यांनी उभा केलेल्या जादुई व्यक्तिरेखांनी व्यापलेला आहे. तरीही ते कधी आपल्या कामाविषयी गर्व बाळगणाऱ्यांपैकी नव्हते. मुद्दाम त्यांच्या काही मुलाखती आपण पाहिल्या तर त्यांच्या स्वभावात असलेल्या पारदर्शकतेचा सहज अनुभव येतो. ते कधीच हा माझा सिनेमा, हे मी केलं असं म्हणत नाही. ते म्हणतात, माझ्या सहकाऱ्यांमुळे, त्यांनी माझ्यावर विश्वास टाकल्यामुळे हे चित्रपट इतके सुंदर झाले. हॉलिवूडमध्ये राहून ॲनिमेशनच्या दुनियेत पस्तीस वर्षं राज्य केलेला माणसाच्या बोलण्यात कुठेही मोठेपणाचा आव नसतो. उलट आपल्याला ॲनिमेशनच करायचं होतं, तेच माझं स्वप्न होतं. तेच मी करत राहिलो, असं सांगण्यावर त्यांचा भर असायचा.

चित्रांइतकंच त्यांचं कथा सांगण्यावर प्रेम होतं. त्यामुळे दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय झाल्यानंतरही त्यांनी मुलांसाठी लिखाण केलं. 'डमी डेज'सह बारा पुस्तकं त्यांनी लिहिली. 'स्मर्फ्ज द लॉस्ट व्हिलेज' हे जणू त्यांचं स्वप्न होतं. त्यानिमित्ताने त्यांनी ब्लॉगलिखाणही केलं. कॅन्सरचं निदान झाल्यानंतरही त्यांनी काम थांबवलं नाही. कर्करोगाच्या चौथ्या टप्प्यात असतानाही तीन सिनेमांचं काम केलं. 'फ्रोझन', 'अग्ली डॉल्स' हे त्यांचे ॲनिमेशनपट व्यावसायिक हॉलिवूडपटांच्या स्पर्धेत उतरले. केली यांच्या निधनानंतर वाहिलेल्या आदरांजलीत, त्यांनी उभं केलेल्या अद्भुत जगाबद्दल लाखो लोकांनी त्यांचे आभार मानले. ते वाचताना आठवतं ते त्यांच्या मुलाखतीतलं वाक्य, 'मला वयाच्या सातव्या वर्षापासून माहिती होतं, हेच माझं जग आहे', असं म्हणताना झालेले भावूक स्वर. खरंच आहे, हे जग तुमचंच आहे केली ॲजबेरी... आणि त्याबद्दल अख्खं जग तुमचं कायमचं ऋणी असेल.

**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com



# लॉकडाऊन : डॉक्टरस्य कथा रम्या

डॉ. स्मिता निखिल दातार

कोविडचा हा विषाणू आणखी एखाद-दोन वर्षं आपल्यासोबत असणार आहे. त्याच्याशी हातमिळवणी न करता दोन हात करायचे आहेत. त्यासाठी हवं आहे सरकारकडून पद्धतशीर नियोजन आणि आपल्याकडून स्वसुरक्षा आणि सकारात्मकता. आपल्या वाट्याला येणाऱ्या प्रत्येक क्षणाचं आणि कणाचं सोनं करायचं की माती हे आपल्यालाच ठरवायचं आहे. नाही का?

**'मेरे** प्यारे देशवासींयो... ये एक प्रकार से जनता कर्फ्यू ही समझो। हमारे भारत के लिये ये एक कसौटी की तरह रहेगा।....' पंतप्रधानांनी घोषणा केली. थाळ्या, घंटा, शंखांच्या आवाजासह डॉक्टरांवरची जबाबदारी आणखीच वाढली. शांत रस्ते, मोकळ्या वातावरणातले पक्षी, कमी झालेलं प्रदूषण सगळ्याचं कौतुक झालं. आधी तर कोरोना आपल्याला शिवणारच नाहीये, भारतीयांची अफाट रोगप्रतिकारकशक्ती यावर बरंच बोललं गेलं. मास्क की नो मास्क, HCQ की नो HCQ, टू बी ऑर नॉट टू बी यावर ऊहापोह झाला. कोविड-१९ हा नवा विषाणू असल्यानं त्याला पुरता ओळखणारं कुणीच नव्हतं. जागतिक आरोग्य संघटनेचे नियम सारखे बदलत असायचे. डॉक्टरी विश्व वेगळ्याच पातळीवर लढत होतं. सगळ्यात आधी पीपीई किटची चणचण समोर आली. पहिले काही दिवस तर युद्धभूमीवर आघाडीवर असलेली खाजगी डॉक्टरांची फळी नि:शस्त्रच लढत होती. स्वच्छतेचे नियम नेहमीच पाळणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातल्या या सैनिकांना आठशे खिडक्या नऊशे दारांतून आत येणाऱ्या विषाणूशी सामना करायचा होता. महाभारतात अर्जुनाला कुरुक्षेत्रावरच त्या युद्धाच्या भीषणतेची कल्पना आली, तसंच प्रत्यक्ष लॉकडाऊननंतरच या संकटाचं गांभीर्य वैद्यकीय क्षेत्राच्या लक्षात येऊ लागलं. अपुरा स्टाफ, कामाला येणाऱ्या स्टाफच्या मनातली भीती, वेळेवर न मिळणारी संरक्षणसामग्री, औषधांचा तुटवडा, स्वत:च्या आणि घरातल्यांच्या जिवाची काळजी अशा अनेक आघाड्यांवर लढायचं होतं.

कोणतीही कठीण परिस्थिती हाताळायची असेल तर परिस्थितीचा स्वीकार करणं, लढ्याची तयारी करणं, मदत घेणं, स्वत:त बदल करणं आणि कृती करणं ही पंचसूत्री पाळावी लागते. आम्हीही त्याचं पालन करायला सुरुवात केली. प्रत्येक पिढीला कुठल्यातरी महासंकटाला तोंड द्यावंच लागतं. पृथ्वीवर माजलेली अनागोंदी निसर्ग त्याच्या मार्गानं दुरुस्त करत असतो, असं मानून लवकरच कोविडबरोबर जगणं शिकलो. बाहेरच्या लढाईबरोबरच घरामध्ये

रांधा, वाढा, घासा, पुसा हे चोवीस तास पुरून उरणारं कामही आमच्यासारखी डॉक्टरमंडळी करत होतीच.



माझी लॉकडाऊनमधली दिनचर्या ठरली. सकाळी सहाला उठणं, प्राणायाम-योगासनं करून चालण्याचा व्यायाम करणं. मग हॉस्पिटलचा टेलिफोनिक राऊंड घेणं. त्यानंतर घराची साफसफाई. केर, लादी या कामात हस्तपादासन, शशांकासन, मलासन केलं जातंय; पंखे पुसणं, जळमटं काढणं यात ताडासन, अर्धचक्रासन अशी आसनं आपसूकच होऊन जातात, हे नवे फायदे लक्षात आले. कोविडच्या आशीर्वादानं वजन कमी होईल अशीही एक आशा वाटली. परंतु आता कसरत होती वेळेची. एरवी न कराव्या लागणाऱ्या कामात बराच वेळ वाया जात होता. तर प्रवासात जाणारा, पेशंटना द्यावा लागणारा वेळ हातात आला होता. म्हटलं चला, ज्या गोष्टींना एरवी वेळ देता येत नाही, त्यासाठी वेळ देऊ. मग काय... भांडी घासणं, कपडे वाळत घालणं तशीच चक्क 'युगंधर', 'मृत्युंजय', 'किमयागार', 'निवडक पु.ल.' अशी ऑडिओ बुक्स ऐकली. काही चित्रपट, वेबसीरिज बघायचे राहिले होते. ते समोर लावून ठेवायचे आणि त्याच्यासमोर लहानसहान कामं करायची. स्वयंपाक करताना आशा, लता, रफी, कौशिकी कोणी ना कोणी सोबतीला असायचे. संध्याकाळी पेशंट तपासायला जावं लागे.

लॉकडाऊनमध्ये आमची पेशंटसाठी ऑनलाइन कन्सल्टेशनसेवा चालू होती. संध्याकाळी एकवेळ हॉस्पिटलमध्ये रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी चालू होती. स्त्रीरोगतज्ज्ञ असलेला माझा नवरा मात्र इमर्जन्सी ऑपरेशन, पेशंट तपासणं हे सगळं दिवसरात्र करत होता. त्याची स्त्रीरोगशास्त्र आणि कायदा या विषयातला प्रमुख वक्ता म्हणून वेबिनाती चालू होती, जी भारतभरातले डॉक्टर ऐकत होते. माझं एका चित्रपटासाठी पटकथा-लेखन चालू होतं. परदेशात शिकणाऱ्या मुलांशी रोज एक तास बोलणं चालू होतं. कारण ते तिथे एकटे होते. धीरानं परीक्षा वगैरे देत होते. त्यांच्याशी सकारात्मक बोलत होतो. एकमेकांची वाटत असलेली काळजी कधी कधी गडद व्हायची. काही सामाजिक संस्थांना जमेल ती मदत चालू होती. दिवसाचे चोवीस तास पुरेनासे झाले. कंटाळा यायला वावच नव्हता. उलट सतत कार्यरत असल्यानं इतर नकारात्मक विचार करायला वेळच उरायचा नाही. आणि हळूहळू वैद्यकीय क्षेत्रातल्या काही डॉक्टरांच्या शहीद झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. माझे डॉक्टर वर्गमित्र कोविडनं गेल्याची बातमी आली. सात तासांत त्यांच्या पत्नीचं कोविडनं निधन झालं. बारावीतला एकुलता एक मुलगा व्हेंटिलेटरवर होता. तो बरा होऊन आल्यावर पंधरा दिवसांनी त्याला आईवडिलांची बातमी कळली. अशा घटनांनी मन सैरभैर व्हायचं. तशातच स्टाफचं मनोबल टिकवावं लागायचं. त्यांच्या घरच्यांना समजावावं लागायचं. कोरोना एव्हाना चांगलाच परिचित झाला होता. मेडिकलच्या अभ्यासात आधीपासूनच असलेला, तेव्हा ऑप्शनला टाकलेला हा दुर्लक्षित विषाणू, त्यावेळी त्याच्याकडे आम्ही केलेल्या दुर्लक्षाचा वचपा काढत होता.

या कोविड विषाणूनं आम्हाला समाजाचे आणि रुग्णांचे अनेक पैलू दाखवले. काही पेशंट याही परिस्थितीत डॉक्टर आणि स्टाफ रुग्णसेवा देत आहेत म्हणून कौतुक करायचे. काही जेवणातली विशिष्ट भाजी, आमटी अशा लहान लहान गोष्टींसाठी अडून बसायचे. काही तर जणू काही कोरोना आम्हीच आणला आहे, असं समजून हुज्जत घालायचे. काही मास्क लावायला तयार नसायचे. प्रत्येक रुग्णासोबत एक नातेवाईक असा नियम धाब्यावर बसवून काही जण गर्दी करायचे. काही लोक हातात आमच्या हॉस्पिटलच्या जुन्या फाईल घेऊन फिरायला म्हणून बाहेर पडायचे, जे पोलिसांच्या हाती सापडायचे. कधी कोणी चुकीच्या बातम्या पसरवून हॉस्पिटलवर बालंट आणण्याचा प्रयत्न करायचे. कोविड टेस्ट पॉझिटिव्ह असलेल्या रुग्णेची प्रसूती आमच्या हॉस्पिटलला होणार नाही, म्हणून ती नाराज व्हायची. अशा पेशंटसाठी जीव धोक्यात घालून माझे पती आणि आमचे डॉक्टर दुसऱ्या कोविड रुग्णालयात जाऊन तिची प्रसूती करून तिला धीर द्यायचे. तर काही रुग्ण या काळात डॉक्टरांवर रुसून खुशाल चालते व्हायचे. अशीच एका प्रसंगात समाजाची काळी बाजू नजरेसमोर आली. एका सुविद्य तरुणीनं तिच्या पहिल्या अपत्याला जन्म दिला. सरकारी नियमाप्रमाणे तिची कोविड टेस्ट पाठवली होती. प्रसूत होऊन घरी गेल्यावर तिचा रिपोर्ट आला. ती कोविड पॉझिटिव्ह होती. तिला कुठलीही लक्षणं नव्हती. तरी बाळाला तिच्यापासून दूर ठेवावं लागणार होतं. याचा मानसिक धक्का तिला बसलेलाच होता. त्यात तिच्या इमारतीतल्या सदस्यांनी तिला कुठेतरी दूर ठेवा, असं

सांगत त्यांच्या घरावरच बहिष्कार टाकला. कोणीही त्यांना मदत केली नाही. शेवटी तिनं माझ्या पतींच्या सल्लयानं सोशल मीडियावर याला वाचा फोडली. एका पेशंटला सासरच्यांनी पहिलं बाळंतपण माहेरी, या नावाखाली ऐशी वर्षांच्या आईवडिलांकडे पाठवून दिलं. घरात दोन वयस्क माणसं, नवजात बाळ आणि ऑपरेशन झालेली ओली बाळंतीण. आम्ही त्यांना एका संस्थेकडून रोज जेवणाचा डबा पोचवण्याची व्यवस्था केली. संकट प्रत्येकाचं दार ठोठावतं, याची जाणीव माणूस का विसरतो?

आता मात्र हळूहळू जशी लॉकडाऊनची तीव्रता कमी होतेय तशी प्रत्यक्ष तपासायला येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढायला लागली आहे. त्याबरोबरच आम्हाला असलेली जोखीमही वाढायला लागली आहे. वैद्यकीय व्यवसाय असलेल्या आमच्यासारख्या घरांमध्ये त्या घरातल्या डॉक्टरला सोवळं पाळावं लागत आहे. त्यांची व्यवस्था वेगळ्या खोलीत केली जातेय. विषाणूसंक्रमण होऊ नये म्हणून त्यांच्यापासून इतर सदस्य थोडं अंतर ठेवून राहत आहेत. त्यांना जेवणसुद्धा लांबून वाढलं जातंय. डॉक्टरचं काम नऊ ते पाच असं ऑफिससारखं नसतं. दिवसातून अनेक वेळा आणि वेळी-अवेळी आम्हाला रुग्णांना बघायला जावं लागतं. तितक्या वेळा घरी येऊन अंघोळ करणं, कपडे धुवायला टाकणं, गाडीच्या चावीपासून पेनापर्यंत वस्तू सॅनिटाइज करणं असं चक्र चालू आहे. पीपीई किट व मास्क घातला की श्वास घेणं अवघड होतं. दिवसाचे बारा-चौदा तास कमी ऑक्सिजन पातळीवर काम चालू असल्यानं डॉक्टरांना डिप्रेशन, चिडचिड यालाही सामोरं जावं लागतंय. खाजगी डॉक्टरांना कोविड सैनिक म्हणून शहीद झाल्यास शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळत नाही. अशा काळात केवळ मनोबळावर आणि सकारात्मक ऊर्जेवर आमची वाटचाल सुरू आहे.

एक लेखिका म्हणून, या काळात निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीनं माझ्या अनेक कवितांना जन्म दिला. लॉकडाऊनची स्पंदनं टिपून माझ्याकडून काही कथा लिहिल्या गेल्या. काही गंभीर आणि काही हलक्या-फुलक्या. कुठलीही कला जितकी आतून जन्म घेते तितकीच ती घासून-पुसून लख्ख करत राहावी लागते. त्यातला तंत्राचा भाग समजून घ्यावा लागतो. यासाठी काही ऑनलाइन कार्यशाळांत नाव घातलं. पटकथा लिहिताना संकलन, छायाचित्रण, रंगभूषा, ध्वनिशास्त्र याचं ज्ञान असणं का आवश्यक असतं याची या कार्यशाळांतून ओळख झाली. नवे समविचारी मित्रमैत्रिणी मिळाले. काही ज्येष्ठ सिनेमा दिग्गजांच्या व्याख्यानातून पटकथा-लेखनाकडे पाहण्याची अनोखी दृष्टी मिळाली. त्या निमित्तानं बरंच वाचन झालं. पुन्हा एकदा विद्यार्थी बनून अभ्यास झाला आणि एका अनवट विषयावर आणखी एका पटकथेचा पहिला ड्राफ्ट लिहून झाला. सध्या एका नवीन कादंबरीचं काम आणि त्यासाठी आवश्यक संशोधन चालू आहे. त्यातल्या नायिकेचं जग मनात आकार घेतंय. या आधी प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'कॅनव्हास' कथासंग्रह, 'चौकोनाचा पाचवा कोन' कादंबरी, 'डी.के. दातार-द व्हायोलिन सिंग्ज' हे चरित्र, याचं वाचकांनी छान स्वागत केलं आहे. माझ्या येऊ घातलेल्या कादंबरीबद्दल त्यांना उत्सुकता आहे, ही गोष्ट मनाला निश्चितच उभारी देते आहे.


कोविडचा हा विषाणू आणखी एखाद-दोन वर्ष आपल्यासोबत असणार आहे. त्याच्याशी हातमिळवणी न करता दोन हात करायचे आहेत. त्यासाठी हवं आहे सरकारकडून पद्धतशीर नियोजन आणि आपल्याकडून स्वसुरक्षा आणि सकारात्मकता. आपल्या वाट्याला येणाऱ्या प्रत्येक क्षणाचं आणि कणाचं सोनं करायचं की माती हे आपल्यालाच ठरवायचं आहे. नाही का?

**- डॉ. स्मिता निखिल दातार**
भ्रमणध्वनी : ९८२०१२७०५६
drsmitadatar@gmail.com

॥ग्रंथाली॥

**कॅनव्हास**


**डॉ. स्मिता निखिल दातार**




**सवलतीत १३० रुपये**
**सवलतीत ८५ रुपये**

**डी.के.दातार**
**द व्हायोनिल सिंग्ज**

**डॉ. स्मिता निखिल दातार**




**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**

# नवे अंतरिक्षयुग



डॉ. मोहन द्रविड

**एकोणीसशे** साठचे दशक ज्यांनी अनुभवले आहे त्यांच्यासारखे नशीबवान तेच. विविध घटना वेगाने घडत होत होत्या. रशिया-अमेरिका शीतयुद्ध धामधुमीत चालू होते. त्या मोठ्या युद्धाचाच एक छोटा अंश म्हणजे व्हिएतनाममधील युद्ध. या युद्धाने अमेरिका ढवळून काढली. हिप्पी संस्कृती याच काळातली. ड्रग्ज, अनिर्बंध सेक्स अशा गोष्टींना ऊत आला. त्या पार्श्वभूमीवरच कृष्णवर्णीयांनी आपल्या हक्कांसाठी लढे चालू केले. आज चालल्या आहेत तशा दंगली दरवर्षी होत होत्या. त्या शीतयुद्धाचाच पण सौम्य असा दुसरा लढा अंतरिक्षात चालला होता. लढा म्हणण्यापेक्षा शर्यत म्हणणे जास्त योग्य ठरेल. अमेरिकेच्या ध्यानीमनी नसताना त्यांच्या दृष्टीने मागासलेल्या रशियाने अवकाशात स्पुटनिक सोडून १९५७ मध्ये सलामी दिली. अमेरिका खडबडून जागी झाली आणि तिने पाय मारायला सुरुवात केली. मात्र तिने कितीही प्रयत्न केला तरी रशिया अनेक वर्षे त्या शर्यतीत एक पाऊल पुढेच राहिली.

सर्व जग श्वास रोखून ही शर्यत पाहत होते. दर महिन्याला काही ना काहीतरी क्रांतिकारक घडामोड होत असे. आज काय तर रशियाने कुत्री अवकाशात पाठवली. दुसऱ्या दिवशी अमेरिकेने एक माकड अवकाशात पाठवलले. रशियाचा युरी गागारिन अंतरिक्षात गेला. त्याने पृथ्वीला प्रदक्षिणा मारल्या. लगोलग अमेरिकेच्या ॲलन शेपर्डने भरारी मारली. अमेरिकेच्या शास्त्रज्ञांना उत्तेजित करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी घोषणा केली, की हे दशक संपायच्या आत आपल्याला माणूस चंद्रावर पाठवायचा आहे आणि त्याला सुखरूप परत आणायचे आहे. रशियाच्या आधी, हे अध्याहृत होते. नेमके तेच घडले. १९६८ पर्यंत रशियाच्या मागे असलेल्या अमेरिकेने शेवटच्या लॅपमध्ये रशियाला मागे टाकले आणि अपोलो-११ या यानातून चंद्रावर आपला झेंडा रोवला.

कालांतराने अंतरिक्षक्षेत्रात सुस्ती आली. रशियाने चंद्राचा नाद सोडला. अमेरिकेने अपोलो-१७पर्यंत आपली चंद्रयाने सोडली. स्पर्धेच्या अभावी

नासाने पायाभूत सोयी भाडेतत्त्वावर वापरण्याची मुभा खाजगी उद्योगांना दिली. नॉर्थरप ग्रूमन, लॉकहीड मार्टिन, बोइंग, अलायन्ट टेक या जुन्या आणि जाणत्या कंपन्यांनी प्रपोजल सादर केली, यात आश्चर्य नव्हते. परंतु या क्षेत्रात फारसा अनुभव नसलेल्या पण अत्यंत महत्त्वाकांक्षी तरुण उद्योजकांमध्ये आपण काहीतरी क्रांतिकारक करावे अशी ऊर्मी निर्माण झाली. इलॉन मस्क हा त्यांपैकी एक. टेस्ला या विजेवर चालणाऱ्या गाड्या तयार करणारा म्हणून परिचयाचा. परंतु अंतरिक्षयाने बनवून त्यांच्यातून लोकांना चंद्र, मंगळ अशा ठिकाणी फिरवून आणण्याच्या उद्योगात तो असेल हे सांगूनही खरे वाटणार नाही. या उद्योगात क्रांती करायची ती अथपासून करायची असे त्याने मनावर घेतले आणि Space X या नावाची कंपनी चालू केली.

अमेरिकेचाही चांद्रप्रवासाच्या बाबतीत उत्साह कमी झाला आणि १९७२ च्या अखेरीस अमेरिकेने अपोलो कार्यक्रम बंद केला. दोन्ही देशांतील शास्त्रज्ञांनी मुख्यत: पृथ्वीवरच लक्ष केंद्रित करायचे ठरवले. इतर ग्रहांची अधूनमधून 'चौकशी' करणेही चालू होते, पण त्याला लागणारा एकूण वेळ व पैसा आणि त्यातून निष्पन्न होणारी माहिती यांच्या जमाखर्चाचा विचार करता तो पर्याय फार आकर्षक नव्हता. जुलै १९७५ मध्ये रशियाच्या सोयुझ-१९ने आणि अमेरिकेच्या नंबर नसलेल्या शेवटच्या अपोलोने अंतराळात एकमेकांना भेटून हस्तांदोलन केले आणि अंतराळशर्यत संपल्याचे घोषित केले. यापुढे एकमेकांशी फक्त सहकार्य करायचा वादा केला. आता समजूतदारपणाचे (détente) दिवस चालू झाले होते.

त्यानंतर रशियाने सलूट (रशियन भाषेत 'सलोम') नावाची अवकाशस्थानके बांधायला घेतली. तिथून अवकाशात उपग्रहे सोडणे हे महत्त्वाचे काम होतेच, त्याबरोबर शास्त्रीय प्रयोग करणे, परदेशी लोकांना अंतराळवीर बनण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना अवकाशस्थानकात नेणे आणि त्यामार्गे सदिच्छा निर्माण करणे या गोष्टीसुद्धा साधता आल्या. अशा कार्यक्रमातूनच राकेश शर्मा आपल्या देशाचा अंतराळवीर झाला. आजतागायत तो एकमेव भारतीय नागरिक अंतराळात जाऊन आला आहे. (तिथून भारत कसा दिसतो या आपल्या त्या वेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधींच्या प्रश्नाला राकेशने मार्मिक उत्तर दिले, ''सारे जहाँसे अच्छा!'') क्युबाचा आर्नाल्डो मेंडेझ हा असाच दुसरा नशीबवान माणूस. हा आफ्रिकन वंशाचा पहिला आणि अमेरिका सोडून पश्चिम गोलार्धातला एकमेव अंतराळवीर आहे. सलूटनंतर रशियाने 'मीर' या नावाची अवकाशस्थानके १९८६ ते २००१ या कालावधीत बांधली. रशिया आता अमेरिका, कॅनडा, जपान आणि युरोपीय संघ यांच्या मदतीने १९९८ मध्ये बनवलेल्या प्रचंड आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकाचा (इंटरनॅशनल स्पेस स्टेशन : ISS) अर्धा भाग वापरतो.

अमेरिकेने १९७३ मध्ये स्कायलॅब हे अवकाशस्थानक बनवले, पण ते फक्त सहा महिने चालवले. त्यानंतर तिने वेगळा मार्ग स्वीकारला. १९६६ मध्ये अमेरिकन सरकारच्या एकूण खर्चाच्या साडेचार टक्के खर्च नासावर होत असे. तो १९८० मध्ये दीड टक्क्यावर आला. (आता, म्हणजे २०२० मध्ये, तो अर्धा टक्का आहे!) अशा परिस्थितीत अमेरिकेने यानावरचा खर्च कमी करणे आणि तांत्रिक बाबी सुधारणे ही ध्येये डोळ्यांसमोर ठेवली. त्या विचारातून १९८१ साली अवकाशफेरी (स्पेस शटल) ही कल्पना जन्माला आली. जाताना अवकाशयान आणि परतताना विमान किंवा ग्लायडर, असे संकरित वाहन बनवायचे ठरवले. अवकाशयानाची रचना अशी केली की त्यातील बरेचसे भाग काम झाल्यानंतर पॅराशूटने पृथ्वीवर अलगद सोडून परत परत वापरता येतील.

विमान अवकाशयानाच्या पाठुंगळीवर बसते आणि एकदा कक्षेत गेले की स्वतंत्रपणे प्रवास करते. म्हणून या विमानाला ऑर्बिटर (कक्षेत फेरी मारणारा) अशी संज्ञा दिली गेली. नासाने सहा ऑर्बिटर तयार केले होते, पण त्यांपैकी पाचच वापरले. त्या सर्वांनी मिळून १३५ वेळा अवकाशात उड्डाण केले. दुर्दैवाने दोन ऑर्बिटर अपघातात जळून गेले. एकात भारतीय वंशाची कल्पना चावला होती. भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्सची २००७ मधील फेरी मात्र व्यवस्थितपणे पार पडली. २१ जुलै २०११ साली शटल प्रोग्रॅम संपला. या दिवसानंतर अगदी हल्लीहल्लीपर्यंत, म्हणजे मे २०२० पर्यंत, अमेरिकन अंतराळवीरांना अंतराळात उड्डाण करायला रशिया किंवा कझाकस्तानमध्ये जावे लागायचे!

अवकाशफेऱ्यांच्या महत्त्वाच्या कामगिऱ्यांपैकी एक म्हणजे हबल या एका शास्त्रज्ञाच्या नावाने तयार केलेल्या प्रचंड दूरदर्शकाची (हबल टेलिस्कोप) अवकाशात स्थापना. पृथ्वीवरील दूरदर्शकातून केलेली निरीक्षणे जशी इथल्या वातावरणामुळे अस्पष्ट होतात तशी या दूरदर्शकातून केलेली होत नाहीत, हा त्यातला फायदा. त्याचप्रमाणे भारतीय शास्त्रज्ञ चंद्रशेखर यांच्या स्मरणार्थ बनवलेली चंद्रवेधशाळा हीसुद्धा स्पेस शटलच्या साहाय्याने अवकाशात बसवली आहे. तिचं सर्वात मोठं काम म्हणजे आधी रशियन आणि नंतर आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकामध्ये अमेरिकन अंतराळवीर नेऊन वेगवेगळ्या मोहिमा फत्ते करणे.

अवकाशात पर्यटन ही कल्पना फार जुनी आहे. सुरुवातीस रशियन आणि अमेरिकन दोन्ही सरकारांना आपल्या यानातून पर्यटकांना नेणे उच्छृंखलपणाचे वाटले. अंतराळयानाचा उपयोग मानवाच्या प्रगतीसाठी झाला पाहिजे, केवळ करमणूक म्हणून नको, अशी त्यामागची विचारसरणी. १९९० मध्ये सोव्हिएट सरकारची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली. तत्त्वापेक्षा धन श्रेष्ठ या न्यायाने रशियाने टोयोहिरो आकियामा या टोकियो ब्रॉडकास्टिंग कंपनीच्या बातमीदाराला आपल्या सोयुझ रॉकेटमध्ये प्रवेश दिला. (साडेतीन कोटी डॉलर शुल्क कंपनीने भरले!) तो एक आठवडा फिरून परत आला. तिथून त्याने पृथ्वीवरच्या बातम्या दिल्या आणि शास्त्रीय प्रयोगही केले. अवकाश-पर्यटन या कल्पनेला नव्याने चालना मिळाली. रशियन आणि अमेरिकन शास्त्रज्ञांच्या विचारांत बदल झाला आणि जसजसे नवीन सहस्रक जन्माला येत होते तसतशी ही कल्पना समूर्त होऊ लागली.

१९९८ मध्ये अमेरिकेत अवकाश-पर्यटनासाठी 'अंतरिक्षातील साहसे' (Space Adventures) ही खाजगी कंपनी प्रस्थापित झाली. तिने रशियन सरकारबरोबर करार केला. त्यात रशियाने कंपनीच्या उत्साही आणि धनवान गिर्हाईकांना मॉस्कोत प्रशिक्षण देऊन अवकाशात पाठवायचे, अवकाशस्थानकातून फिरवून सुखरूप परत आणायचे. किंमत ठरली माणशी दोन कोटी डॉलर. ISS नुकतेच तयार झाले होते. डेनिस टिटो या उद्योजक-शास्त्रज्ञाने संधीचा फायदा घेतला. हा जगातला पहिला अवकाशपर्यटक! त्यानंतर २०११पर्यंत आणखी सहा पर्यटक जिवाचे अवकाश करून आले! त्यात एक अनुशेह अन्सारी नावाची इराणी-अमेरिकन स्त्री आहे. अमेरिकेचा स्पेस शटल हा उपक्रम २०११ मध्ये बंद झाला आणि खडडला सामान पुरवायला रशियाची अवकाशयाने सोडून दुसरा कुठला पर्याय शिल्लक राहिला नाही. पर्यटनाला अवकाशयाने उरली नाहीत आणि पर्यटनाच्या

उपक्रमाला तात्पुरती खीळ बसली.

अमेरिकेचे हे दुर्दैवाचे फेरे चालू असताना चीन आणि भारत या राष्ट्रांनी अवकाशात मुसंडी मारायला सुरुवात केली. अमेरिकेच्या अवकाश उपक्रमाचा जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला. यातून मार्ग म्हणजे अवकाश खाजगी उद्योगांना खुले करायचे आणि नासाने २००४ साली तेच केले. नासाने पायाभूत सोयी भाडेतत्त्वावर वापरण्याची मुभा खाजगी उद्योगांना दिली. त्याचप्रमाणे वेळ पडली तर नासा खाजगी उद्योगांची रॉकेट वापरू शकते. नासाकडे या उद्योगातल्या नॉर्थरप ग्रूमन, लॉकहीड मार्टिन, बोइंग, अलायन्ट टेक या जुन्या आणि जाणत्या कंपन्यांनी प्रपोजल सादर केली, यात आश्चर्य नव्हते. परंतु या क्षेत्रात फारसा अनुभव नसलेल्या पण अत्यंत महत्त्वाकांक्षी तरुण उद्योजकांमध्ये आपण काहीतरी क्रांतिकारक करावे अशी ऊर्मी निर्माण झाली.



**अवकाशात भ्रमण करणारी स्पेसेक्स रॉकेटवरील टेस्ला कार**

इलॉन मस्क हा त्यांपैकी एक. टेस्ला या विजेवर चालणाऱ्या गाड्या तयार करणारा म्हणून इलॉन मस्क याचा परिचय बहुतेकांना असेल. परंतु अंतरिक्षयाने बनवून त्यांच्यातून लोकांना चंद्र, मंगळ अशा ठिकाणी फिरवून आणण्याच्या उद्योगात तो असेल हे सांगूनही खरे वाटणार नाही. या उद्योगात क्रांती करायची ती अथपासून करायची असे त्याने मनावर घेतले आणि Space X या नावाची कंपनी चालू केली. नवीन प्रकारची रॉकेट्स (फाल्कन), (नवीन डिझाइनची याने (ड्रॅगन), नवीन कल्पना. वाहन वर जाताना रॉकेट आणि उतरतानाही रॉकेटच. विमान आणि विशेषत: त्याचे पंख म्हणजे उगीच लोढणे! रॉकेटच्याच इंजिनांचा उपयोग ब्रेकसारखा करायचा! या आणि अशा परिवर्तनांतून अवकाशयानाच्या एका उड्डाणाला नासाला जे पाच अब्ज डॉलर लागत होते ते दशलक्ष डॉलरपर्यंत उतरवायची मस्कची महत्त्वाकांक्षा आहे.

या नुसत्या गप्पा नाहीत हे मस्कने सिद्ध करून दाखवले. त्याने स्पुटनिकसारखा दुसरा इतिहास घडवून आणला. २००८ मध्ये उपग्रह अवकाशात. २०१० साली दुसरा उपग्रह अवकाशात जाऊन परत आला. आणखी एका उपग्रहाने २०१२ मध्ये अवकाशात जाऊन ISS बरोबर जोडणी केली. २०१५ साली इंजिनाचा उपयोग ब्रेकसारखा करून यान उभेच्या उभे जमिनीवर उतरवले. २०१७ मध्ये संपूर्ण यान पुन्हा वापरता येईल अशा अवस्थेत परत आले. २०२० मध्ये तर कमाल केली. अमेरिकेच्या अंतराळवीरांनी २०११ नंतर प्रथमच मस्कच्या कृपेने आपल्या मातृभूमीवरून उड्डाण केले!

Space X च्या एका रॉकेटवर एक किमती टेस्ला बांधून मस्कने ते २०१८ पासून अवकाशात सोडले आहे. त्यात खोटा खोटा ड्रायव्हरसुद्धा आहे. ही साठ हजार डॉलरची गाडी मस्क स्वत: वापरत असे. ती आता सूर्याला प्रदक्षिणा घालत आहे. याच सुमारास अमेरिकेने ISSचा आपला भाग पर्यटनासाठी खुला केला.

अवकाशयानात रस घेणारा आणखी एक उद्योजक म्हणजे ॲमेझॉन या कंपनीचा मालक जेफ बेझोस. बेझोसकडे पैशांची कमतरता नाही; हा जगातला सर्वात श्रीमंत माणूस मानला जातो! याच्या मते उद्याचा अंतरिक्षप्रवास म्हणजे आजच्या इंटरनेटसारखे प्रगल्भ होणारे क्षेत्र आहे. बेझोसच्या आताच भरमसाठ मोठ्या असलेल्या कंपनीचे नाव आहे, 'ब्लू ओरिजिन', आणि त्याने रॉकेटचे नाव अमेरिकेच्या पहिल्या अंतराळवीराच्या स्मरणार्थ ठेवले आहे, 'न्यू शेपर्ड'. त्याने अनेक रॉकेटच्या यशस्वी चाचण्या घेतल्या आहेत आणि ती मस्कच्या ड्रॅगनसारखी उर्ध्वाधर उतरतात. बेझोसने चंद्रावर फिरण्यासाठी जो यांत्रिक भटक्या (रोव्हर) तयार केला आहे त्याचे नाव आहे, 'ब्लू मून'!

एका अर्थी अवकाश-शर्यत १९५७ साली चालू झाली ही दुर्दैवाची गोष्ट. त्याकाळी आपण तांत्रिकदृष्ट्या फार 'मागासलेले' होतो. संगणक प्राथमिक अवस्थेत होते. इंटरनेटचा पत्ता नव्हता. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबॉबोटिक्स या केवळ कल्पना होत्या. खाजगी उद्योगधंद्यांना या क्षेत्रात गुंतवले असल्याने नासाला नवीन तंत्रे वापरून



भव्य कल्पनांना राबवण्याची संधी आता मिळणर आहे. नासासमोर असलेल्या अनेक कल्पनांपैकी काही : १. राक्षसी आकाराची रॉकेट्स (स्पेस लाँच सिस्टिम), २. ओरायन कॅप्सुल, ३. चंद्रावर जायला जशी समर्थ अपोलो याने केली होती तशी आधी चंद्रावर आणि तिथून मंगळावर जाण्यासाठी आर्टमिस नावाची त्यापेक्षा अधिक समर्थ याने. या कामांसाठी खाजगी उद्योगधंद्यांशी भागीदारी आहे (Next Space Technologies for Exploration Partnerships : Next STEP). २०२५ सालापर्यंत मंगळ गाठायचा इरादा आहे.

मंगळाच्या पुढे येतो लघुग्रहांचा पट्टा. हा आधी एक ग्रह होता असा सिद्धांत आहे. हा थंड होत असताना याच्या गाभ्यावर प्रचंड दाब पडला आणि अणूगर्भीय प्रतिक्रिया होऊन सोने, प्लॅटिनम, अशी जी विश्वात अत्यंत विरळ मूलद्रव्ये आहेत ती तयार झाली. पृथ्वी आणि इतर ग्रहांच्या गाभ्यातही ही जड मूलद्रव्ये आहेत. फरक एवढाच, की हा ग्रह फुटला आणि त्याच्या पोटातले रहस्य बाहेर पडले. त्यातल्या सरासरी आकाराच्या (२ मीटर बाय २ मीटर बाय २ मीटर) तुकड्याची किंमत एक हजार अब्ज डॉलर आहे. (जेफ बेझोस काही उगीच नाही मागे लागलाय्!) यातल्या २०० किमी लांबीच्या बटाट्याच्या आकाराच्या तुकड्यावर शास्त्रज्ञांचा डोळा आहे. त्याचे नाव आहे १६ सायकी! साधारण २०२६ पर्यंत तो आपल्या ताब्यात येईल. त्यातून मिळणारे पैसे जर सर्वांनी सारखे वाटून घेतले तर पृथ्वीवरील साडेसात अब्ज लोकांतला प्रत्येक जण अब्जाधीश होईल!

**– डॉ. मोहन द्रविड**
फोन : ९८२०५–६३१३०
mohan.drawid@gmail.com

# आषाढीनिमित्त ‘संतकाव्याचा अनोखा रंग’ डिजिटल पुस्तक प्रकाशनसोहळा



**योजना शिवानंद लिखित ‘आषाढी संतकाव्याचा अनोखा रंग’ या पुस्तकप्रकाशनसमयी बीना पै, ॲड. राजेंद्र पै आणि इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे आनंद लिमये**

‘योजना प्रतिष्ठान’, ‘ग्रंथाली’ आणि ‘पिक्सल बाय पिक्सल’ या त्रिवेणीच्या संयुक्त विद्यमाने, आषाढी एकादशीच्या दिवशी, १ जुलै २०२० रोजी अनोखा डिजिटल अभंगवाणीसोहळा संपन्न झाला. पंडित शिवानंद पाटील यांना समर्पित केलेली ही अभंगवाणीमैफल ‘वैभव महाराष्ट्राचे’ या यूट्यूब चॅनलवरून प्रक्षेपित करण्यात आली. लॉकडाऊनच्या काळात अशा प्रकारे होणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच डिजिटल प्रकाशनसोहळा ठरला.

हृदयात साक्षात विठ्ठल वास्तव्यास असणाऱ्या योजना शिवानंद, या गेली ३० वर्षे, आषाढी एकादशीच्या निमित्ताने संतसाहित्यावर आधारित सांगीतिक मैफल सादर करतात. यंदा या उपक्रमांतर्गत साकार झालेले हे ३१ वे पुष्प. गेल्या वर्षी सादर केलेला कार्यक्रम म्हणजे ‘आषाढी संतकाव्याचा अनोखा रंग’. यावर्षी या अभंगवाणीच्या कार्यक्रमाच्या संहितालेखनाचे पुस्तक, आचार्य अत्रे यांच्या निवासस्थानी, त्यांचे नातू व शिरीष पै यांचे चिरंजीव ॲडव्होकेट राजेंद्र पै यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. या प्रसंगी बीना पै, आनंद लिमये असे मोजके मान्यवर उपस्थित होते. लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करत, मुखपट्टी परिधान करत हा अनोखा प्रकाशनसोहळा संपन्न झाला. या प्रसंगी व्यक्त होताना राजेंद्र पै यांनी, मी हे पुस्तक मी ॲडव्होकेट म्हणून नव्हे तर भक्त म्हणून प्रकशित करीत आहे, असे नम्रपणे नमूद केले.



**लेखिका योजना शिवानंद**

या कार्यक्रमाच्या निमित्ताने योजना शिवानंद यांनी, नादांची विशाल अनुभूती देणाऱ्या संतसाहित्यातील नामगजराचे महत्त्व उलगडून दाखवले, त्याचप्रमाणे अभंग, ओव्या, विरहिणी, आरत्या, भारुडे, भूपाळ्या अशा अनेक रचनाबंधांचा उगम व इतिहास मांडत ही सांगीतिक मैफल सादर केली .

या प्रसंगी ‘योजना प्रतिष्ठान’चे अध्यक्ष रमेश म्हापणकर, पत्रकार–लेखक–लोकसाहित्याचे अभ्यासक मुकुंद कुळे, ऑर्गन–संवादिनीवादक निरंजन लेले, लेखिका–प्राध्यापिका मीना गोखले, ‘इंडिया प्रिंटिंग प्रेस’चे आनंद लिमये, ‘ग्रंथाली’चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता पांडे यांनी केले. डिजिटल बाजू राजू कदम यांनी सांभाळली तर प्रकाशित पुस्तकाची अक्षरजुळणी योगिता मोरे यांनी केली.

**– डॉ. लतिका भानुशाली**



# क्वारंटाइन कट्ट्याच्या निमित्तानं

**कविता जोशी**

---

सध्या कोरोनाच्या रूपानं जे संकट आपल्यासमोर उभं ठाकलंय त्याचं गांभीर्य, परिणाम, भीषणता यांचा ऊहापोह आणि चर्चा वारंवार होत आहे, पण एखाद्या संकटामुळे उद्विग्न होऊन कोलमडून पडायचं की त्यातून प्रेरणा घेऊन सर्व शक्तिनिशी स्वतःला आजमावत समृद्ध व्हायचं ही निवड ज्याची त्याने करायची. आम्ही या संकटाकडे संधी म्हणून पाहिलं. आजुबाजूला पसरलेल्या नकारात्मकतेवर सकारात्मकतेची छोटीशी फुंकर घालायचा प्रयत्न आम्हाला क्वारंटाइन कट्ट्याद्वारे करता येतोय याचं आम्हाला समाधान आहे.

**वादळा'पूर्वी'ची** शांतता आपल्या परिचयाची आहे, पण हे कोरोना नावाचं वादळ वेगळं होतं. या वादळा'नंतर' शांतता पसरली, जगभरात. व्यवहार-वाहतूक ठप्प झालं. रस्ते, ऑफिसेस, चहाच्या टपऱ्या, टेकड्या, कट्टे ओस पडले. गप्पांचे फड जमेनासे झाले. माणूस माणसाला भेटायला आसुसला, भेटीसाठी वेगवेगळे मार्ग धुंडाळायला लागला आणि व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल, गूगल ड्युओ (Google Duo), हँगआउट, मीट, झूम, स्काइअप (Skype) यांसारख्या एकेकाळी ठरावीक वर्गाला ज्ञात असलेल्या गोष्टी पोरांपासून थोरांपर्यंत आणि क्लासेसपासून मासेसपर्यंत सर्वांच्या नित्य वापरात येऊ लागल्या. यातूनच जन्म झाला एका व्हर्च्युअल कट्ट्याचा अर्थात आमच्या क्वारंटाइन कट्ट्याचा.

वादळं तशी आपल्याला नवीन नाहीत. भारतात असेस्तोवर आम्ही तिघी दूरदर्शन मालिकांतून, गाण्याच्या मैफिलीतून, व्यावसायिक रंगभूमीवर आपापली कला जोपासत होतो. भारत सोडून यूएसला आल्यापासून अनेक मानसिक-वैचारिक वादळांचा सामनाही करत होतो. 'का धरिला परदेस' हा प्रश्न वादळासारखा अनेकदा मनावर धडकून मन अस्थिर करायचा. पण आमच्यातली कला जिवंत ठेवायचा प्रयत्न गेली अनेक वर्षं आम्ही तिघी कसोशीनं करत होतो. अशातच एका निवांत दुपारी युरेका युरेका म्हणत दीपालीचा फोन आला आणि ही कट्ट्याची कल्पना तिनं मला आणि दीप्तीला बोलून दाखवली. 'नेकी और पूछ पूछ' म्हणत आम्ही लगेचच ती उचलून धरली. खरं सांगायचं तर व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉल ग्रुपमध्येही करता येतो याचा साक्षात्कार आम्हाला तेव्हा झाला. मग फोनवर चर्चा सुरू झाल्या. अनेक नावं नापसंत केल्यावर दीपालीनं 'क्वारंटाइन कट्टा' हे नाव सुचवलं आणि आपसूकच या कट्ट्याचं स्वरूप कसं असावं याचा कच्चा आराखडा डोक्यात तयार झाला. साध्या अनौपचारिक गप्पा... मित्रमैत्रिणींतल्या, गुरुशिष्यांतल्या, जुजबी तोंडओळख असलेल्यांतल्या... एक ना दोन. आता या गप्पा रेकॉर्ड कशा करायच्या, एडिट कशा करायच्या, ऑन स्क्रीन-बिहाइंड द स्क्रीन विभागणी कशी करायची, रेकॉर्डेड गप्पा स्टोअर कुठे करायच्या अशा अनेक

गोष्टींचा विचार आणि प्रयोग सुरू झाले. आम्ही तिघी टेक्नॉलॉजीच्या बाबतीत जवळपास निरक्षर. अनेकदा धडपडलो, चुकलो, मतभेद–वाद झाले; पण हे अपत्य जन्माला घालायचंच आणि त्याचा दर्जाही उत्तमच हवा याबाबत एकमत आणि आग्रह होता. मग आमच्या घरची आणि जवळची मंडळी आमचे डोहाळे पुरवायला पुढे सरसावली. नेहा मराठे–अभ्यंकरनं सुंदर लोगो करून दिला. प्रसाद जोशीनं सिग्नेचर ट्यून बांधून रेकॉर्ड करून दिली. जवळच्या अनेक व्यक्तींनी प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिला, मदत केली. त्या पाठबळावर आम्ही तिघींनी मिळून या प्रसववेदना आनंदानं सोसल्या.

या कट्ट्याची कल्पना आनंद इंगळेच्या कानावर घातली तेव्हा त्यानं अनुभवाच्या चार गोष्टी सांगितल्या, काही सूचना केल्या. इतकंच नाही तर क्वारंटाइन कट्ट्याचा शुभारंभाचा भागच मुळी त्याच्याबरोबरच्या गप्पांनी रंगला. भीती, धाकधूक, उत्साह, अस्वस्थता अशा अनेक भावनांसह हा भाग रेकॉर्ड करताना आम्ही तिघी नॉस्टॅल्जिक झालो. थेट रंगभूमीवर पोचलो. तिसऱ्या घंटेपूर्वीची शांतता, तिथला गारवा, पोटातला गोळा, सुकलेला गळा, थरथरणारे हातपाय या साऱ्याचा अनुभव आम्ही अनेक वर्षांनी या व्हर्च्युअल रंगभूमीवर घेत होतो, आजही घेत आहोत. त्यानंतर विक्रम गोखले, दीपाली विचारे, उदय सबनीस, अतुल परचुरे, वंदना गुप्ते, सुनील तावडे, दीपक करंजीकर, विद्या करंजीकर असे मोठमोठे दिग्गज पाहुणे कट्ट्यावर आमच्याशी गप्पा मारायला आले. कट्टा बहरू लागला. प्रत्येक दिवसागणिक काहीतरी नवं हाती लागत होतं. आमचा उत्साह, विश्वास, अभ्यास वाढत होता. तसतसं सेलेब्रिटी पाहुण्यांच्या जोडीला विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे पायही आपल्या कट्ट्याला लागावेत असा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवला. त्यामुळे संगीतदिग्दर्शन, संयोजन, गायन, वादन, व्हॉइसिंग, वृत्तनिवेदन, आयुर्वेद, कॉस्च्युम डिझायनिंग, व्हॉइस थेरपी अशा अनेकविध क्षेत्रांतली जाणकार मंडळी कट्ट्यावर येत गेली आणि कट्टा श्रीमंत होत गेला. या सर्वच पाहुण्यांच्या गप्पांचा पहिला प्रेक्षक आम्ही तिघीच असतो. दैनंदिन जबाबदाऱ्या, वेळेचं भान विसरून आम्ही त्या ऐकतो. ऐकताना एखाद्या कधीही न ऐकलेल्या विषयाचा उल्लेख झाला तर आमच्यातलं लहान मूल आणि कुतूहल दोन्ही जागं होतं. मुंगी होऊन साखर खाण्यातली गंमत आम्ही तिघी नित्य अनुभवतोय. त्यायोगे माणूस, कलाकार, प्रेक्षक, श्रोता, मैत्रीण, विद्यार्थी म्हणून दररोज समृद्ध होतोय.

अर्थात नाण्याला दुसरी बाजूही असतेच. पाहुण्यांची नावं ठरवून, त्यांच्याशी संपर्क करून, ते फायनल एपिसोड यूट्यूब आणि फेसबुकवर अपलोड करेपर्यंतच्या प्रत्येक पायरीवर वेगवेगळी आव्हानं समोर येतात. काही पाहुणे फोनवर जितकं मोकळेपणानं बोलतात तितकाच कॅमेऱ्यासमोर मात्र सावध पवित्रा घेतात. अशावेळी गप्पांचा सगळा ॲप्रोच ऐनवेळी रेकॉर्डिंग चालू असताना बदलावा लागतो. काही अबोल पाहुणे प्रत्यक्ष रेकॉर्डिंगच्या वेळी मात्र इतके छान मोकळे होतात की वेळेचं गणित गडबडतं. अशा पाहुण्यांचे एपिसोड एडिट करताना नाकीनऊ येतात. मग टेक्नॉलॉजीला शरण जाऊन वेगवेगळी एडिटिंग सॉफ्टवेअर शिकण्याचा प्रयत्न करतो. ऑन द जॉब लर्निंगचा अनुभव ठायीठायी येतो. कौटुंबिक जीवनावरही परिणाम होतो. कधी



दीपाली नातू–केळकर



दीप्ती मायदेव–कान्हेरे

सकाळच्या नाश्त्याला डच्चू मिळतो तर कधी जेवणाची वेळ टळून गेली तरी रेकॉर्डिंग चालूच असल्यानं पोटातल्या कावळ्यांचा आवाज माइकवरून ऐकू जाईल की काय अशीही अवस्था होते. त्यात भर म्हणजे आम्ही तिघी आणि भारतातले पाहुणे हे सगळेच वेगवेगळ्या टाइम झोनमधले. म्हणजे आमच्यातली कुणी भल्या सकाळी आवरून, मेकअप करून गप्पा मारायला सज्ज असताना आमच्या पाहुण्यांना मात्र रात्रीचं जेवण लवकर आटोपून बसावं लागतं. त्याच वेळी तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या दोघींपैकी एक भाजीला फोडणी घालत असते तर दुसरी तिच्या कुटुंबीयांना हवं नको ते बघत असते. मल्टिटास्किंग शिकण्याचा याहून उत्तम मार्ग काय असू शकतो?

मात्र टेक्नॉलॉजीशी असलेल्या तोंडओळखीच्या जोरावर हा डोलारा उभारताना अनेकदा दमछाक होते, ओढाताण होते. कधी तब्येतीच्या तक्रारी डोकं वर काढतात. पण कधी मध्यरात्री फेसबुकवरचं रायटप लिहिता लिहिता हातातलं आणि डोळ्यातलं त्राण गेलेलं असताना, ''पित्त होईल ग, झोप आता, उद्या बघू'' असा एखादीचा मेसेज आला की आधार वाटतो. रेकॉर्डिंग करताना कधी अनेक रिटेक्स होतात. 'रंगभूमीवरचा अनुभव पाठीशी असूनही असं का होतंय' या विचारानं डोळ्यांत पाणी येतं. अशावेळी ''तुझे 'Opening closing chunks' वेगळे रेकॉर्ड करून एडिट करूया. काळजी करू नकोस'' या शब्दांतली ऊब पांघरून इतकं सुरक्षित वाटतं म्हणून सांगू. कधी काही कारणास्तव एपिसोड वेळेवर अपलोड होतोय की नाही या काळजीत असताना बाकीच्या दोघी आणि आमचे पाहुणेही भक्कमपणे पाठीशी उभे राहतात तेव्हा तुटतील ना कधीही असे मैत्रीचे, विश्वासाचे, 'हे बंध रेशमाचे' होत जातात. इतकंच नव्हे तर आमच्या कुटुंबातला १४ वर्षांचा आयुष कान्हेरे जेव्हा एडिटिंगची धुरा सक्षमपणे सांभाळतो, ८ वर्षांची स्वरा तिच्या मनातला क्वारंटाइन कट्टा स्वतःहून कागदावर रेखाटते तेव्हा आमच्या प्रयत्नांतला प्रामाणिकपणा, सच्चेपणा पुढच्या पिढीपर्यंत झिरपत चालल्याचं समाधान अवर्णनीय असतं. उदय सबनीस, दीपक करंजीकर यांसारखी मोठी माणसं कायम पाठीशी राहतात, मार्गदर्शन करतात, प्रसंगी कान धरतात तेव्हा आम्हालाच आमचा हेवा वाटतो.

सध्या कोरोनाच्या रूपानं जे संकट आपल्यासमोर उभं ठाकलंय त्याचं गांभीर्य, परिणाम, भीषणता यांचा ऊहापोह आणि चर्चा वारंवार होत आहे. पण एखाद्या संकटामुळे उद्विग्न होऊन कोलमडून पडायचं की त्यातून प्रेरणा घेऊन सर्व शक्तिनिशी स्वतःला आजमावत समृद्ध व्हायचं

ही  निवड ज्याची त्यानं करायची. आम्ही या संकटाकडे संधी म्हणून पाहिलं. आजुबाजूला पसरलेल्या नकारात्मकतेवर सकारात्मकतेची छोटीशी फुंकर घालायचा प्रयत्न आम्हाला क्वारंटाइन कट्ट्याद्वारे करता येतोय याचं आम्हाला समाधान आहे. दीपक करंजीकरांच्या भाषेत सांगायचं तर या निमित्तानं होणारं 'मनाचं उत्खनन' खूप गरजेचं आणि महत्त्वाचं वाटतं आम्हाला.

कोरोनाच्या प्रभावामुळे सध्या सर्वच क्षेत्रं कात टाकताहेत. ओटीटी प्लॅटफॉर्मचं महत्त्वं वाढलंय. एखादी कलाकृती तिच्या निर्मात्यापासून थेट प्रेक्षकांपर्यंत कुठलीही भेसळ न होता पोचवण्याची किमया आजच्या प्रगत तंत्रज्ञानानं साधली आहे. ओटीटी हे माध्यम अतिशय सोयीस्कर, कमी खर्चाचं आणि जगभरातल्या जास्तीत जास्त लोकांकडे सहज उपलब्ध होत आहे. चित्रपटांच्या बाबतीत बोलायचं झालं तर आयनॉक्स, सिनेमॅक्स, पीव्हीआर अशा मल्टिप्लेक्सना ॲमेझॉन प्राइम, नेटफ्लिक्स, हॉटस्टारसारखे पर्याय सर्वसामान्यांना माफक दरात घरबसल्या उपलब्ध झालेत. या पर्यायांमुळे प्रेक्षकांचा चित्रपटगृहांत जाण्यायेण्याचा वेळ आणि पैसे वाचताहेत. चित्रपटाच्या प्रसिद्धीवर होणाऱ्या अवाजवी खर्चात कपात करता येऊ शकेल का, याचा विचार निर्मातेही या निमित्तानं करतील. या माध्यमाच्या लोकप्रियतेचा फटका दूरदर्शनमालिकांना बसण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कारण प्रेक्षकांना त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार आणि हव्या तितक्या वेळा त्यांच्या पसंतीचे कार्यक्रम पाहण्याचं स्वातंत्र्य हे माध्यम देतंय; ज्याची एव्हाना त्यांना सवय झाली आहे. शिक्षणक्षेत्रही याला अपवाद नाही. शालेय शिक्षणासाठी ऑनलाइन लर्निंगचा उपयोग जगभरात होताना दिसतोय. एज्युकेशन आणि एंटरटेनमेंटच्या संयोगानं एज्युटेनमेंट ही नवी संकल्पना रुजू पाहते आहे. मात्र शिक्षण म्हणजे केवळ शालेय शिक्षणच का असायला हवं? होमस्कूलिंग हाही पर्याय असू शकतो असा विचार अनेक लोक करताना दिसताहेत. किंवा पाश्चिमात्य शिक्षण पद्धती नाकारत अर्थात अनस्कूलिंग करत मुलांना हव्या त्या विषयाचं शिक्षण त्यांना उपलब्ध करून देण्याकडेही पालकांचा कल झुकताना दिसतोय. नोकरदारवर्गात वर्क फ्रॉम होम संस्कृतीला लोकमान्यता आणि राजमान्यताही मिळताना दिसते आहे. प्रवासात होणारी दमणूक टाळता येत असल्यानं, कुटुंबाबरोबर वेळ घालवता येत असल्यानं कामाच्या दर्जावर त्याचा सकारात्मक परिणाम होतोय. एकंदरीत काय तर या प्रगत तंत्रज्ञानाच्या मार्फत आपण सगळेच वेगवेगळ्या शक्यता चाचपडून बघू लागलोय ज्या आपण एरवी कदाचित पाहिल्या नसत्या. इथून पुढे कदाचित या ओटीटी प्लॅटफॉर्मचा शिरकाव सर्वच क्षेत्रांत होईल. वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या ज्ञानाची कवाडं आपल्यासाठी घरबसल्या खुली होतील. मात्र सद्सद्विवेकबुद्धीची आणि तारतम्याची किल्ली वापरून, नीरक्षीर विवेकानं आपल्या आणि समाजाच्या उपयोगाचं ज्ञान वेचून घेण्याची मोठी जबाबदारी प्रत्येकावर असेल. ही जबाबदारी जितकी डोळसपणे पेलली जाईल तितकं सामाजिक स्वास्थ्य जपलं जाईल.

आज या लेखाच्या निमित्तानं गेल्या तीन महिन्यांचा काळ डोळ्यांसमोरून चाललाय. खरंतर 'एकत्र मिळून काहीतरी करूया ' असं आम्ही तिघी नेहमी म्हणायचो, पण आमच्यातलं स्थळ आणि वेळेचं अंतर कायम आडवं यायचं. म्हणजे असं आम्ही समजत होतो. मात्र सबब म्हणून जे अंतर आम्ही पुढे करत होतो ते आता गरज बनलं होतं. अवघ्या जगाचं वास्तव बनलं होतं. त्यामुळे असंही वाटून गेलं की एकवेळ शरीरानं दूर असलो तरी चालेल पण कुणाच्याही 'अंतरी' या अंतरानं घर करता काम नये. माणसं मनानं दुरावता कामा नयेत आणि क्वारंटाइन कट्ट्याला गती मिळाली. एका अर्थी या अंतरानंच आम्हाला जवळही आणलं. रिमोट राहूनही एकत्र काम करता येऊ शकतं असा साक्षात्कार आम्हाला झाला. आणि मायभूमीतल्या रंगभूमीशी तुटत चाललेली आमची नाळ या प्रकारच्या माध्यमातून पुन्हा जुळू लागली. आमच्या चर्चा, वाचन, चिंतन आणि अभ्यासातूनच इतका आनंद मिळायला लागला, की काही कळायच्या आतच कट्ट्यानं मूर्तरूप धारणही केलं. या तीन महिन्यांत आम्ही जे शिकलो, अनुभवलं ते शब्दातीत आहे. कट्ट्यावर येणारे सगळेच पाहुणे आम्हाला काही ना काही देऊन गेले, शिकवून गेले. कट्ट्यावर सुप्रसिद्ध वैद्य सुविनय दामलेंशी समृद्ध भारतीय संस्कृती आणि आयुर्वेदाबद्दल बोलताना मनातली भीती आणि नकारात्मकता दूर पळून गेली. त्यांनी दिलेला Barter is better हा कानमंत्र आमच्या कायम स्मरणात राहील. उपजीविकेसाठी आपण कितीही वणवण करत असलो तरी ती शेवटी 'उप'जीविका असते', 'मुख्य' किंवा खरी जीविका काही वेगळीच असते, असं दीपक करंजीकरांच्या तोंडून ऐकल्यावर आयुष्याकडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन मिळाला. आयुष्यात मिळालेला मोठा नकार पचवून उद्विग्न न होता, त्यातून बोध घेत, सकारात्मक पद्धतीनं स्वतःला समृद्ध करत जावं हा गुरुमंत्र ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखलेंकडून मिळाला आणि आमची गुरुपौर्णिमा खऱ्या अर्थानं साजरी झाली.

कट्ट्याच्या निमित्तानं आमचा मित्रपरिवार वाढला, जुने मित्र नव्यानं भेटले, काही ऋणानुबंध आणखी दृढ झाले, किती गोष्टी नव्यानं कळल्या. आमच्यातल्या गुणदोषांची उजळणी झाली, स्वतःची स्वतःशी नव्यानं ओळख झाली. मात्र त्यावेळी असंही जाणवलं की या साऱ्या गोष्टी एरवीही होऊच शकल्या असत्या की. त्यासाठी कोरोनाला अवतार का धारण करावा लागला? ...कारण आपल्या आयुष्याची बेलगाम गाडी सुसाट वेगानं पळत होती, आपल्याच धुंदीत. तिला कोरोनारूपी ब्रेक लागला आणि आपण भानावर आलो. यापुढे मात्र हा लगाम आपल्या हातात असायला हवा. आपल्या वेगावर नियंत्रण आपणच ठेवायला हवं. तुकोबा म्हणतात तसं मनाशी संवाद साधत 'आपुलाचि वाद आपणासि' व्हायला हवा. नियमितपणे आत्मावलोकन, आत्मचिंतन व्हायला हवं. जीवन'गाणं' गाताना वेगवान 'ताने'च्या जोडीला 'ठेहराव' असेल तर आनंदरूपी 'समे'वर सहज पोचता येईल. क्वारंटाइन कट्टा पुढे चालू राहील न राहील; पण त्यानिमित्तानं मिळालेलं हे शहाणपण आयुष्यभर आमची साथ करेल.

**कविता जोशी**
+१(६५०) ९४२ ९५५८
**दीपाली नातू-केळकर**
+१(८०५) ८२४ ८४४२
**दीप्ती मायदेव-कान्हेरे**
+१(७१३) ४५९ ३४१६

# का व्य रं ग

तरुण होणाऱ्या मुलामुलींना पाहताना सगळ्या आईवडिलांच्या मनात येणारे नेमके विचार शेक्सपीयरने आपल्या या काव्यात लिहिले आहेत. १६०९ मध्ये त्याने लिहिलेली सुनीत काव्यं पारंपरिक रचनेपेक्षा वेगळी आहेत. याला शेक्सपीरियन सॉनेट असेच नाव पडले. आधीच्या सुनीत काव्यांमध्ये देशभक्ती, प्रेम, स्वार्थत्याग असे विषय असत. ती पेट्रार्क या इटालियन कवीमुळे पेट्रार्कन सॉनेट म्हणून ओळखली जातात. शेक्सपीयरन सॉनेटमध्ये मात्र प्रेम, सौंदर्य, अनैतिकता, नैतिक मूल्ये असे विषय दिसतात. सुनीत हे १४ ओळींचे काव्य. पेट्रार्कन सॉनेटची रचना ८+६ अशा ओळींची असे. शेक्सपीयरन सॉनेट ४+४+४+२ अशा रचनेत लिहिलेले आहे. १५४ पैकी पहिल्या १२६ कविता एका तरुणावर लिहिल्या आहेत आणि नंतरच्या २८ एका मुलीवर. त्यानी लिहिलेल्या सुनीत काव्यांचे नुसते क्रमांक आहेत. त्या कवितांना शीर्षके नाहीत. १५४ सॉनेटपैकी हे दुसरे. पण सोयीसाठी मी त्याला शीर्षक दिलेय 'वार्धक्यातलं तारुण्य'.

## वार्धक्यातलं तारुण्य

चाळीस वर्षांच्या हिवाळ्याने जेव्हा तुमच्या डोळ्यांना वेढलंय,
आणि तुमच्या सौंदर्यामध्ये (सुरकुत्यांनी) जणू बंधारे घालून ठेवलेत;
आत्ता, तुमच्या तारुण्यातले एकेकाळचे, लक्षवेधी कपडे भासतील जीर्ण गवतासारखे अर्थहीन.

कोणी जर विचारलं, 'कुठे गेलं ते सौंदर्य
आणि ते मुसमुसणारं तारुण्य?'
'माझ्या खोल गेलेल्या, डोळ्यांमध्येच आहे ते!' असं सांगणं,
हे चारीठाव शरमेनी आणि निरर्थक (स्वतःबद्दलच्या) कौतुकाने बोलणं आहे.

यापेक्षा, जर तू असं सांगितलंस;
तुझ्या सौंदर्याचं खरं कौतुक तुझ्या या उत्तरात आहे की,
'माझ्या सुंदर मुलाला मोठं करण्यात माझं वाढलेलं वय दडलंय;
माझ्या सौंदर्याला तोच पुढे नेतो आहे.'

त्याचं तारुण्य पाहणं हेच माझ्या वार्धक्यातलं तारुण्य..
माझ्या गारठलेल्या रक्ताला, त्याच्याकडे पाहताना ऊब आणणारं!

**मूळ कवी – विल्यम शेक्सपीयर**

हे दुसरे सॉनेट आहे जॉन डन या १७ व्या शतकातल्या एका प्रसिद्ध इंग्रजी कवीचे. याची रचना शेक्सपीरियन सॉनेटप्रमाणेच आहे. डन हा मेटॅफिजिकल (नवतत्त्वज्ञान) काव्याचा जनक. म्हणजे विज्ञानावर आधारित असलेले तत्त्वज्ञान हे त्याच्या कवितेचे विशेष. १६३३ मध्ये प्रसिद्ध झालेले हे सॉनेट. 'मृत्यू' म्हणले की असहाय्य वाटण्याची सवय असलेल्या साक्षात मृत्यूला उद्देशून लिहिलेलं हे अतिशय परिणामकारक आणि आपल्याला शिकवण देणारं हे सॉनेट.

## मृत्यो!

हे मृत्यो, दाखवू नकोस जास्ती मिजास..
म्हणत असतील काही बापडे तुला, सामर्थ्यशाली, भयानक वगैरे.
पण तू तसा नाहीयेस.
तू करू शकतोस, तुला घाबरणाऱ्या लोकांचं समूळ उच्चाटन,
असं तुला वाटत असेलही.
पण तो मृत्यू नाहीच रे! बिचाऱ्या मृत्यू, तू मला तर मारूच शकणार नाहीस!

विश्रांती आणि झोप यातल्या अवस्था, अनेक रूपं, आनंददायीही,
आणि त्या पुढची अवस्था फक्त म्हणजे तू रे..
आणि अनेक उत्तमोत्तम लोक तुला सामील होतीलही. त्यांची हाडं इथे विसावून..
आणि आत्म्याचे समर्पण करून.

तू तर आहेस केवळ एक गुलाम, नियतीचा, अनाहूत संधीचा, राजेमहाराजांचा आणि परिस्थितीने व्याकूळ झालेल्या लोकांचा,
विष, युद्ध आणि आजारपणाचा एक सांगाती..
अफू आणि जादूटोण देखील आम्हाला असे निद्रामय करू शकतात..
तुझ्या झटक्यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने.. कशाला रे एवढ्या गर्वाने फुगतोयस तू?

तू म्हणजे केवळ एक छोटी डुलकी भूतलावरच्या जगण्या आणि नंतरच्या अमर्याद नितांत आयुष्यामधली जिथे मृत्यू नाहीच.. एक दिवस असा येईल आणि हे मृत्यू, तुझ्याविषयीच्या भीतीचाच (संकल्पनेचा, पर्यायी तुझाच) अंत होईल!

**मूळ कवी – जॉन डन**

**कवितांचा अनुवाद : अपर्णा महाजन**
भ्रमणध्वनी : ९८२२०५९६७८

# का व्य रं ग

## सजीव–निर्जीव

एक निर्जीव विषाणू जिवंत माणसाला एकदम मच्छर करून टाकतो–
सगळं विश्व मुठीत घेऊ पाहणारे, कर्मानं मलीन झालेले हात
पाच पाच मिनिटाला धुवायला लावतो–
फुकटच तोंड दिलंय म्हणून खूपच चराचरा बोलणारं थोबाड मास्कनं झाकायला लावतो–
किडामुंगीसारखा घाबरून आपल्या घर नावाच्या बिळात
लपून बसायला सांगतो–
एक दिवस मुंबई बंद, महाराष्ट्र बंद, भारत बंद करण्यासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्या जिवंत माणसांना सगळं जग कसं बंद करायचं याचा डेमो देतो.
एक निर्जीव विषाणू जिवंत माणसाला एकदम मच्छर करून टाकतो–
या बुद्धिवान माणसाला या सूक्ष्म विषाणूला मारायला काय अवघड आहे–
पण हा जिवंतच नाही, हाच प्रॉब्लेम आहे.
जो जिवंतच नाही तर कसं मारायचं त्याला?
तो सूक्ष्म जीव बहुधा जन्म आणि मृत्यूच्या पलिकडला.
बरं हा निर्जीव आहे, पण आपल्यासारखे दुसरे निर्जीवही निर्माण करतो
आणि निर्जीव निर्माण करण्यासाठी चक्क माणसाचं जिवंत
शरीर वापरतो–
एक निर्जीव विषाणू जिवंत माणसाला एकदम मच्छर करून टाकतो–
माणसाला फक्त सजीव मारता येतात, निर्जीवांना मारण्याचं तंत्रज्ञानच विकसित करायला तो विसरला–
हा विषाणू जर माणसाचं शरीर वापरत असेल त्याच्या अस्तित्वासाठी
तर मग एकच मार्ग माणसाच्या हातात उरला,
वापरून टाकायचा एकदा,
अणुबॉम्ब संपूर्ण पृथ्वीचा विध्वंस करण्याची क्षमता असलेला
सगळी माणसं नष्ट झाली तर पाहूया हा कोरोना त्याच्यासारखे
दुसरे निर्जीव कसे निर्माण करतो–
एक निर्जीव विषाणू जिवंत माणसाला एकदम मच्छर करून टाकतो–
जेव्हा स्वार्थी ढोंगी आणि हिंसक वृत्तीच्या सजीवांचा समूळ नाश होतो
तेव्हाच एक निरागस अमिबा पुन्हा या विश्वात जन्म घेतो.

**– आनंद म्हसवेकर**
भ्रमणध्वनी : ९८२११११५५१७
anand.mhasvekar@yahoo.com

## सातबारा

माजा माजा यमाचा खाजा
काय नेवचू नाय वरती
तीळ सुद्धा वाटून खावचो
आमची आजी सांगा होती

सक्को कोण, चुलत खयचे
कित्याक इस्कटतात माती
सुरंगी सारखी गुवान घेवची
काळजा–भिवुत नाती

धनदौलत मानमरातब
सगळा अळवावरचा पाणी
चवदा वर्षा रानात वावरा
गरती अयोध्येची राणी

दाया–उजया भायला भितुतला
तरी जोडून घेवची माणसा
पाखरा उंदरासाठी शेतात
थोडी सोडून देवची कणसा

रानात वासो समुद्रात मासो
नशिबाक कश्याक कोसा
तारे–वारे सगळा आभाळ
आमच्याच सातबारावर आसा

**– उषा परब**
भ्रमणध्वनी : ९४२३८१८८२८
ushaparab3@gmail.com




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

बा
**मनभावन**

**ललिता छेडा**




**मनाला भावलेल्या बावन्न कला**

''थँक यू सुहास. आजूबाजूला घडत असतं ते पाहणं आणि दिसणं यातला तिसरा कोन दृष्टीचा असतो, जो मी अहंकाराने दूषित केला होता. माझ्या वागण्याचं समर्थन नाही पण खडतर दिवसात आलेल्या वाईट अनुभवांमुळं हा कडवटपणा आला असेल. बहुतेक, परंतु जवळची माणसं आता मला गमवायची नाहीत.'' (पान क्र. १३०)

प्रत्येक माणसाच्या जगण्यात स्वत:चा एक दृष्टिकोन असतो. त्याच्या दृष्टीच्या कोनातून जे योग्य दिसते, मनाला भावते, तशी त्याची जगण्याची रीत होते. हा दृष्टिकोन चूक की बरोबर, याचे भान अन्य कुणी करून देत नाही तोपर्यंत त्याची स्वत:च्या आयुष्याची पाऊलवाट तशीच सुरू राहते. पुन्हा प्रश्न उरतोच. दृष्टिकोनाची दिशा समजावून दिल्यानंतरही तिचा स्वीकार करणे शक्य होते का? पुन्हा नव्याने नवी पाऊलवाट तुडवण्यास मन राजी होते का? सुमंत आणि सुहास यांच्या वागण्यात, आयुष्याकडे पाहण्यात जे अंतर आहे, ते 'दृष्टिकोन' ही कथा उलगडून दाखवते. ''आई, सर्वात प्रथम तुम्ही आमच्या आणि रंजनाच्या संसाराची तुलना करू नका. प्रत्येकाचा स्वभाव, विचार वेगळे असतात आणि संस्कार करू म्हणून होत नाहीत. संस्कार होण्यासाठी आपला स्वभाव, आजुबाजूची परिस्थिती, माणसं हे जबाबदार असतात. एकदा स्वत:चा शोध घेऊन दुसऱ्याला आनंद देता आला, की समृद्ध आयुष्य जगता येतं.''

घरात आलेली सून, ही आई आणि मुलगी यांच्यातला मध्य असतो, तराजूच्या काट्यासारखा, आई सतत लक्ष ठेवून असते ती याच काट्यावर. त्यावरून सुनेच्या चुका, संस्कार, तिचे आईवडील यासारख्या असंख्य जागा नाव ठेवण्यासाठी उपलब्ध असतात. या जागी आपली मुलगी किती गुणी आहे, तिच्यावर आपले संस्कार किती उत्तम आणि बळकट आहेत, ही तुलना ठरलेलीच असते. आणि याचे झुकते माप नेहमी सुनेच्या विरोधी पारड्याला जाते. परंतु कधीतरी आईलाही उमगते, सगळ्या घरी असलेल्या चुली (शेगडी?) मातीच्याच असतात. सून आणि स्वत:ची मुलगी यांच्यात फरक करता येणार नाही, हे सत्य नंदिनीच्या सासूबाईंना उमगते ते 'अष्टभुजा' या कथेत.

बहिणी–बहिणीत तुलना आणि चढाओढ नाही, असे सहसा कुठे आढळत नाही. त्याला सौंदर्य, रंग, शिक्षण, शारीरिक ठेवण, बौद्धिक पातळी अशी अनेक कारणे असतात. त्यातून त्या एकमेकींवर मात करण्याचाही प्रयत्न करण्यात कसूर ठेवीत नाहीत. त्यातून आईचा पाठिंबा कुणा एकीच्या पाठी असेल तर दुसरीचा संसार उद्ध्वस्त व्हायला वेळ लागत नाही; परंतु माणसाला सदसद्विवेकबुद्धी असते आणि तिचा योग्य तो वापर करून कुणीतरी एक दुसऱ्यासाठी स्वत:च्या सुखाची होळी करायला तयार होतो. याला माघार घेणे म्हणायचे का? हा एक वेगळा दृष्टिकोन 'माघार' या कथेत वाचायला मिळतो.

आयुष्यात प्रत्येकाला हवा असतो आपल्या आवडीचा रंग, एनर्जी देणारा, सुखाचा नितळपणा मिरवणारा. भलेही तो भडक असेल परंतु निर्लेप असेल. त्यात कुठला रंग मिसळून त्याचे मूळ स्वरूप बिघडून टाकणारा डल रंग नकोसा असतो. असा डल रंग म्हणजे ग्रे रंग. दोन मैत्रिणी राजश्री आणि रश्मी अशाच स्वत:चा पॅशनचा, एनर्जीचा रंग निवडण्याचा, एकमेकीवर मात करण्याचा डाव खेळतात. हा डाव असतो रोहित या नावासोबत. त्याच्यातला डाव कोण जिंकला याची उत्कंठा शेवटपर्यंत वाढवणारी ' 'ग्रे'वाली शेड' ही कथा लेखिकेच्या कौतुकात भर घालणारी आहे.

ललिता छेडा यांचा हा पहिला कथासंग्रह आहे. या संग्रहात बावन्न कथा आहेत. म्हणजे हा लघुककथांचा हा एक संग्रह आहे. कथेत सातत्याने बदल होत आहेत. तो बदल आता ब्लॉगलेखनापर्यंत आला आहे. या संग्रहातील कथा या ब्लॉगवरील कथा आहेत. या लेखनात असलेले सातत्य अचंबित करणारे आहे. एक विचार, धागा, सूत्र समोर ठेवून त्यावर कथेची उभारणी करणे सामान्य लेखकाचे काम नाही. त्यासाठी प्रतिभा आणि कल्पकता याची मोठी शिदोरी लेखकाजवळ असावी लागते. ती ललिता छेडा यांच्याकडे पुरेपूर असल्याची ग्वाही हा कथासंग्रह देतो. पहिलाच कथासंग्रह असूनही त्यात कुठे नवखेपण जाणवत नाही. नदीचा प्रवाह संथपणे परंतु दमदारपणे सुरू असतो, तशा कथा दमदार आणि प्रवाही आहेत. आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे, माणसांच्या स्वभावाकडे पाहण्याचा, निरीक्षण करण्याची आणि त्यातून कथेला आकार देण्याची लेखिकेची क्षमता आणि ऊर्जा वाखाणण्यासारखी आहे. 'रेशीमगाणे', 'मनातलं माझ्या', 'वेगळं राहायचंय', ' 'ग्रे'वाली शेड' यांसारखा अनेक उत्तम कथा. लेखिकेच्या पुढील प्रवासाची ग्वाही देतात.

सतीश भावसार यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ आणि केलेली मांडणी म्हणजे फुलपाखराच्या कोशावर कोरलेली नक्षीच म्हणावी लागेल. कथा जशा एक सुखद अनुभव देत जातात तसे मुखपृष्ठ, आतील रेखाटणे तरल अनुभव देतात. शीर्षकातही 'भावन'ऐवजी 'बावन' अशी योजना केलेली आहे, ती 'बावन्न कथांचा गुच्छ' यासाठी समर्पक ठरलेला आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

**वाटेवरले दिवे**

**नीला उल्हास चांदोरकर**



**मी आहे, तू पावलं टाकत राहा**

''आपल्या नातेवाईकांचं आपल्या जीवनातलं मोल तांदळाच्या दाण्यावरील टरफलासारखं असतं. तांदळाचा दाणा टरफलासकट आपण खाऊ शकत नाही पण तो जमिनीत रुजवताना टरफलासकटच पेरावा लागतो. अन्यथा तो रुजत नाही, याचा अर्थ असा, की नातेवाईक आपल्याला जीवनातल्या प्रत्येक प्रसंगी उपयोगी पडत नसले तरी आपल्या भल्यासाठी, आपल्या मानसिक स्वास्थ्यासाठी त्यांचं मूल्य मोठंच असतं.'' (पृ. १५२)

आयुष्याच्या वाटेवरचा प्रवास हा अनेकांच्या साथीसोबतीने, सल्ल्याने, मार्गदर्शनाने आणि शिक्षणाने पूर्ण करण्यास मदत होते. त्यांच्याशिवायच प्रवास म्हणजे अज्ञाताच्या निबिड अंधारातून भरकटणे ठरते. हे भरकटणे टाळून योग्य त्या मार्गाने योग्य त्या ईप्सितापर्यंत प्रवास होतो. जीवनातली सार्थकता समजली जाते. ज्यांना ही सार्थकता लाभली त्यांचे जगणे संपन्न आणि सुफल झाल्याचे समाधान देते. अशा सुफलसंपन्न आयुष्याचा पट लेखिका नीला उल्हास चांदोरकर यांनी 'वाटेवरले दिवे' या पुस्तकात उलगडून दाखवला आहे.

आयुष्याची सुरुवात घरातून होते. अर्थातच पहिले दैवत, पहिले गुरू हे घरातल्या देव्हाऱ्यात असतात ते म्हणजे माता आणि पिता. त्यांच्या ऋणाची, संस्काराची, शिक्षणाची बोट धरून चालवण्याची कल्पना त्याच्यासाठी कर्तव्य ठरते. परंतु ज्यांच्यावर हे पैलू पाडले जातात, त्यांच्यासाठी हे देव गुरू असतात. लेखिका अशा आयुष्यातील विभूतींना 'वाटेवरले दिवे' असे संबोधतात ते किती यथार्थ आहे, याचा अनुभव हे पुस्तक वाचताना येतो.

या पुस्तकाची सुरुवात होते ती मिळालेल्या वारशाची, संस्काराची आणि पुण्याईची. याचे सारे श्रेय जाते वडिलांकडे– गणेश नीळकंठ कात्रे यांच्याकडे. कुणाचाही आधार नाही. म्हणावेत असे नातेवाईक नाहीत. आपत्तीजनक दुर्दैव म्हणायचे तर लहानपणीच मातापित्याचं छत्र हरवल्याने आलेले अनाथपण. अशा सर्व बाजूंनी निबिड अंध:कार असताना जीवनाची वाटचाल कशी करता येईल, हा प्रश्न ब्रह्मराक्षसासारखा समोर ठाकलेला. तरीही आपल्या हिमतीवर, कुवतीवर, बुद्धीचा काटेकोर कौशल्यावर त्यांनी आपली जीवननौका कशा यशस्वीपणे पैलतीरापर्यंत पोहोचवली, आलेल्या प्रसंगांना कसे धीरोदात्तपणे सामोरे गेले, याची ही कहाणी लेखिकेने वाचकांसमोर या पुस्तकातून मांडलेली आहे.

एलएलएमपर्यंत शिक्षण, न्यायाधीश म्हणून कारकीर्द, निवृत्तीनंतर पुन्हा वकिली, संस्कृतचा प्रचंड व्यासंग, मेघदूताचा त्यांनी केलेला उत्तम पद्य अनुवाद, ज्याला अर्नोल्ड स्कॉलरने गौरविले गेलेले, बुद्धिप्रामाण्यवादी, सचोटीने वागणे, चोख व्यवहारीपणा, आपल्या कुटुंबाप्रमाणेच मामाच्या कुटुंबाचा प्रतिपाळ करणे, उच्च मूल्यांचा अंगीकार आणि संस्कार असे विविध गुणांनी अलंकृत असलेले वडील– ज्यांना घरात सर्वजण 'काका' म्हणत. त्यांच्याविषयी लेखिकेने फार आत्मीयतेने आणि आदराने लिहिलेले आहे. तसेच आपल्या स्वत:च्या सुफल आयुष्याचे सारे श्रेय त्यांना अर्पण केलेले आहे.

एका स्त्रीचा प्रवास हा मातापिता पती, सासूसासरे, मुले, नातवंडे, भावंडे यांच्या सहवासातून घडत जातो. प्रत्येक टप्प्यावर ही सगळी मंडळी आकाशातील तारे, ग्रह यांच्याप्रमाणे भेटत असतात. लेखिकेच्या आयुष्यात अशी ही सर्व मंडळी आलेली आहे. त्याच्याविषयीदेखील अतिशय हळुवारपणे लिहिलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांचा वडिलांच्या नोकरीनिमित्ताने झालेल्या बदल्या, तेथील अनुभव, शालेय आणि कॉलेज जीवनातले अनुभव, त्यानंतर संसारात व नोकरीत आलेले अनुभव या सगळ्याविषयी तपशीलवार लेखन केलेले आहे.

सदर पुस्तक दोन भागांत विभागले आहे. एक, वडिलांविषयी आणि दुसरे, संसारात स्वत: रमल्यानंतरचे. शिवाय स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झालेले मधुकर कात्रे आणि त्यांची बहीण सुमन कात्रे यांच्याविषयीची माहिती परिशिष्टरूपाने सोबत दिलेली आहे. पुस्तकाची मांडणी स्वतंत्र प्रकरणातून केलेली असून प्रत्येकाला शीर्षक दिलेले आहे. वडिलांना जसा संस्कृतचा व्यासंग होता तसा लेखिकेला संस्कृत आणि इंग्रजीचा व्यासंग आहे. या व्यासंगाचा उपयोग या लेखनात झाल्याचा दिसून येतो. मुलीच्या लग्नाच्या वेळी प्रत्येकाची काय अपेक्षा असतात त्याचा श्लोक– कन्या वरपते रूपं, माता वित्तं, पिता श्रृतम् आणि असे अनेक श्लोक त्या सहजपणे लिहून जातात. त्याचप्रमाणे इंग्रजी वाक्येही देतात, विल्यम वर्ड्सवर्थचे काव्यनिर्मितीमागचे प्रख्यात वाक्य. (पृ. २०४)

लेखिकेचा परिचय आहे तो अनुवादिका म्हणून. त्यांची अनुवादाची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. सदरचे पुस्तक ही त्यांची स्वतंत्र निर्मिती आहे. प्रामाणिक आणि प्रांजळ असे हे जीवनप्रवासाविषयीचे लेखन आहे. यातला नितळपणा भावणारा आहे. त्याचबरोबर मागील शंभर वर्षांतील सामाजिक, शैक्षणिक, ब्रिटिशपद्धती, संस्थाने व संस्थानिक, जातीय पद्धती यांचे वर्णन या पुस्तकात सखोलपणे आलेले आहे.

सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य ३०० रु.  सवलतीत १८० रु.**

## ग्रंथाली

# ग्रंथपान

## वंश–अनुवंश

**हेमा पुरंदरे**




### आपल्या आयुष्याविषयी बोलू काही

''जनुकं ही डीएनएच्या साखळीतला एक छोटासा तुकडा. वारसांपर्यंत पूर्वसुरींची माहिती जशीच्या तशी पोचवणारा हा महत्त्वाचा दुवा. आईकडून आलेली एक प्रत आणि बाबांकडून एक प्रत, अशा आपल्याकडे प्रत्येक जनुकाच्या एकूण दोन प्रती येतात.''

या वाक्याची प्रचीती अनेकदा पोलिस तपासाच्या निमित्ताने येते. मधल्या काळात एका राजकीय नेत्याबाबत अशीच बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यांचे पितापुत्राचे नाते सिद्ध करण्यासाठी या डीएनएच्या चाचणीची मागणी करण्यात आली होती. अनेक गुन्हे उकलण्यात या चाचणीचा उपयोग केला जातो. परंतु एवढेच मर्यादित क्षेत्र या डीएनएने व्यापलेले नाही, त्याची व्याप्ती प्रचंड मोठी आहे. याच्या मुळाशी असलेले 'जनुक' हा स्वतंत्र विज्ञानाच्या अभ्यासाचा विषय आहे आणि जन्माला येणाऱ्या प्रत्येकाशी तो जोडलेला आहे. त्याच्याविषयी अनभिज्ञता आणि जागरूकता याच्या अभावी किती विकारांना सामोरे जावे लागते, ह्याची आपणास माहितीच नसते. मुळात जनुक ही विज्ञानाची स्वतंत्र शाखा आहे हेच आपणास माहीत नसते, त्यामुळे त्याच्याविषयीची जागरूकता असणे कठीण. हे कठीण काम सोपे केले आहे, डॉ. हेमा पुरंदरे यांनी.

भारतात पहिली जनुकीय प्रयोगशाळा सुरू करण्याचा मान डॉ. हेमा पुरंदरे यांच्याकडे जातो. गेली चाळीस वर्षे त्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. अनेक अडीअडचणींवर मात करून त्यांनी या क्षेत्रातले योगदान सिद्ध केले आहे. जनुक हा घटक, त्याचे कार्य, होणारे विकार, त्यावरचे उपाय आणि चाचण्या, त्यांची व्याप्ती, ह्यांची ओळख ही डॉ. हेमा पुरंदरे यांची ओळख. ती ओळख 'वंश–अनुवंश' या पुस्तकातून वाचकांच्या समोर ठेवली आहे. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीनंतरही निव्वळ 'माहिती नाही' म्हणून कुणाला त्रास भोगावा लागू नये ही तळमळ. पेशंट्सची मन:स्थिती, त्याच्या कुटुंबीयांचे स्वभावविशेष, त्यांचे जनुकीय समुपदेशन, तसंच वेळेवर योग्य त्या तपासण्या आणि उपाययोजना केल्या तर त्यामुळे होणारे फायदे ह्याबद्दल सर्वांनाच थोडीफार कल्पना यावी, हा हेतू समोर ठेवून या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

डॉ. हेमा पुरंदरे यांचे वैशिष्ट्य असे, की आपल्या भारतातील जनतेला आपल्या ज्ञानाचा सदुपयोग व्हावा म्हणून त्या परदेशात शिक्षण पूर्ण करून भारतात आग्रहाने परतल्या. परदेशी आमिषांना त्यांनी निग्रहाने टाळले. उच्च शिक्षण प्राप्त करण्यासाठी घेतलेले कष्ट आणि जिद्द यांच्याबरोबर त्यांनी आपले आपल्या मातृभूमी आणि आपले बांधव यांच्याशी असलेले नाते मनात आणि कृतीत घट्ट केले.

माणसाच्या शरीरात असणाऱ्या गुणसूत्रांची संख्या, त्यांची विभागणी, मातापित्याकडून त्यांचे बाळाकडे होणारे संक्रमण, यांचा तपशील शरीरशास्त्रानुसार इथे दिलेला आहे. परंतु या गुणसूत्रामध्ये मातापित्याच्या स्तरावरच हा दोष वा बिघाड असेल तर त्याचे परिणाम बाळाला कसे सहन करावे लागतात, याचे विश्लेषण थक्क करणारे आहे. १३, १८, २१ या प्रमाणात असलेल्या गुणसूत्रांच्या दोषांमुळे उद्‌भवणारे विकार, लैंगिक, गुणसूत्राचे दोष यांचे विश्लेषण करताना त्यांनी या गुणसूत्रांना 'नाठाळ', 'द्वाड' अशी विशेषणे दिलेली आहेत.

बाळांमध्ये दिसणारे विकार, व्यंग, बौद्धिक, शारीरिक जडणघडणीत स्पष्ट जाणवणारे बदल, हे सर्व कशामुळे होतात? त्वचा, स्पर्श, शारीरिक कमकुवतपणा, लैंगिक दोष, अनेक विकाराचे मूळ हे जनुक आहे, त्यांची प्रत्येकाची ओळख या पुस्तकातून करून दिलेली आहे.

'वंश–अनुवंश' हे मराठीतील पहिलेच पुस्तक आहे, जे जुनक या घटकाचा सर्वांगीण परिचय करून देते. खरेतर हे आत्मचरित्रात्मक लेखन ठरले असते. परंतु केवळ ठरावीक अशी स्वत:ची माहिती, ओळख देत त्यांनी मुख्य लक्ष केंद्रित केले आहे ते जागरूकतेवर. प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र शीर्षक दिलेले असून त्या त्या विषयाची माहिती त्या प्रकरणात दिलेली आहे. ही माहिती वाचकाच्या डोळ्यांत अंजन घालणारी असून 'जागरूक पालकत्व' सिद्ध करण्यासाठी आत्ममुख करणारी आहे. उद्याची पिढी सुदृढ, निकोप असावी या आशेला खतपाणी घालणारी आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचावा, नव्हे संग्रही ठेवावा असा हा संदर्भग्रंथ आहे. यात नुसती माहिती नाही तर यापूर्वी ज्यांनी संशोधन केले त्यांचे संदर्भ आहेत. लेखिकेला अनुभवास आलेल्या 'केसेस'चा संदर्भ दिलेला आहे. प्रत्येक केस, त्यांचा अनुभव हा आपल्या ज्ञानाचे कप्पे उघडत जाणारा आहे. शिवाय त्यांनी स्वत:चे छंद, उपक्रम, शेती, बाग, पाळीव प्राणी यांचाही तपशील दिलेला आहे.

उज्ज्वला गोखले यांनी या लेखनाचे शब्दांकन केलेले आहे, ते प्रथमपुरुषी असल्याने त्यासाठी किती व्यवधाने पाळावी लागली, याचा खुलासा त्यांनी त्यांच्या मनोगतात केला आहे. कुठलेही शब्दांकन करताना मूळ लेखकाच्या कलाकृतीला जराही धक्का लागणार नाही याची खबरदारी घ्यावी लागते ती त्यांनी घेतली आहे. अतिशय सोप्या पद्धतीने केलेले हे लेखन, विषय कठीण असूनही सोपा झालेला आहे.

सतीश भावसारांचे मुखपृष्ठ सुंदर!

**हार्ड बाऊंड मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.**
**पेपरबॅक मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रु.**

# ग्रंथपान

**मन मुक्त ...माझे!**
**नीलिमा गुणे–गोळे**




**मनातल्या उमललेल्या कळा**

आयुष्यात कधी कधी अशी घटना घडते, की ती आपल्या मनावर खोल ठसा उमटवते आणि त्या घटनेची स्मृती आपल्याला पुन:पुन्हा सुखावत राहते. (पृष्ठ क्र. ९१)

नीलिमा गुणे–गोळे यांचा प्रकाशित झालेला हा पहिलाच लेखसंग्रह. पहिला म्हटलं, की साधारणत: ‘पहिलटकरीण’ या अर्थाने, म्हणजे परिपक्वतेच्या पातळीवर अजून पोचण्यासाठी बराच (लेखन) प्रवास करावा लागणार, असा समज पटकन तयार करण्याची शक्यता अधिक असते. परंतु या समजाला अपरिपक्व ठरवणारे हे लेखन आहे, याची प्रचीती हा संग्रह वाचल्यानंतर येते. या संग्रहात लेखांची क्रमवारी विषयानुसार नाही. परंतु वाचक म्हणून आपल्याला त्याचे विभाग करता येतात. प्रवास, प्रवासवर्णन, निसर्गप्रेम, चित्रकला आणि आपले आप्त, असे हे विभाग होत आणि हे सगळे वैयक्तिक आयुष्याच्या पातळीवरील जोडलेले, अनुभवलेले, वास्तवाशी निगडित असे लेख आहे. याचा समावेश आत्मचरित्रात करता येऊ शकेल, म्हणजे तरीही हे आत्मचरित्र नाही हे लक्षात घ्यायला हवे.

लेखिकेचा पहिलाच लेख आहे तो विमान–प्रवासाने परदेशी जाण्याविषयीचा, लग्नानंतरचा. म्हणजे संसाराश्रमात प्रवेश आणि नवीन प्रदेश, तेथे स्थिरस्थावर होणे, त्यासाठी करावी लागलेली धावपळ, धडपड, आप्तांपासून दूर गेल्याने आलेले विरक्तीपण आणि आपला दोघांचा संसार यांतला आनंद, वेगळे काही करत असल्याचे समाधान असे बारीक–बारीक तपशील येथे येतात. ते वाचत असताना त्या नवप्रदेशात वाचकही त्यांच्या अनुभवात सहजपणे स्वत:ला कल्पित जातो.

लेखिकेने जे.जे. स्कूलमधून शिक्षण पूर्ण केलेले असून टेक्सटाइल डिझायनर म्हणून वेगवेगळे अनुभवही घेतलेले आहेत. परंतु अमेरिकेत गेल्यानंतर आहे त्याच शिक्षणावर समाधान मानून स्वस्थचित्ताने जगण्याचा आरामशीर मार्ग त्यांनी नाकारलेला आहे. अधिकाधिक शैक्षणिक अर्हता प्राप्त करून स्वत:ला सिद्ध करण्याची जिद्द खरोखर वाखाणण्यासारखी म्हणावी लागेल. जोडीदार डॉ. दिलीप यांचीही जिद्द आणि प्रोत्साहन हा त्यातला पल्सपॉईंट ठरला तरी स्वत:चे स्वत्व सिद्ध करणे महत्त्वाचे ठरते.

अमेरिकेत प्रथम जाणवणारे एकाकीपण, हुरहूर पुढे त्या स्वकर्तृत्वाने, कल्पकतेने आणि लाघवी स्वभावाने पुसून टाकतात. नोकरी, संसार, संस्था, अनेकांना मदत, मुलांचे शिक्षण, संस्कार यातून एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून लौकिकास पात्र ठरतात.

लेखिका प्रत्येक बाबतीत भारत आणि अमेरिका असा तुलनात्मक भेद दाखवून श्रेष्ठ–कनिष्ठाचा पाढा वाचत नाही. जे जे सुंदर, वेगळेपण जाणवते त्याची नोंद नितळपणे आणि समरसून करतात. अमेरिकेत शिशुशिक्षणाची पद्धती कशी आहे, याचे वर्णन वाचताना वाचकच ठरवतो. अशा निर्णयावर येतो, अशी शिक्षणपद्धती आपल्याकडे नाही, ती कशी स्वीकारता येईल?

लेखिकेकडे असलेली निरीक्षणशक्ती आणि त्यांचे निसर्गावर असलेले निर्व्याज प्रेम याचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो. साधारणपणे प्रवासाला निघालेली मंडळी प्रवासाचे जे वर्णन करतात, त्यात निसर्गापेक्षा मी मी अधिक असतो. परंतु लेखिका वर्णन करतात, ते वाचताना प्रत्यक्ष आपण तो अनुभव जिवंतपणे अनुभवत आहोत, असाच अनुभव येतो. खूप समरस होऊन त्या लिहितात तेव्हा त्यांच्यातला चित्रकार आणि तरल मन आपल्याला सुंदर सहल घडवून आणल्याची अनुभूती देतात.

‘भक्तीचा मळा’, ‘स्वप्नवत माचू–पिच्चू’, ‘अरमा – एक महावादळ’ हे लेख वाचताना आपण लेखिकेच्या तरलतेचा अनुभव घेत वाचक स्वत:ला हरवून जातो.

त्यांनी स्वत:ला एका शिस्तीतत आखून घेतले आहे. प्रत्येक संधीचे सोने केलेले आहे. त्यात चित्रकलेची जोड मिळाल्याने जगणे सुखद, निरलस, बहुआयामी ठरले आहे.

निसर्गाच्या सोबतच व्यक्तिचित्रणदेखील तितक्याच ताकदीने केलेले आहे. पंढरपूर येथील आजोबा, आई, बाबा, मुले, बहिणी, मैत्रीण जेरी सेरावोलो, पती डॉ. दिलीप यांच्याविषयी असलेले स्नेहाचे नाते आणि त्यांच्यातले मोठेपण त्या सूक्ष्मपणे टिपतात.

चित्रकलेइतकेच त्यांचे कवितेवर प्रेम आहे. प्रत्येक लेखात कवितांच्या ओळी सहजपणे त्या पेरून जातात. त्यांचे वाचन चौफेर आहे. व्यासंग आहे. त्यामुळे आवडलेली इंग्रजी वाक्येही लेखांमधून येतात. परंतु ती ठिगळ न वाटता नक्षीकाम केल्याचा आनंद देतात. समृद्ध व्यासंग आणि समृद्ध अनुभव असेल तर लेखन किती कसदार, सकस आणि नितळ होऊ शकते, याची साक्ष हे पुस्तक देते. इंग्रजी प्रदेशात राहूनही लेखनात कुठेही कोणत्याही शब्दाची घुसमट झालेली दिसून येत नाही. प्रत्येक शब्द मोजून–मापून आणि कलदार नाण्यासारखा खणखणीत आहे. स्वत:च्या लेखनाविषयी त्यांनी व्यक्त केलेले मनोगत आणि लाभलेली कवयित्री नीरजा यांची प्रस्तावना वाचनीय आहे. सतीश भावसारांनी रेखाटलेले मुखपृष्ठही सुंदर आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

॥ग्रंथाली॥ PIXEL BY PIXEL DIGITAL MEDIA

# साहित्याच्या पारावर

## साप्ताहिक अक्षरमैफल

या लिंकवर पाहा – https://www.facebook.com/granthali.watch

यूट्यूबवर उपलब्ध

दोन साहित्यिक
आणि आपण...
दर शुक्रवारी भेटूया
सकाळी १० वाजल्यापासून उपलब्ध
ग्रंथाली फेसबुक पेजवर..

### भाग १२

**शुक्रवार, १७ जुलै २०२०**

संपदा जोगळेकर कुलकर्णी
हर्षदा बोरकर
निर्मोही फडके
डॉ. सोनाली लोहार
लेखिका





ललिता छेडा
लेखिका





### भाग १३

**शुक्रवार, २४ जुलै २०२०**

सौमित्र
कवी
अभिनेता





दासू वैद्य
कवी





### भाग १४

**शुक्रवार, ३१ जुलै २०२०**


संजीवनी खेर
लेखिका





डॉ. माया पाटील (शहापूरकर)
लेखिका






सूत्रधार



डॉ. लतिका भानुशाली



अस्मिता पांडे



किरण येले

संयोजक
सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, अरुण जोशी, राजू कदम, धनश्री धारप आणि योगिता मोरे

सहकार्य
ZEE मराठी

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.